# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## द्वितीय वर्ष कला अभ्यासक्रम सत्र पद्धत (III)

## स्पेशल पेपर- I POL २३३ (SPL-२) २११७३

## भारतीय राजकीय विचार

## Indian Political Thoughts

## राज्यशास्त्र- जून २०१४

## (सुधारीत सत्रपद्धतीचा पुनर्रचित अभ्यासक्रम)

**द्वितीय वर्ष कला सत्र- III**

**१) कौटिल्य-**

- राज्यव्यवस्थेचे स्वरूप, राज्याचा सप्तांग सिद्धांत
- राजा आणि त्याचे प्रशासन, मंत्रिपरिषद व न्याय व्यवस्था
- मंडळ सिद्धांत, राजकारण आणि नैतिकता
- परिक्षण

**२) राजा राममोहन रॉय-**

- भारताचे प्रबोधनकार
- सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा
- शिक्षणासंबंधी विचार
- राजकीय विचार, वृत्तपत्र स्वातंत्र्य
- व्यक्तिगत आणि राजकीय स्वातंत्र्याबाबतचे विचार
- मानवतावाद, परिक्षण

**३) लोकमान्य टिळक**

- ब्रिटिश नोकरशाहीवर टीका
- जहालवादाबाबतचे विचार, क्रांतिकारी राष्ट्रवादाबद्दलचे विचार
- सामाजिक सुधारणेबाबतचे विचार
- स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण यावरील विचार
- परिक्षण

**४) विनायक दामोदर सावरकर-**

- भारतीय इतिहासाचे स्पष्टीकरण
- सामाजिक सुधारणांबाबत विचार
- सैनिकीकरण, घटनावाद
- हिंदू राष्ट्रवादाबद्दलचे विचार
- परिक्षण

## प्रकरण १ ले.
## कौटिल्य

**कौटिल्याचा जीवन परिचय-** प्राचीन भारतीय राज्यशास्त्रामध्ये कौटिल्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. कौटिल्यापूर्वी अनेक राज्यशास्त्रज्ञ भारतात होऊन गेले असले तरी कौटिल्याला भारतीय राज्यशास्त्राचे जनक मानले जाते. त्याने राजकीय सिद्धाताचे विवेचन करून त्याला क्रमबद्ध स्वरूप दिले. त्यांच्या जन्माबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. तरी तो ॲरिस्टॉटलचा समकालीन होता. त्याचे पूर्ण नाव विष्णुगुप्त असे होते. त्याला चाणक्य नावानेही ओळखले जाते. मगधच्या आसपास त्यांची जन्मभूमी असावी असा अंदाज आहे. पूर्वी प्रचलित असलेल्या सर्व राजकीय ग्रंथाचे त्याने अध्ययन केले होते. नीतीशास्त्र, युद्धनीती, अध्यात्मशास्त्र इत्यादी विषयाचे त्यांने अभ्यास होता. मनू, याज्ञवलक्य, शुक्र यांच्या ग्रंथाचे अध्ययन करून त्याने आपला 'अर्थशास्त्र' हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. नालंदा विश्वविद्यालयात तो ज्ञानार्जनाचे कार्य करत होता. तेथे त्यांचा चंद्रगुप्त मार्याशी संबंध आला. चंद्रगुप्त मार्या हा त्यांचा विद्यार्थी होता. तो स्वभावने अतिशय रागीट होता. मगधचा राजा महानंदाने भर दरबारात त्यांचा अपमान केल्यामुळे त्यांचे राज्य उलथून टाकण्याची प्रतिज्ञा केली. पराक्रमी चंद्रगुप्त मौर्याला प्रशिक्षण देऊन आणि पंजाबच्या राजाची मदत मिळवून देऊन मगधच्या राज्यावर आक्रमण करावयास लावले. त्यात नंद वंशाचे राज्य नष्ट होऊन चंद्रगुप्त मौर्य सम्राट बनला आणि त्यांच्या आग्रहास्तव कौटिल्य प्रधानमंत्री बनला. सेल्यूकसचा पराभव करण्यासाठी चंद्रगुप्त मौर्याला कौटिल्याने खूप मदत केली. कौटिल्याने आपले राजकीय विचार अर्थशास्त्र या ग्रंथात समाविष्ट केले आहेत. हा ग्रंथ म्हणजे राज्यशास्त्रावरील एक उत्तम ग्रंथ मानला जातो. कौटिल्याच्या पूर्वीच्या ग्रंथात खास राजकीय विचार किंवा दंडनीतीतील विचार नाहीत. त्यात अनेक विषयाची सरमिसळ झाली आहे. परंतु कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ दंडनीती, राज्यप्रशासन यासाठी लिहिला आहे. राज्यकारभारात वेळावेळी उद्‌भवणारे प्रश्नांना राजाने कसे सोडवावे. तसेच सरकार समोर येणाऱ्या समस्या डोळयासमोर ठेवून कोणत्याही राजाला नेहमी उपयोगी पडेल असा उपदेश केला आहे. युद्ध नैतिक की अनैतिक अशा तात्त्विक चर्चत न पडता तो युद्ध कधी करावेत व कसे करावेत म्हणजे विजय मिळेल यासंबंधी वास्तविक व तपशिलपूर्वक माहिती देतो. त्यांच्या लिखाणावर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव दिसून येतो. अर्थशास्त्र ग्रंथ १४ भागात विभागलेला आहे. या ग्रंथात एकूण सहा हजार श्लोक आहेत. हा ग्रंथ राजकारणातील प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे.

**प्र.१ला. कौटिल्याचे राज्यविषयक विचार स्पष्ट करा?**

**किंवा**

**कौटिल्याचे राज्याचे उदय, स्वरूप आणि सप्तांग सिद्धांत विशद करा.**

कौटिल्याच्या मते, मानवासाठी राज्य अनिवार्य आहे. राज्य नसेल तर 'बळी तो कान पिळी' अशी स्थिती निर्माण होईल.

**राज्याच्या उत्पत्तीसंबंधी विचार-** कौटिल्याने राज्याच्या उदयाविषयीचा विकासवादी सिद्धांत नाकारलेला आहे. त्यांच्यामते राज्य हे करारातून निर्माण झाले आहे. राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी अराजकता होती. अराजकतेमुळे कुणालाही जीवनाची व संपत्तीची शाश्वती नव्हती. बळी तो कान पिळी हा नैसर्गिक नियम अस्तित्वात होता. जनता या परिस्थितीमुळे त्रस्त होती. यातून मार्ग काढण्यासाठी जनता मनूजवळ गेली. मनुशी करार करून जनतेने त्याला आपला राजा बनविले. या करारानुसार जनता आपल्या उत्पन्नातील सहावा भाग आणि वाणिज्याचा दहावा भाग साने व चांदीच्या रूपात राजाला देणार होती. या मोबदल्यात राजाला जनतेचे संरक्षण करावयाचे होते. जनतेला सुरक्षितता उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कायदे बनविण्याचा अधिकार राजाला देण्यात आला. राजाची आज्ञा पाळणे जनतेला आवश्यक झाले. राजा जर प्रजेचे संरक्षण करू शकला नाही तर जनतेने राजाच्या आज्ञा पाळू नये असे कौटिल्य सांगतो. थोडक्यात राज्य करारातून निर्माण झाले आहे. मनुष्याच्या दृष्ट स्वभावामुळे निर्माण झालेली अराजकता नष्ट करण्यासाठी राज्याची निर्मिती झाली आहे असे कौटिल्य सांगतो.

**राज्याचे स्वरूप-** कौटिल्याने अर्थशास्त्रात अनियंत्रित राजेशाहीचा शासन पद्धतीचा पुरस्कार केला आहे. राजा हा सार्वभौम असल्याने त्यांची सत्ता संपूर्ण समाजावर चालत असे. राजाला जरी अनियंत्रित सार्वभौम सत्ता कौटिल्याने

बहाल केलेली असली तरी प्रत्यक्ष राज्यकारभार करतांना राज्याने मंत्री, अमात्य, पूरोहित व सेनापती या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सल्ला घेतला पाहिजे हे मत व्यक्त केले आहे. प्रजेचे सुख आणि संतोष हीच राज्याची बळकटी मानतो. म्हणजे जनतेच्या कल्याणाचे अप्रत्यक्ष बंधन राजाच्या सार्वभौमत्वावर होते.

**राज्याचा सप्तांग सिद्धांत-** कौटिल्याचने राज्यासाठी आवश्यक सात घटकांची चर्चा केली आहे. या घटकात स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग इत्यादी घटकांचा समावेश आहे. त्यामुळे कौटिल्याच्या राज्यविषयक सिद्धांताला सात घटकामुळे सप्तांग सिद्धांत नावाने ओळखला जातो.

१. **स्वामी किंवा राजा-** कौटिल्याच्या मते राजा हा राज्याचा आवश्यक घटक आहे. एक राज्याला एक स्वामी असतो. तो राजाकडून अनेक गुणांची अपेक्षा करतो. राजा हा राज्याचा अविभाज्य घटक असतो. राजा हा कुलवान, सत्यवादी, धार्मिक, उच्च उद्देश ठेवणारा, शीघ्रपणे काम करणारा व सर्व सामंतानी युक्त असावा. त्याने उत्तम सल्लागार व उपदेशकर्त्यांना आपल्याजवळ ठेवावे. तो न्यायशील व विनयशील असावा. तर्क वितर्क करून एखादी गोष्ट निश्चित करण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये असावे. तो विचारशील, संयमी आणि परिस्थिती लक्षात घेऊन वागणारा असावा. राजा शूरवीर, अर्थपूर्ण वचन बोलणारा, प्रतिभासंपन्न, स्मृतिकुशल, दूरदर्शी, त्यागी व शत्रूची कमजोरी जाणून घेणारा असावा. तह किंवा युद्ध उचित वेळी करावे. त्याने दुर्ग, किल्ले, सैनिक संघटन आणि गुप्तचर विभागाची स्थापना करावी.

२. **अमात्य-** राज्याचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे अमात्य आहे. राजाने शासन कार्यात सहाय्य घेण्यासाठी अमात्याची नेमणूक करावी. अमात्याची नियुक्ती करताना राजाने अत्यंत दक्ष असणे गरजे असते. अमात्य म्हणजे मंत्रिमंडळ नव्हे तर प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी असा होता. अमात्य हा दूरदर्शी, कार्यकुशल, उत्साही, प्रभावशाली, शुद्ध मन आणि दृढ निष्ठा ठेवणारा असावा. उत्तम प्रशासकवर्गावर राज्यांची सफलता अवलंबून असते. कौटिल्य अमात्य आणि मंत्रिमंडळ यात फरक करतो. मुख्य अमात्याची निवड करताना राजाने परीक्षा घ्यावी. अमात्यचे मुख्य काम प्रशासकीय कार्य करणे आणि राज्याच्या आज्ञेची अंमलबजावणी करणे हे असते. अमात्य पदावर काही काळ कार्य केलेल्या सदाचारी व प्रतिभावान व्यक्तीला मंत्रिपदावर नेमावे. मंत्र्याचे मुख्य कार्य राजाला सल्ला देण्याचे आहे.

३. **जनपद-** जनपद हा राज्याचा तिसरा आवश्यक आहे. जनपद शब्द त्याने राष्ट्र शब्दाचा पर्यायवयी शब्द म्हणन उपयोग केला आहे. जनपदात लोकसंख्या व भूमी या दोन गोष्टीचा समावेश आहे. जनपदाची सीमा नैसर्गिक असावी. नदी किंवा पर्वत यांची सीमा असावी. राज्याचे हवामान अरोग्यवर्धक असावे. दळणवळणाची साधने असावीत. राज्यात प्राकृतिक संपत्ती, खजिन पदार्थ वगैरेची कमतरता नसावी. राज्यातील लोक परिश्रमी, राजभक्त व शिक्षित असावेत. जनपद हे समृद्धशाली असले पाहिजे.

४. **कोष-** राज्याला प्रशासकीय कार्यासाठी व संरक्षणासाठी संपत्तीची गरज असते. त्यामुळे राजाने चांगला खजिना ठेवणे आवश्यक आहे. कोषाशिवाय राज्य चालू शकत नाही. अधिकोषाच्या स्थिरतेवर राज्याची कार्य सुरळितपणे चालू शकतात. राजाने निरनिराळया कराच्या माध्यमातून पैसा उभारावा. सोने, चांदी आणि रत्ने ह्याचे अपार भांडार राजाजवळ असावे. कौटिल्याने कर आकारणीबाबत मते व्यक्त केली आहे. कर आकारणी करतांना करदेयक्षमता लक्षात घ्यावी. जनतेत असंतोष निर्माण होईल अशा प्रकारचे कर राजाने लादू नयेत. संपत्तीचा संग्रह धर्मानुसार राजाने करावा. संकटकालीन निधीची उभारणी करावी.

५. **किल्ला किंवा दुर्ग-** दुर्ग हा राज्याचा आवश्यक घटक आहे. त्यावेळी युद्धे जमिनीवर होत असल्याने संरक्षणासाठी दुर्ग हा घटक आवश्यक मानतो. राज्याच्या चारही बाजूंना दुर्ग असावेत. दुर्गाचे स्थानाच्या आधारावर चार प्रकार पाडता. पहाडी भागातील दुर्गांना पर्वत दुर्ग म्हणतो. या दुर्गाच्या चारही बाजूने पर्वत असल्याने शत्रूपक्षावर मारा करण्यात योग्य असतो. औदुक दुर्गाच्या चारही बाजूने पाणी असते. ओसाड प्रदेश किंवा वाळवंटातील दुर्गाला धान्यवत दुर्ग म्हणतो. तेथे पाणी मिळत नसल्याने तेथेवर शत्रू पोहचू शकत नाही. धनदाट जंगलातील दुर्गाला वनदुर्ग म्हणतात.

६. **दंड-** कौटिल्याने दंड शब्द सेना या अर्थाने घेतला आहे. राज्याचे संरक्षण करण्यासाठी योग्य सेना आवश्यक असते. सैन्याशिवाय कोणतेच राज्य सुरक्षित राहू शकत नाही. सैन्याच्या संघटनाबाबत मत व्यक्त करतांना कौटिल्या सांगतो की, अश्वसेना, हत्तीसेना, नौसेना ह्यांचे सविस्तर वर्णन केले आहे. वंशपरंपरागत, अनुशासित आणि प्रशिक्षित सैनिकांना तो उत्तम सैनिक मानतो. युद्धकलेत पारंगत, दुःख सहन करून नेहमी पुढे जाणारे आणि राजाच्या जयपराजयाला आपला मानणारे सैनिक राजासाठी उपयुक्त असतात. युद्ध आघाडीवर सैन्य लढत असताना राजाने त्यांच्या कुटुंबाच्या पालन पोषणाची जबाबदारी घ्यावी.

७. **मित्र-** राज्याच्या हितचिंतकांना कौटिल्य मित्र म्हणत होता. मित्रवर्ग शांती किंवा अशांती ह्या दोन्ही काळात राजाला मदत करतो. वंशपरंपरेने मैत्री असणे योग्य असते. कौटिल्याने मित्राचे गुणदेखील स्पष्ट केले आहेत. मित्र विश्वासू, उच्च विचारसरणीचा, निःस्वार्थी, शूर आणि वेळप्रसंगी राजाला मदत करणारा असावा.

आधुनिक काळात राज्याचे भूप्रदेश, लोकसंख्या, प्रभुत्व आणि सरकार हे चार घटक मानले जातात. कौटिल्याने वर्णन केलेल्या घटकाचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यास त्यांची आवश्यकता आजही दिसून येते. सैन्य आणि मित्राशिवाय कोणतेही राज्य असू शकत नाही. स्वामी हा घटक सार्वभौमत्वाचे प्रतिनिधित्व करतो. यावरून कौटिल्याचा दृष्टिकोन दूरदृष्टीचा होता.

**टिप- कौटिल्याने सांगितलेली राजाची प्रमुख कर्तव्ये-** कौटिल्य अत्याचारी राजाच्या विरोधी होता. राज्याचे स्वरूप व राजाची कर्तव्याबाबत ह्याचे वर्णन अर्थशास्त्रात केलेले आहे. तो राजाची पुढील कर्तव्ये सांगतो.

१. **राज्याचे संरक्षण-** स्वराज्याचे संरक्षण हे राजाचे प्रमुख कर्तव्य आहे. राजाने स्वतःच्या राज्याचे रक्षण केले नाही तर राज्य नष्ट होईल. म्हणून आंतरिक व बाह्य शत्रूपासून राज्याचे रक्षण करण्यासाठी राजाने जास्तीत जास्त शक्तिशाली असले पाहिजे.

२. **राज्यातील शांतता व सुव्यवस्था-** राज्यात शांतता व सुव्यवस्था ठेवणे हे राजाचे कर्तव्य असते. या कार्यासाठी गुप्तचर व हेर विभाग महत्त्वाचा मानतो. गुप्तचरांमुळे राजद्रोहाची माहिती राजाला पूर्वीच उपलब्ध होते.त्यामुळे राजा जागृत राहतो.

३. **नैसर्गिक संकटापासून संरक्षण-** आंतरिक व बाह्य शत्रूंपासून राज्याचे रक्षण करणे हे राजाचे कर्तव्य आहे. त्याप्रमाणे नैसर्गिक संकटापासूनही राज्याचे रक्षण करणे राजाचे कर्तव्य आहे. कौटिल्याने जल, अग्नी, दुष्काळ, व्याधी, उंदिर, हिंसक, सर्प आणि राक्षस हे आठ नैसर्गिक शत्रू मानतो.

४. **कृषिव्यवस्था-** कृषी हा राज्याचा आधारस्तंभ आहे. कृषीपासून राज्याला जास्तीत जास्त उत्पन्न मिळते. कृषी संरक्षण आणि कृषी उन्नती करणे हे राज्याचे महत्त्वपूर्ण कार्य असेल.

५. **व्यापार आणि वाणिज्य उन्नती-** कृषीनंतर व्यापार हे उत्पादनाचे प्रमुख साधन आहे. राज्यात व्यापार व वाणिज्य ह्यासाठी विपणाध्यक्ष असावा. व्यापाराचे रक्षण व विकास ही दोन्ही राजाची महत्त्वाची कर्तव्ये आहेत.

६. **पशुसंवर्धन-** राज्यातील पशुधन जोपासले पाहिजे. त्यांच्या संवर्धनाकडे लक्ष दिले पाहिजे.

७. **प्रजेचे संरक्षण-** प्रजेचे रक्षण करणे हे राजाचे कर्तव्य असते. राजाने कर्मचारी, सावकार, जादुगार आणि चोर व डाकू ह्यापासून प्रजेचे संरक्षण करावे. राज्यातील उपद्रवी व असामाजिक तत्त्वाचा नाश केला पाहिजे. राजाने अपराध्याला कडक दंड करावा.

८. **राज्याचा विस्तार-** राज्याचा विस्तार हे देखील राजाचे एक कर्तव्य मानतो. राजाने राज्यविस्ताराची योजना तयार करावी. शत्रूराज्यावर आक्रमण करून ते राज्य आपल्या राज्यात विलीन करून घ्यावे.

९. **सामाजिक व सांस्कृतिक कार्य-** वृद्ध, रोगी, अपंग ह्याचे रक्षण करणे हे राजाचे कर्तव्य असते. प्रजेला शिक्षित करणे व त्यांचा सांस्कृतिक उन्नती करणे हे राजाचे कार्य असते. त्यासाठी त्याने मनोरंजनाची व्यवस्था करावी.

कौटिल्य हा व्यवहारी राजनीतिज्ञ होता. त्याने आपले सिद्धांत मौर्य साम्राज्याच्या विकासासाठी उपयोगात आणले. त्यांच्या सिद्धांतामुळेच मौर्य साम्राज्य उत्कर्षाच्या दिशेने गेले. कौटिल्याने निरकुंश राज्याऐवजी कल्याणकारी राज्याची संकल्पना राजाच्या कर्तव्यातून व्यक्त केलेली आहेत.

**टिप- कौटिल्याचे मंत्रिमंडळाबाबतचे विचार-** कौटिल्याच्या काळात राजाला सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळ असत. राजा आणि मंत्रिमंडळ यातील संबंध मालक आणि नोकरासारखे होते. मंत्र्याची नियुक्ती करण्याचा अधिकार राजाला आहे तरी ही राजाने एकटयाने शासनकार्य न करता योग्य मंत्र्याची नेमणुक करून त्यांच्या सल्ल्याने राजकारभार करावा. राजाची सफलता मंत्रिमंडळाच्या योग्यतेवर अवलंबून असते. राजा आणि मंत्रिमंडळ ही राज्याचे प्रमुख दोन आधार आहेत.

**मंत्रिमंडळाचे आकार व संघटन-** कौटिल्यापूर्वी निरनिराळया विचारवंतानी मंत्र्याची संख्या भिन्न भिन्न सांगितलेली आहे. मनूने १२, बृहस्पतीने १६ तर शुक्राचार्यच्या मते २० असली पाहिजे. कौटिल्याने मंत्रिमंडळाची निश्‍चित संख्या सांगितलेली नाही. ती आवश्यकतेनुसार कमीजास्त होऊ शकते.

**मंत्र्यांची योग्यता-** मंत्रिमंडळातील सदस्य गुणवान असले पाहिजे. समाजात गुणवानाची संख्या फारच कमी असते. त्यातून राजाने मंत्र्याची नियुक्ती करावी. मंत्र्याची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची परीक्षा घ्यावी. परीक्षेत उत्तीर्ण झाला तरच त्याला मंत्री नेमावे. गुप्त परीक्षेबाबत कौटिल्याने काही सूचना केलेल्या आहेत. ज्या अमात्याला मंत्री नेमावयाचे त्याला अनेक प्रकारची प्रलोभने दाखवावी. त्यांना बळी न पडणाऱ्याला न्यायाधीश म्हणून नेमावे. आर्थिक प्रलोभनाला बळी न पडणाऱ्याला राजस्व खात्यात नेमावे. याशिवाय देशाचा नागरिक, उत्तम कुलीन, तीव्र स्मरणशक्ती, बुद्धिवान, दूरदर्शी, उत्साही, आरोग्यवान, प्रगतिशील, शुद्ध चारित्र्याचा इत्यादी गुण मंत्र्यासाठी आवश्यक मानलेले आहेत. त्याने पुरोहित, सम्माहर्ता, सन्निधाता, कोषागार मंत्री, युद्धमंत्री अशा १० मंत्र्याचा उल्लेख अर्थशास्त्रात केलेला आहे.

**मंत्रिमंडळाची बैठक-** मंत्रिमंडळाची बैठक म्हणजे सल्ला देण्याचे स्थान. हे स्थान गुप्त आणि पूर्णपणे सुरक्षित असले पाहिजे. कोणताही अनावश्यक व्यक्ती तेथे पोहचू नये. बैठकीतील कोणतीही गोष्ट बाहेरील व्यक्तीपर्यंत पोहचू नये. बैठकीतील निर्णय आणि सल्ल्याबाबत मंत्र्याने बाहेर वाच्यता करू नये. मंत्रिमंडळातील गुप्त गोष्टी बाहेर वाच्यता करणाऱ्या मंत्र्याला सुळावर चढवावे. अतिशय गुप्त गोष्टीच्या बाबतीत राजाने विश्वासपात्र ३ ते ४ मंत्र्यांचाच सल्ला घ्यावा. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात मंत्रिपरिषदेत ३ प्रकारचे लोक असतात. त्यात मंत्रधर म्हणजे मुख्यमंत्री व विशेष सल्लागार, पदाधिकारी युक्त मंत्री आणि पदाधिकारविहीन मंत्री असतात.

**मंत्रिमंडळाचे कार्य-** मंत्रिमंडळाने राजाला पुढील गोष्टीत सल्ला देण्याचे कार्य करावे.

१. **सल्लाविषयक कार्य-** मंत्रिमंडळ राजाला संरक्षण आणि युद्धविषयक धोरण, आंतरराष्ट्रीय धोरण, उच्च पदाधिकाऱ्याची नियुक्ती, कायदे निर्मिती, न्यायविषयक, कल्याणकारी योजना, देशाच्या आर्थिक धोरण व आर्थिक वृद्धी इत्यादी बाबत सल्ला देणे हे मंत्र्याचे काम असते.
२. **आवश्यक कार्य-** प्रशासनावर देखरेख करणे, राजाने ठरविलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे आणि राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे मंत्र्याचे आवश्यक कार्य आहेत.

**मंत्रिमंडळ व राजा याचे संबंध-** कौटिल्याचा राजा हा स्वामी समजत असला तरी तो राजाला दैवी मानत नव्हता. दुष्ट, अधर्मी राजाला तो पदावनत करण्याबाबत विचार व्यक्त केले आहेत. राजाची सत्ता सर्वोच्च मानतो. त्याने दिलेल्या आज्ञा पाळणे बंधनकारक मानतो. परंतु निरंकुश राजाला तो मान्यता देत नाही. राजा व मंत्रिपरिषदेने मिळून कायदे करावेत. राजाने एकटयाने कायदे निर्मिती करून नये. राजा स्वच्छेचारी आणि अधार्मिक बनू नये म्हणून पुरोहितसारखे मंत्री नेमून राजावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. मंत्र्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार राजाला आहे. त्याचे संबंध स्वामी व नोकर प्रमाणे आहेत. मंत्रिमंडळाचा सल्ला राजावर बंधनकारक नसतो. सर्वच मंत्र्यांचा सल्ला राजाने घेतला पाहिजे असेही बंधन नाही.

**टिप- कौटिल्याचे न्याय व्यवस्था व कायद्यासंबंधी विचार-** कौटिल्याच्या न्यायविषयक विचारात न्यायालयाची व्यवस्था, वेगवेगळया गुन्ह्याचे प्रकार, आरोप निश्‍चितीची जबाबदारी, विवाद, वारसा इत्यादी बाबत विचार व्यक्त केलेले आहेत. दोन हजार वर्षापूर्वी न्याय व्यवस्थेबाबत इतके पगल्भ, मौलिक विचार कौटिल्याने मांडले आहेत. कौटिल्याने न्यायालयाची संकल्पना धर्माधिष्ठीत आहे. तो दोन प्रकारची न्यायालये आहेत. धर्मस्थिय, कंटकशोधन धर्मस्थित न्यायालयात धर्मशास्त्रात पारंगत तीन न्यायाधीश व तीन अमात्य असावेत. कंटक शोधन न्यायालयात तीन अमात्य

असावेत. कायद्यासमोरील समानतेचे तत्त्व कौटिल्याने पुरस्कृत केलेले नाही. न्यायाधीशाची नेमणूक करतांना ब्राह्मणाना झुकते माप दिलेले आहे. भ्रष्टाचारी न्यायाधिशास शिक्षा द्यावी असे मत मांडलेले दिसते.

कौटिल्य न्याय देण्यासाठी धर्माचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तीची नेमणूक करण्यास सांगतो. प्रत्येक एक खेडयाला एक न्यायाधीश, ४०० खेडयांना एक न्यायाधीश व ८०० खेडयांना त्या पेक्षा वरिष्ठ न्यायाधीश असेल. न्यायमंडळ लोकांपासून फार लांब असू नये. दिवाणी व फौजदारी खटल्यासाठी दोन प्रकारची न्यायालये असावीत व न्यायालयावर अमात्याचे नियंत्रण असावे. न्यायाधीशाने निर्णय देण्यापूर्वी साक्ष घेणे, उलटतपासणी करणे, खोटी साक्ष देणाऱ्या शिक्षा इत्यादी गोष्टी केल्या पाहिजे. न्यायाधिशाने न्यायदान करतांना प्रत्यक्ष वास्तवदर्शी साक्षीदाराची मते, शपथपूर्वक साक्ष यांचा विचार करून विवेकाचा वापर करून निर्णय घ्यावा. निर्णय हा अतिशय सक्षम, पारदर्शक व न्यायनिष्ठूर न्यायव्यवस्था कौटिल्यास अपेक्षित होती.

**न्यायालयीन पद्धती-** न्यायालीन पद्धतीत न्याय देण्यासाठी राजाने तीन अमात्य आणि धर्माचे सखोल ज्ञान असलेले तीन धर्मस्थ नेमावे. राज्याच्या महत्त्वपूर्ण ठिकाणी केंद्रस्थानी असलेल्या न्यायालयाचे काम नियमित चालेल. इतरत्र तीन प्रकारात न्यायालये असतील. १० गावाचा समावेश असलेले संग्रहण न्यायाधीश, स्थानिक व्यवस्थेत ८०० गावे तर द्रोणमुख व्यवस्थेत ४०० गावाचा समावेश असेल. न्यायालयासमोर आलेले कोणते करार कायदेशीर व बेकायदेशीर असतील याची यादी कौटिल्य देतो. गुप्त आणि लबाडीने आणि एकांतस्थळी केलेले करार अवैध मानतो. हे करार करणाऱ्या वा सहकार्य करणाऱ्यास दंडाची तरतूद करतो. खटला चालविताना वादी-प्रतिवादीची पूर्ण माहिती नोंदवून घ्यावी, दोन्ही पक्षाच्या म्हणण्याची छाननी करावी. साक्षीशिवाय स्वतःची बाजू मांडणाऱ्यास दंड करावा. वास्तूसंबंधी तंटे शेजाऱ्याच्या साक्षीने सोडवावा. व्यक्तीच्या पात्रता व परिस्थितीवर शिक्षा दिली जावी. तो धर्मावर आधारित न्यायाची कल्पना मांडत असल्याने जन्म श्रेष्ठत्वाचा फायदा उच्चवर्णियाना देतो. न्याय क्षेत्रातील अनेक जबाबदाऱ्या ब्राह्मण व क्षत्रियावर सोपवतो. भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद करतो.

**प्र २ रा. कौटिल्याचा मंडळ सिद्धांत स्पष्ट करा?**

**किंवा**

**कौटिल्याचे परराष्ट्रीय धोरण विशद करा?**

भारताच्या राजकीय विचारांच्या इतिहासात परराष्ट्रीय धोरणाची मुहूर्तमेढ रोवणारा कौटिल्य हा पहिला राजकीय विचारवंत आहे. त्यांच्या परराष्ट्र धोरणातून सार्वभौमत्वाची कल्पना स्पष्ट होते. राज्यविस्तार करून साम्राज्य निर्मिती आणि चक्रवर्ती होण्याची महत्त्वाकांक्षा राजात असणे कौटिल्याला स्वाभाविक वाटते. तो आंतरराष्ट्रीय संबंध विशद करण्यापूर्वी राज्याचे प्रकार पाडतो. कौटिल्याच्या काळात अनेक स्वतंत्र लहान राज्य असत. कौटिल्य विजयी राज्य मध्यभागी मानून मंडल सिद्धांताची मांडणी करतो. मंडल सिद्धांतानुसार चार मुख्य राज्याचे विवेचन करतो.

१. **विजिगिषु राज्य-** हे राज्य सर्वच दृष्टीने परिपूर्ण असते. आपल्या राज्याचा विस्तार करण्याचा या राज्याचा सतत प्रयत्न असतो. इतर राज्याच्या परराष्ट्र धोरणावर या राज्याच्या धोरणाचा प्रभाव पडतो.
२. **अरिराज्य-** अरि म्हणजे शत्रू. शत्रूराज्य विजिगिषु राज्याच्या सीमेला लागून असते. कोणत्या तरी कारणामुळे वितुष्टामुळे विजिगिषु राज्याशी या राज्याचे कायमस्वरूपी शत्रूत्व असते.
३. **मध्यम-** जे राज्य विजिगिषु आणि अरिराज्याशी मैत्रीचे संबंध ठेवू शकते किंवा जे दोन्ही राज्यांशी युद्ध करू शकते त्या राज्याला मध्यम राज्य म्हणतात.
४. **उदासीन-** उदासीन राज्य युद्धकाळात कुणालाच मदत करीत नाही. परराष्ट्रीय धोरण ठरविताना दुसरे राज्य कोणत्या प्रकारात मोडते हे लक्षात घेऊन नीती ठरवावी.

कौटिल्य परराष्ट्र नीतीचे विश्लेषण करून सहा प्रकारची नीती सांगतो. १. संधी २. युद्ध ३. तटस्थता ४. यान ५.मैत्री ६. द्वेवीभाव

परिस्थितीचा विचार करून राज्याने नीती वापरावी. सर्व राज्याशी एकाच प्रकारचे धोरण ठेवू नये. शत्रूपेक्षा सामर्थ्यवान आहोत असे वाटल्यास सरळ आक्रमण करावे. शत्रू सामर्थ्यवान असेल तर तह किंवा करार करावा. तह किंवा करार

करताना आपल्याला सोयीस्कर अटी त्यात समाविष्ट करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. शत्रूपक्ष समतूल्य असेल तर तटस्थेचे धोरण अंगिकारावे. समबल मित्रापासून विजिगिषु राष्ट्राने सावध असावे. मित्र राज्याची स्थिती खालावत असेल तर विजिगिषु राष्ट्राने मदत करू नये. शत्रू राज्यावर विजय मिळविल्यानंतर मध्यम व उदासीन राजास जिंकून पूर्ण राज्यमंडलावर वर्चस्व निर्माण करावे. मित्र राष्ट्राना देखील विजिगिषु राज्याने सार्वभौमत्व प्रस्थापित करावे. दुर्बळ राजाने सामर्थ्यवान राजाच्या आश्रयाला राहावे. सामर्थ्यवान राजा संकटात असेल किंवा जनता त्याविषयी असंतुष्ट असल्यास आक्रमक पवित्रा घ्यावा. शत्रू राजा विलासी, दुष्ट, सैन्यात दुफळी व आळशी असेल तर लवकरात लवकर त्यावर आक्रमण करावे. परकीय राजाशी शांततेचे धोरण ठेवण्यात आपले हित असेल आणि शत्रूचे अहित असेल तर त्या राजाशी शांततेचे धोरण ठेवावे. एखाद्या राजाच्या मनात विश्वास निर्माण करून कुटनीतीच्या सहाय्याने राजास लुटावे. परकीय राज्यातील विद्वान व कुशल कारागीराना अमिषे दाखवून आपल्या राज्यात आणावे. तह केलेल्या राज्यात घातपाती कृत्ये करून घडवून त्याची शक्ती कमी करावी. युद्ध आणि शांतता ह्यापैकी दोन्हीमुळे सारखाच फायदा होत असेल तर राजाने शांततेचा मार्ग स्वीकारावा.

परराष्ट्रीय धोरण ठरविताना राज्याचे नैसर्गिक स्थान लक्षात घ्यावे. शत्रूच्या शत्रूशी मैत्रीचे संबंध ठेवावेत. शत्रूचा शत्रू म्हणजे आपला मित्र आणि शत्रूचा मित्र म्हणजे आपला शत्रू मानावे. द्वैधीभाव व सामर्थ्यवान राजाच्या आश्रयाने राहणे असा प्रश्न निर्माण झाल्यास द्वैधीभाव धोरण स्वीकारवे. तटस्थता व युद्ध याचे परिणाम समान येत असतील तर तटस्थतेचे धोरण स्वीकारावे. राजाच्या उत्कर्ष हा कौटिल्याच्या परराष्ट्र धोरणाचा आधार आहे. विजिगिषु राजाने सामर्थ्यवान आणि समतुल्य राजाशी शांततेचे धोरण आणि दुर्बळ राजाशी सरळ युद्धाचे धोरण अवलंबावे. आक्रमण करतांना राजाने सैन्यशक्ती, हवामान, युद्ध स्थळ, सैन्य व संपत्ती हानी या सर्व गोष्टीकडे लक्ष पुरवावे. नुकसान किंवा लाभाचा विचार करून आक्रमणाचे धोरण ठरवावे. न्यायाने राज्य करणाऱ्या राजावर आक्रमण करू नये. प्रजेच्या मनात राजाबद्दल असंतोष असेल त्या राजावर आक्रमण करावे. विजिगिषु राजाने आक्रमण करताना तो अन्यायी आहे का याची खातरजमा करावी. दुर्बल राजाने शक्यता दुसऱ्या राजाशी मिळून मिसळून राहावे. त्यांच्याशी तह करावा. शांतता तह आक्रमक राज्य सैन्य व जडजवाहीर मागते त्यावेळी त्याला सैन्य द्यावेत. सैन्यापेक्षा बुद्धी श्रेष्ठ असते. बुद्धिवान राजा असेल तर शत्रूवर थोडया श्रमात विजय मिळवू शकतो. प्रत्येक राष्ट्राला आत्मसंरक्षणासाठी युद्ध आवश्यक असते. युद्धनीती हा परराष्ट्र धोरणाचा भाग असतो. राज्याची शक्ती उत्साहशक्ती, प्रभावशक्ती आणि मंत्रशक्तीवर आधारित असते. उत्साहशक्ती पेक्षा प्रभावशक्ती श्रेष्ठ असते. मंत्रशक्ती सर्वात श्रेष्ठ असते. मंत्रशक्तीत ज्ञान व विचार याचा संगम असतो.

दोन राज्यांनी मिळून एखादा प्रदेश जिंकला असेल तर संपत्ती दुसऱ्याला द्यावी आणि जमीन विजिगिषु राष्ट्राने ठेवून घ्यावी. जिंकलेल्या प्रदेशातील जनतेला त्रास देऊ नये. कायदा व सुव्यवस्था निर्माण होईल अशी व्यवस्था ताबडतोब करावी. त्यांच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करू नये. राजा शरण आणल्यास त्याला मांडलिक बनवावे. शरण आलेल्या राजाचा मानसन्मान करावा. तहात सुपीक जमीन राजाने आपल्याजवळ ठेवावी.

युद्धात यश मिळविण्यासाठी तो कोणत्याही प्रकारची साधन वापराला परवानगी देतो. विजयासाठी पुढील उपाय सुचवितो.

१. शत्रूराज्यात आगी लावणे, लोकांना विषबाधेने मारावे, हेराच्या मदतीने शत्रू राष्ट्रातील जनतेत फूट पाडावी.
२. प्रलाभने दाखवून शत्रू राष्ट्रातील जनतेते असंतुष्ट करावे. शत्रू राष्ट्रातील अन्नधान्य नष्ट करावे.
३. शत्रू राष्ट्रातील युद्ध सामुग्री व सैन्याची पूर्ण माहिती काढावी, शत्रूच्या शेजारील राष्ट्रांना त्याविरूद्ध चिथावणी द्यावी.
४. अन्न, मांस आणि दारू विकणारे अशा प्रकारचे हेर शत्रू राष्ट्राच्या छावणीत पाठवून माहिती काढावी, युद्धात उपयोगी हत्ती व घोडयांना विष द्यावे, शत्रू राज्यात जाण्यासाठी भूमिगत मार्ग तयार करावे, शत्रू राजाच्या खुनाचे कारस्थान रचावे.

शत्रू राजाचे नुकसान होईल याचा विचार करून कौटिल्याने विविध उपाय सुचविले आहेत.

**मंडळ सिद्धांताची वैशिष्टये-**

१. विजिगिषु राज्याच्या सरहद्दीस लागून असलेले राज्य हे शत्रू राष्ट्र होय.
२. विजिगिषु राज्याशी सलग असलेल्या भूभागावर राज्य करीत असलेला राजा हा स्वाभाविक शत्रू असतो.
३. हितसंबंधातील संघर्षामुळे विजिगिषु राजाचे संबंध दुरावतात तो तात्कलीक शत्रू होय.
४. शत्रू राष्ट्रालगत पण विजिगिषु राज्याच्या सीमेलगत नसलेले राज्य हे मित्र राष्ट्र होय.
५. वंशपरंपरागत मैत्री ठेवणारा व विजिगिषु राज्याच्या भौगोलिक सीमेजवळ सीमा नसलेला स्वाभाविक राष्ट्र समजावे.
६. आश्रय, धनलाभ या हेतूने मैत्री करणारा राज्य विजिगिषु राष्ट्राचा तात्कालीन मित्र राष्ट्र असते.
७. मित्र राष्ट्रास लागून असलेले राज्य. शत्रू राष्ट्राचा मित्र या नात्याने अरिमित्र होय.
८. अरिमित्राच्या पलीकडील राज्य हे अरिमित्राचे शत्रू म्हणून विजिगिषु राज्याच्या मित्राचे मित्रराष्ट्र होईल. त्यास मित्र मित्र म्हटले जाईल.
९. मित्रमित्र राज्याच्या पलीकडचे राज्य हे शत्रूच्या मित्राचे राज्य असेल त्यास विजिगिषु राज्याचे दृष्टीने अरिमित्र म्हणता येईल.
१०. विजिगिषु राष्ट्राच्या पिछाडीसही त्यांच्या भौगोलिक स्थानामुळे शत्रूचा मित्र व मित्राचा मित्र अशी राज्य असतील.
११. विजिगिषु राज्य व शत्रू राज्याच्या लगतचे व दोघा राज्यांना मदत किंवा विरोध करण्याची क्षमता असलेले राज्य मध्यम राज्य होय.
१२. या सर्व राज्यापासून लांब असलेले व सर्वांना मदत किंवा विरोध करण्याची क्षमता बाळगणारे राज्य हे उदासीन राज्य असते.

अशा प्रकारे राजमंडलात १२ राज्ये असू शकतात. विजिगिषु , मित्र व मित्रमित्र या तीन राज्यांना कौटिल्य मूळ प्रकृती मानतो. शत्रू, मध्यम व उदासीन राज्यांनाही स्वतःची राजमंडले असतात. विजिगिषु, शत्रू, मध्यम व उदासीन अशा चार राजमंडलाच्या कक्षेत १८ अंग याप्रमाणे ७२ प्रकृतीचे बलाबल आंतरराष्ट्रीय राजकारणात लक्षात घ्यायला हवे असे कौटिल्य म्हणतो.

**टिप- कौटिल्याचे धर्म, राजकारण व नैतिकता संबंधी विचार-** कौटिल्य हा कुटिल राजकारणाचा पुरस्कर्ता असला तरी तो धर्माचा विरोधक नव्हता. त्याने चार विद्यांमध्ये तीन वेदांच्या अभ्यासाला महत्त्व दिले आहे. वर्णाश्रम संस्था मान्य केली आहे. राजास धर्मप्रवर्तक संबोधितो. समाजव्यवस्था वर्णाश्रम धर्मावर आधारित असते. राजाने वेदपारंगत राजपुरोहित नेमावा, ब्राह्मणास शारीरिक पीडा देऊ नये, पूजेसाठी लागणाऱ्या वस्तूंवरील कर माफ करावी, देवालये बांधावीत, देवताध्यक्ष नेमला जावा ह्या तरतूदी केल्या आहेत.

राजाच्या अंगी धर्मश्रद्धा असली तरी कौटिल्य राज्याच्या हितसंबंधाना धर्मापेक्षा व नीतीपेक्षा जादा महत्त्व देतो. देवालयाची संपत्ती जमा करणे, राजाविरूद्ध कट करणाऱ्या राजकुमाराचा हेरांकडून विषप्रयोगाद्वारे खुन करणे, देशद्रोही मंत्र्यांचा खुन करणे, देशद्रोही लोकांवर विषप्रयोग, राजाच्या आकस्मिक मृत्यूचा गैरफायदा घेऊ पाहणाऱ्या शेजारच्या राजाचा खुन करविणे अशा अधार्मिक कृत्यांना राज्याच्या सुरक्षिततेसाठी कौटिल्य मान्यता देतो. परराष्ट्रीय व्यवहारात कौटिल्याचे कुटिलता अधिक तीव्र बनते. संधी मिळताच शत्रू राजास ठार मारावे, छुप्या कटाचा वापर करून शेजारील राजाचा घात करणे, शत्रू राष्ट्रावर विषारी द्रव्याचा वापर, शत्रूच्या प्रदेशात आगी लावणे, पाण्यात विष कालवणे, विश्वासघाताने शत्रू राजाचा वध इत्यादी अनैतिक वाटणाऱ्या उपायांचा वापरावर भर देतो. कौटिल्याच्या विचारावरून तो धर्म व नीती विरोधी विचारवंत वाटतो. परंतु त्याने सांगितलेली कुटनीती अंतर्गत व्यवहारात फक्त राजद्रोही व समाजकंटकापुरती सीमित ठेवतो. प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक वेळी कुटिल नीतीचा वापर कौटिल्याला मान्य नाही. संकटकाळाव्यतिरिक्त अन्य वेळी वापरल्या जाणाऱ्या नीतीबाह्य मानल्या जाणाऱ्या वर्तनाचा धिक्कार करतो. परदेशीय संबंधात विश्वासावर शपथेवर केलेली संधी भंग करू नये हे मत मांडले. तो निव्वळ अर्थविचार भर नसून धर्म, अर्थ आणि काम या तिन्ही गोष्टीवर भर देतो.

कौटिल्याच्या कूटनीतीमुळे त्यांची तुलना मॅकिव्हलीशी केली जाते. परंतु मॅकिव्हली प्रजेत भीती निर्माण करून राजाचे स्थान बळकट निर्माण करण्यास प्रवृत्त करतो तर कौटिल्य राजाने प्रजेवर पुत्रवत प्रेम करून प्रजेचा पाठिंबा मिळवावा हे मत व्यक्त करतो. मॅकिव्हलीचा मुनष्याच्या चांगुलपणावर विश्वास नाही. याउलट व्यक्ती स्वधर्मावर, वर्णाश्रम धर्मावर श्रद्धा ठेवण्यास सांगतो. चार पुरूषार्थ प्राप्ती करून देण्यासाठीच राज्याने अनुकूलता उपलब्ध करून द्यावी असे सांगतो. मॅकिव्हली राष्ट्रीय ऐक्याच्या मार्गात आडवी येत असल्याने धर्मसंस्थेवर राग व्यक्त करतो. कौटिल्य धर्मावरच अर्थ व काम अवलंबून असतो. मॅकिव्हली सर्वत्र कुटिल नीतीचा प्रयोग करावासा वाटतो. कौटिल्य कुटिल नीती फक्त राजद्रोही व शत्रूभोवती घोटाळणारी आहे. याचा अर्थ कौटिल्याची कुटनीती हिंदू धर्मनीती व परिस्थितीवर आधारलेली आहे. मॅकिव्हलीप्रमाणे मनुष्य स्वभावावर आधारलेली नाही. यातच कौटिल्याचे वेगळेपण मानता येईल.

**टिप- कौटिल्याच्या विचारांचे परीक्षण-** कौटिल्य हा ऐतिकतावादी, वास्तववादी राजकीय विचार मांडणारा विचारवंत मानला जातो. कौटिल्यानंतरच्या काळातील भारतीय विचारवंतांनी त्यांच्या विचारांना प्रमाणभूत मानूनच पुढे पाऊल टाकलेले आहे. त्यामुळे त्याचे स्थान अद्वितीय ठरले आहे. अर्थशास्त्राइतका राज्यप्रशासनावर दर्जेदार ग्रंथ नंतरच्या काळात निर्माण झाला नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, "कौटिल्याचा अर्थशास्त्र"ग्रंथांसंबंधी अभिप्राय देताना म्हणतात, 'या ग्रंथाइतका राजनीतिविषयक मूलगामी ग्रंथ संस्कृत भाषेत निर्माण झालेला आढळत नाही. प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती जाणून घेण्याच्या दृष्टीने अर्थशास्त्र हा एक वैशिष्टयपूर्ण साधनग्रंथ आहे.' यावरून या ग्रंथाचे महत्त्व लक्षात येते. कौटिल्याचे विचार प्राचीन परिस्थितीप्रमाणेच सध्याच्या परिस्थितीतही उपयुक्त वाटतात. म्हणून पाश्चात्य राजकीय विचारवंत ॲरिस्टॉटलशी कौटिल्याची तुलना केली जाते. कौटिल्याने तत्कालीन परिस्थिती व दूरदर्शीपणाने आपल्या विचारांना व्यावहारिकतेचे स्वरूप दिले. स्वतंत्ररीत्या विचार मांडणी करताना धर्म, नीती आणि राजकारण यात फारकत केली. बुद्धी व तर्कावर आधारित राज्याचे हितावर भर दिला. धर्म, नीती व न्यायबुद्धी पेक्षाही राज्याला श्रेष्ठत्व बहाल केले.

आंतरराष्ट्रीय संबंधाचे विवेचनात कौटिल्याने युद्ध, करार, शांतता, तह आदिबाबत कूटनीती मार्गदर्शन केले. हे कौटिल्याचे विचार आजही अभ्यासकांना उपयुक्त आहेत. गुप्तहेर, राजदूत, मंडळ सिद्धांत, सप्तांगसिद्धात इत्यादीचे विवेचन करून आपल्या शक्तीचा व कुटनीतीच्या वापरातून आपले प्रभाव क्षेत्र वाढविण्याचा सल्ला दिलेला आहे. आजची आधुनिक राज्य सुद्धा असाच प्रयत्न करताना दिसतात. कारण आधुनिक काळात गुप्तता, सल्लामसलत, आर्थिक दुरावस्थ व राज्याराज्याचे संबंध परस्पर संबंध पूर्वीपेक्षाही आज अधिक महत्त्वपूर्ण आहेत. म्हणून कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या नोंदी आजही महत्त्वपूर्ण वाटतात. भारतात राजनीतीशास्त्राची परिपूर्ण आणि स्वतंत्र प्रतिष्ठापना करण्याचे मौलिक श्रेय कौटिल्याला दिले जाते. त्याने राजाला सार्वभौमत्व बहाल करून प्रजेच्या हिताला दुय्यम स्थान दिले. अमात्य व पुरोहित्याच्या सल्लाने राजाने राज्य करावे असा उपदेश केला.

कौटिल्याने परराष्ट्रीय धोरण यशस्वी होण्यासाठी धर्माचा साधन म्हणून वापर केला. साधू-बैराग्याच्या वेषात हेरांना पाठवून त्याने धर्माचा गैरवापर केला असेही मत काही विचारवंतानी केला. त्याच्या परराष्ट्रविषयक धोरणातील कुटनीतीमुळे कौटिल्याची तुलना मॅकिव्हलीशी केली जाते. अर्थात काही बाबतीत ह्या दोघांच्या विचारात साम्य दिसून येते. दोघांचे विचार वास्तवतेवर आधारलेले आहेत. ते दोन्ही विचारवंत राज्यहिताला महत्त्व देतात. धर्म, नीती आणि राजकारणाची फारकत करतात. परंतु अधिक खोलवर जाऊन विचार केला तर मॅकिव्हली हा कौटिल्यापेक्षा अधिक उग्र विचारवंत होता. तो राज्यास अनीतीचे मार्ग वापरण्याची पूर्ण सवलत देतो. त्याच्या संपूर्ण तत्त्वज्ञानात त्याने नीतीशी फारकत घेतलेली आहे. राजाच्या धार्मिक कार्यावरही त्याने भर दिला आहे. कौटिल्याच्या तत्त्वज्ञान हे कुटिल नीतीचे तत्त्वज्ञान अशी ही टीका केली जाते. परंतु त्याने कुटिलनीतीचा अवलंब व्यावहारिक कारणासाठी मान्य केलेला आहे. सर्वत्र कुटनीतीचे समर्थन केलेले नाही. विशेषतः आंतरराष्ट्रीय संबंधाबाबत तो कुटनीतीला महत्त्व देतो.

राज्यशास्त्रात परराष्ट्रीय धोरण, कायदा, कल्याणकारी राज्य, न्याय आणि धर्म याबाबतीत त्याने मोलाची भर घातली आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. व्यावहारिक राज्यशास्त्रज्ञ म्हणून कौटिल्याचे नाव जगभर अजरामर झालेले

दिसते. प्लेटो आणि ॲरिस्टॉटलच्या पूर्वीच भारतात कौटिल्याने राज्यशास्त्रीय सिद्धांतात  मोलाची भर टाकलेली दिसते. यावरून त्यांच्या विचाराचे महत्त्व लक्षात येते.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. कौटिल्याने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव लिहा.
उत्तर- कौटिल्याने अर्थशास्त्र हा ग्रंथ लिहिलेला आहे.

२. कौटिल्याने सांगितलेले राज्याचे दोन घटक कोणते?
उत्तर- स्वामी, जनपद, अमात्य, दुर्ग, कोष, दंड व मित्र हे राज्याचे घटक सांगितलेले आहेत.

३. कौटिल्याने सांगितलेली राजाची प्रमुख दोन कर्तव्य लिहा.
उत्तर- राज्याचे संरक्षण, राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे, पशुसंवर्धन व कृषिव्यवस्था, राज्यविस्तार ही राजाची प्रमुख कर्तव्य आहेत.

४. कौटिल्याने सांगितलेल्या मंत्र्यांच्या योग्यता किंवा पात्रता कोणत्या?
उत्तर- उच्च कुलीन, बुद्धिवान, दूरदर्शी, उत्साही, मानसिक दृष्टीने आरोग्यवान आणि शुद्ध चारित्र्य इत्यादी पात्रता मंत्री म्हणून नेमणूक करण्यासाठी आवश्यक मानलेले आहेत.

५. मंडल सिद्धातातील कोणत्या चार राज्याचे कौटिल्याने वर्णन केले आहे.
उत्तर- विजिगिषु राज्य, अरिराज्य, मध्यम राज्य, उदासीन राज्य ह्या चार राज्याचे वर्णन कौटिल्याने मंडळ सिद्धांतात केलेले आहे.

६. कौटिल्याच्या परराष्ट्र नीतीतील सहा नीती कोणत्या ते सांगा.
उत्तर- संधी, युद्ध, तटस्थता, यान, मैत्री आणि द्वैवीभाव ह्या सहा नीती कौटिल्याने वर्णन केलेल्या आहेत.

७. युद्धात विजय मिळविण्यासाठी कौटिल्याने कोणते दोन मार्ग सांगितले आहेत.
उत्तर- शत्रूराज्यात आगी लावणे, लोकांना विषबाधेने मारावे, हेराच्या मदतीने शत्रू राष्ट्रातील जनतेत फूट पाडणे, प्रलाभने दाखवून शत्रू राष्ट्रातील जनतेते असंतुष्ट करावे, शत्रू राष्ट्रातील युद्ध सामुग्री व सैन्याची पूर्ण माहिती काढावी, शत्रूच्या शेजारील राष्ट्रांना त्याविरूद्ध चिथावणी द्यावी हे मार्ग युद्धात विजय मिळविण्यासाठी कौटिल्याने सांगितले आहेत.

८. कौटिल्याच्या कुटनीतीची तुलना कोणत्या पाश्चिमात्य विचारवंताशी केली जाते.
उत्तर- कौटिल्याच्या कुटनीतीची तुलना मॅकिव्हली या पाश्चिमात्य विचारवंताशी केली जाते.

९. कौटिल्याने वर्णन केलेले न्यायालये कोणती?
उत्तर- संग्रहण न्यायव्यवस्था, स्थानिक न्यायालय, द्रोणमुख न्यायालये इत्यादी न्यायालयाचे वर्णन केलेले आहे.

१०. कौटिल्याचे धर्म, नीती व राजकारणाविषयी विचार सांगा.
उत्तर-कौटिल्य हा कुटिल राजकारणाचा पुरस्कर्ता असला तरी तो धर्माचा विरोधक नव्हता. त्याने वेद अभ्यास व वर्णाश्रम धर्माला महत्त्व दिले आहे. राजाच्या अंगी धर्मश्रद्धा आवश्यक मानली असली तरी तो राजाला धर्म व नीतीपेक्षा श्रेष्ठ मानतो. राजहितासाठी धर्म व नीतीचे उल्लंघन करण्यास परवानगी देतो. तो धर्म व नीतीपेक्षा राज्याच्या हितसंबंधाला जादा महत्त्व देतो.

## प्रकरण-२ रे
## राजा राममोहन रॉय
## (१७७२ ते १८८३)

**जीवन परिचय -**

राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील राधानगर येथे झाला. बॅनर्जी हे त्यांच्या घराण्याचे मूळ आडनांव होते पण त्यांचे पणजोबा कृष्णचंद्र बॅनर्जी बंगालच्या नबाबाच्या पदरी नोकरीला होते. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून नबाबाने त्यांना रॉय -रॉयन ही पदवी दिली होती. या पदवीमुळेच त्यांच्या घराणे रॉय या आडनांवाने ओळखले जाऊ लागले. दिल्लीच्या बादशहाने आपली बाजू मांडण्यासाठी रॉयना आपला प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला पाठविले होते. त्यासाठी त्यांना राजा ही पदवी दिली होती. रॉयचे वडील बंगालमधील सधन जमीनदार होते. त्यांच्या वडीलांनी त्यांना घरीच फारशी आणि अरबी भाषेचे शिक्षण दिले. त्या भाषाचा अभ्यास करतांना इस्लाम धर्मातील सुफी पंथाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. रॉय यांनी बनारस येथे संस्कृतचा अभ्यास केला. सुफी संपद्राय, केन व इश उपनिषदे आणि इस्लाम धर्मातील तत्त्वज्ञानाच्या प्रभावातून मूर्तिपूजा विरोध आणि एकेश्वरवादाचा पुरस्कार करू लागले. रॉयच्या या विचारामुळे वडीलांशी धार्मिक मतभेद निर्माण झाले. त्यामुळे त्यांना घर सोडून तिबेटला गेले. तेथे बौद्ध धर्माचा अभ्यास केला. तिबेटमध्ये बौद्ध धर्मातील तत्त्वांचे आचरण योग्य मार्गाने होते नव्हते. बौद्ध तत्त्वांचा चुकीचा अर्थ घेतला जात होता म्हणून त्यांनी प्रखर टीका केल्यामुळे तिबेट सोडावे लागले. रॉय पुढे मुर्शिदाबादला गेले.त्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीत शिरस्तेदार पदी नोकरी पत्करली. सामाजिक सेवाच्या उद्देशाने नोकरीचा त्याग करून कलकत्ताला आले. तेथे त्यांनी 'आत्मीय सभे' ची स्थापना केली. या सभेच्या मदतीने सतीबंदीसाठी चळवळ आणि जनजागृतीची मोहिम सुरू केली. त्यांच्या प्रयत्नाला यश आले. गर्व्हनर जनरल लार्ड विल्यम बेंटिकच्या मदतीने सती चालीवर बंदी आणणारा कायदा केला. दिल्लीच्या राजाची बाजू मांडण्यासाठी इंग्लंडला गेले होते. इंग्लंडमधील वास्तव्य काळात अनेक उदारमतवादी विचारवंताशी सहवासात उदारमतवादाचा प्रभाव त्यांच्यावर पडला. इंग्लड मधुन परत येताना १८३३ मध्ये ब्रिस्टॉल बंदरात रॉयचे निधन झाले. रॉयनी मिरात-अल-अखबार आणि संवाद कौमुदी हे वर्तमानपत्र चालविले. त्यांनी केन उपनिषद आणि वेंदाचा सारांश, तौफातुल मुसाहिदिन, प्रिसेप्टस ऑफ जिझस इ. ग्रंथाचे लेखन केले.रॉयच्या विचारांवर सुफी संपद्राय, उपनिषदे, इस्लाम धर्मातील एकेश्वरवाद आणि युरोपातील उदारमतवादाचा प्रभाव दिसून येतो.

**प्र.१ला राजा राममोहन रॉयचे सामाजिक व धार्मिक सुधारणाबाबतचे विचार स्पष्ट करा?**

रॉय हे मूलतः सामाजिक व धार्मिक सुधारक होते. भारतात धार्मिक क्षेत्रात अनागोंदी व कर्मकांडाचे प्रस्थ माजले होते. श्रद्धा आणि अंधश्रद्धेतील फरक समाजात राहिला नव्हता. सामाजिक क्षेत्रात रूढी, प्रथा आणि परंपरेने थैमान घातले होते. रूढी आणि परंपरेने ग्रस्त असलेल्या समाजात सामाजिक परिवर्तनाशिवाय प्रगती शक्यता वाटत नव्हते. म्हणून सामाजिक क्षेत्रात क्रांतिकारक बदलाची आवश्यकता रॉय अपेक्षा व्यक्त करतात. त्यासाठी पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. नवीन ज्ञानाचे दरवाजे भारतीयासाठी खुले झाले पाहिजे यावर भर देतात. निव्वळ हिंदु धर्मात सुधारणा घडवून आणणे हे मर्यादित उद्दिष्ट नव्हते तर सर्व मानव जातीचे कल्याण त्यांना अपेक्षित होते. भारताच्या राजकीय आणि सामाजिक अधःपतनास अनिष्ठ रूढया परंपरा जबाबदार मानतात. म्हणून रॉय सामाजिक सुधारणेबाबत ते आध्यामिक विचाराना महत्त्व देतात. हिंदुसमाजाचे वा मानव जातीचे कल्याण व्हावे यासाठी पुढील सामाजिक व धार्मिक विचार सुधारणा केलेल्या दिसतात.

१. **सतीप्रथेस विरोध -** भारतात अनेक शतकापासून सतीची अमानुष व क्रूर प्रथा अस्तित्वात होती. काही राज्यकर्त्यांनी ही प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु यश आले नाही. रॉयच्या काळात स्त्रियांची परिस्थिती अत्यंत शोचनिय होती. स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते. बालविवाहाची प्रथा समाजात सर्रास सुरू होती. घर हे स्त्रीचे कार्यक्षेत्र मानल्यामुळे शिक्षणापासून मुद्दामच दूर ठेवले होते. स्त्रियांना वारसा हक्क नव्हता. पुरूषांना बहुपत्नीत्वाचा

अधिकार होता. विधवाची परिस्थिती पशूपेक्षाही दयनीय होती. त्यामुळे स्त्रिया विधवा राहण्याऐवजी सती जाणे पसंत करीत होत्या. सती म्हणजे पत्नीने स्वतःला पतीच्या चितेवर दहन करणे होय. पती निधनानंतर पत्नीला सती जावे लागे. सुरूवातीला स्त्रिया आपल्या मर्जीने सती जात होत्या त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची सक्ती केली जात नव्हती. मात्र नंतरच्या काळात सती जाण्यास पत्नी तयार नसेल तर जबरदस्ती सती जाण्यास भाग पाडले जाऊ लागले. १८११ मध्ये रॉयचे थोरले बंधु जगमोहन वारले त्यांच्या पत्नीने सती जाण्याचा निर्णय घेतला. रॉयनी त्यांना सती जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण यश आले नाही. या अमानुष प्रथेविरूध्द रॉयनी आत्मीय सभेच्या माध्यमातून आंदोलन सुरू केले. या प्रथेविरोधात समाजात जनजागृती घडवून आणली. रॉयच्या प्रयत्नाला यश येऊन १८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लार्ड विल्यम बेंटिग यांनी सती बंदीचा कायदा केला. आणि या प्रथेस कायमची मुठमाती दिली. रॉय यांनी केलेल्या कार्यामुळे सतीप्रथासारखी अमानुष प्रथा नष्ट झाली.

२. **हिंदुधर्मावर टिका व सुधारणा-** प्रचलित हिंदु धर्मात आढळुन येणारी मूर्तिपूजा व धर्ममार्तंडानी स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी चालविलेल्या प्रयत्नावर रॉयनी टिका केली. कमर्काड, जपतप, नवैध आणि इतर अनिष्ट प्रथामुळे हिंदु धर्माचे अधःपतन झाले. समुद्रपर्यटनावरील बंदीमुळे हिंदुस्थान व्यापार मागे पडला. म्हणून रॉयनी समुद्र पर्यटनाचे समर्थन करून स्वतः समुद्र मार्गे विदेशात गेले. हिंदू धर्मातील कर्मकांड, जपतप, पापपुण्य, स्वर्ग व नरकाच्या कल्पनामुळे समाजात अंधश्रद्धा बळावली. वाढत्या अंधश्रद्धामुळे हिंदू समाज खऱ्या धर्मतत्वापासून अलिप्त राहिला हे कर्मकांड नष्ट करण्यासाठी रॉयनी संवाद कौमुदी वर्तमानपत्र सुरू करून समाजप्रबोधनाचे कार्य केले.

३. **ब्राम्हो समाज-** रॉयने समाजसुधारणा घडवुन आणण्याकरिता आत्मीय सभा नावाची संस्था काढली. त्यानंतर १८२८ मध्ये ब्राम्हो समाज संस्थेची स्थापना केली. रॉय धार्मिकदृष्टया उदारमतवादी विचारांचे असल्याने अनिष्ट चालीरीती, अंधश्रंद्धांना त्यांचा कट्टर विरोध होता. त्यांना बालपणापासून मिळालेल्या सूफी तत्त्वज्ञानाची शिकवण आणि उपनिषदांच्या अभ्यासातून ते एकेश्वरवादी आणि मूतिपूजेचे विरोध बनले होते. समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी सर्व धर्म ग्रंथाचा अभ्यास करुन वेंदाचा सारांश व केन उपनिषद हे ग्रंथ लिहलेले. सर्व धर्माचा अभ्यास केल्यामुळे सर्व धर्माची मूलतत्वे समान आहेत याचे ज्ञान प्राप्त झाले.ब्राम्हो समाजाची स्थापना कोणताही एक पंथ निर्माण करण्याच्य हेतूने झाली नाही. ब्राम्हो समाज स्थापना करण्यामागे सर्व धर्माच्या अनुयायांना उपासना करण्याचे एक साधन प्राप्त व्हावे हा उद्देश होतो.वंश आणि पंथाची बंधने तोडून मानव जातीत ऐक्य साधण्याचा तो एक प्रयत्न होतो. जगात ईश्वर एक असुन तो विश्वाचा निर्माता आहे. तो निगुण निराकार आहे.सर्व विश्वाचा निर्माता तोच आहे.ही ब्राम्हो समाजाची मुख्य शिकवण आहे.त्या जगतचालक ईश्वराची उपासना करण्याचे ठिकाण म्हणून ब्राम्हो समाज मंदिरे स्थापन करण्यात आली.१९३० मध्ये सर्वप्रथम कलकत्ता येथे ब्राम्हो समाजाचे पहिले मंदिर स्थापन करण्यात आली. ईश्वर उपासना करण्याचे ठिकाण म्हणून ब्राम्हो समाज मंदिरे सर्व धर्मीयाकरिता खुली होती. मंदिरात कोणत्याही देवाची मुर्ती ठेवली जात नसे.धार्मिक प्रतीकांना स्थान नव्हते. देवाच्या नावाने प्रार्थना म्हटल्या जात नसत.वेगवेगळया धर्म ग्रंथावर चर्चा होत असत.धार्मिक प्रतिकांना स्थान नव्हते. वेद, भगवतगीता पठन, उपनिषद निरूपण आणि भक्ती गीताचे गायन असा उपासनेचा कार्यक्रम असे.हिंदू धर्मातील मूलतत्त्वावर आघात न करता इस्लामची एकेश्वरवादाची कल्पना, उपनिषदातील आत्मज्ञानाचा सिद्धांत, येशू ख्रिस्ताची नैतिक शिकवण आणि भारतातील संतांनी निर्माण केलेल्या भक्ती संप्रदायांनी सांगितलेला भक्ती मार्ग या सर्वांचा समन्वय करण्याचा रॉयनी प्रयत्न केला. रॉयनी ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून धार्मिक कर्मकांडचा त्याग करून सोपी उपासना पद्धती निर्माण करून धार्मिक सहिष्णूता व सामाजिक ऐक्य निर्मितीचा प्रयत्न केला.

४. **एकेश्वरवादाला समर्थन व मुर्तिपुजेला विरोध -** रॉयवर इस्लाम धर्मातील सुफी पंथ व उपनिषदाचा प्रभाव असल्याने ते एकेश्वरवादाचे समर्थन करतात. परमेश्वर एक असुन तो निगुण व निराकार असल्यामुळे मूर्ती रूप त्यांची पुजा करू नये .म्हणून ते मूर्तीपुजला विरोध करतात. हिंदू धर्मातील पुजा पद्धतीवर टिका करतात .मूर्ती रूपात

देवाची कल्पना बुध्दीला पटणारी नाही. मूर्तीपूजेला वेद व उपनिषदाचा आधार नाही. हे पटवुन देण्यासाठी वेंदाचे बंगालीत भाषांतर केले.

५. **विश्वमंदिर व विश्वधर्म उभारणी -** रॉयनी सर्व धर्मियासाठी कलकत्ता येथे विश्वमंदिराची स्थापना केली. कारण विश्वाचा कर्ता करविता एकच परमेश्वर आहे. सर्व धर्माची मूलतत्वे एकच असुन मानवाने धर्माधर्मात भेदभाव निर्माण केल . हा भेदभाव दूर करण्यासाठी आणि सर्वांना उपासना करण्याचे ठिकाण म्हणून विश्वमंदिराची उभारणी केली. जेणे करून सर्व लोक भेद विसरून वैश्विक धर्माची स्थापना करतील.

रॉयच्या काळात हिंदू समाज रूढी, परंपरा, धार्मिक अंधश्रद्धा, कर्मकाड, जातीव्यवस्था यात गुरफलेला होता. हिंदू धर्मातील प्रत्येक गोष्ट बुद्धी आणि विज्ञानाच्या आधारावर तपासणी केल्याशिवाय स्वीकारू नये या विश्वासातून रॉय धार्मिक आणि सामाजिक सुधारणेसाठी आपले आयुष्य वेचले होते.१८२९ साली लिहिलेल्या लेखात हिंदू धर्मातील प्रचलित धर्म व समाजव्यवस्थेतून राजकीय हिताची वृद्धी होऊ शकत नाही हे मत मांडले. भारताच्या राजकीय अधोगतीस हिंदू धर्मातील कर्मठ स्वरूप आणि अनिष्ट रूढयांना जबाबदान मानून त्या नष्ट करण्यासाठी विविध उपाययोजना ते सूचवितात.

**टिप:- रॉयचे स्त्रिया वा स्त्री सुधारणाबाबतचे विचार**

हिंदु धर्मात केशवपन, सती प्रथा, बालविवाह, जातीव्यवस्था इ.रूढया प्राचीन काळापासून असित्वात आहेत. त्या नष्ट करण्यासाठी धार्मिक क्षेत्रात क्रांतीकारी बदल केले पाहिजे. त्यासाठी भारतीयांनी पाश्चिमात्य शिक्षणाचा अवलंब करून ज्ञानाची नवी क्षितिजे आत्मसाथ केली पाहिजे. कारण भारताच्या राजकीय अधोगतीस सामाजिक रूढया कारणीभूत आहेत. लोक रूढयांना चिटकुन राहिल्यामुळे राजकीय दृष्टया आपण पराभूत झालो.या अमानुष रूढया स्त्रीया व समाजाच्या विकासाच्या शत्रू आहेत. समाज व स्त्रीयाच्या विकासाकरिता या रूढया नष्ट होण आवश्यक आहेत.

१) **बहुपत्नीवास विरोध -** हिंदू धर्मात बहुपत्नीत्वाची रूढी असित्वात होती. रॉयच्या मते एक पुरूषाने एकच स्त्रीशी विवाह केला पाहिजे.पहिली पत्नी जीवंत असतांना दूसरा विवाह करू देवू नये. पहिली पत्नी मरण पावली असेल तर न्यायाधीशाच्या परवानगीने दुसरा विवाह करावा.या विचारातून रॉय बहुपत्नीवाला विरोध करतात.

२) **वारसा हक्क -** हिंदू धर्मात स्त्रीयाना दुय्यम मानले जाते. हिंदू वारसा हक्कानुसार स्त्रीयांना मालमत्तेत वाटा दिला जात नसे. पतीच्या निधनानंतर त्यांच्या मालमत्तेचा हक्क फक्त मुलांला दिला जात असे. स्त्रियांवरील या अन्यायाविरूद्ध रॉय यांनी सर्वप्रथम आवाज उठविला. मुलांबरोबर पत्नीला देखील समान हक्क दिला याचे समर्थन केले. रॉयनी पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीयांना मालमत्तेत वाटा दिला जावा सासरच्या नव्हे तर माहेरच्या संपत्ती सुध्दा वाटा दिला पाहिजे हे सांगुन स्त्रीयाच्या वारसा हक्काचे समर्थन केले.

३) **विधवा पूर्नविवाहाचे समर्थन-** हिंदु धर्मात पुर्नविवाहाला बंदी होती .त्यामुळे विधवाना अत्यंत हलाखीचे जीवन जगावे लागत असे. त्यामुळे स्त्रीया विधवा राहण्याऐवजी सती जाणे पसंत करत. हा अन्याय दूर करून त्यांना न्याय मिळवून देण्याकरिता रॉयनी विधवा विवाहाचे समर्थन केले.विधवांना सामाजिक प्रतिष्ठा व संरक्षण मिळवायचे असेल तर त्यांचे पूर्नविवाह झाले पाहिजे. त्यासाठी विधवा पुर्नविवाह ही संस्था काढुन श्रीमंताच्या मदतीने विधवाचे पुर्नविवाह घडवून आणले.

४) **स्त्री शिक्षणाचा पुरस्कार-** स्त्रियांची अज्ञानातून मुक्तता होण्यासाठी रॉय यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. जोपर्यंत स्त्री अज्ञानातून मुक्त होणार नाही तोपर्यंत स्त्रियाची उन्नती होणार नाही असे रॉयना वाटत असे. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान शिक्षण अधिकाराचे ते समर्थन करतात.

रॉय यांनी सती प्रथेसोबत स्त्रियांना अन्यायकारण जीवन व्यतित करण्यास भाग पाडणाऱ्या सर्व प्रथांना विरोध केला. स्त्रियांची पुरूषांच्या बरोबरीने विकास व्हावा म्हणून रॉय यांनी आयुष्यभर प्रयत्न केलेले आहेत.

**प्र.२ रा राजा राममोहन रॉयचे राजकीय विचार स्पष्ट करा?**

सुरेंद्रनाथ बॅनजी यांनी रॉयना भारतातील सनदशीर चळवळीचे जनक म्हटले आहे. कारण रॉय पूर्वी जनतेत राजकीय हक्काबद्दल जागृतता अस्तित्वात नव्हती.भारतात राजकीय जागृतीची सुरूवात सर्वप्रथम रॉयनी केली. ब्रिटिशांनी काढलेल्या ावृत्तपत्र स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या वटहुकुमाच्या विरोधात रॉयनी प्रथम अर्ज केला. रॉयची ही कृती म्हणजे भारतीयाच्या हक्कासाठी उचलेले पहिले पाऊल होते. रॉयचे राजकीय विचार पुढील मुद्दाच्या आधारे सांगता येतात.

१) **ब्रिटिश शासनाचे स्वागत -** लहानपणी रॉय यांना ब्रिटिश सत्तेविषयी धृणा वाटत होती. परंतु शिक्षण घेत असतांना ब्रिटिश शासन पद्धतीचे स्वरूप जाणून घेतल्यानंतर ते ब्रिटिश राजवटीचे समर्थन करू लागले. रॉयच्या मते ब्रिटिश पूर्व भारतीय इतिहासाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, संपत्तीची लुटमार, वारंवार होणारी युद्धे व राजकीय अस्थिरता, धर्माचा अपमान इ. मुळे जनतेत असुरक्षितता निर्माण झाली. ते म्हणतात की, ब्रिटिशांनी भारतीयांना केवळ प्रदीर्घ व जुलमी राजापासून मुक्त केले नाही तर भारतीय राष्ट्र इंग्लंड राष्ट्राच्या नियंत्रणाखाली आणले. जे राष्ट्र त्यांच्या प्रभाव क्षेत्राखाली असलेल्या राष्ट्रामध्ये स्वदेशाप्रमाणे स्वातंत्र्य व सामाजिक सुख निर्मितीचा प्रयत्न करतात हे मत व्यक्त करून ब्रिटिश राजवटीविषयी आपली निष्ठा व विश्वास व्यक्त केला. ब्रिटिशांनी भक्कम प्रशासन व्यवस्था व कायदयाचे राज्य निर्माण केले. हिंदू व मुसलमानात भेदभाव न करता समान अधिकार दिले. शाळा, रेल्वे, तार व पोस्ट, उदयोगधंदाची निर्मिती इ.सुधारणा केल्यामुळे ब्रिटिशांचे आगमन रॉयना ईश्वरी कृपा वाटते म्हणून ते ब्रिटिश राजवटीचे समर्थन करतात. ब्रिटिश साम्राज्यामुळे भारतीयांची प्रगती केल्यामुळे त्यांना ब्रिटिशाबद्दल आदरभाव होता. हा आदरभाव कमी होऊ नये म्हणून ब्रिटिशांशी संघर्षाची भूमिका घेऊ नये हे रॉयचे मत होते. ब्रिटिशाच्या सहकार्याशिवाय भारताची प्रगती शक्य नसल्याने भारतीयांनी ब्रिटिश राजवटीला विरोध करू नये तर ब्रिटिशांचे सहकार्य घेऊन आपला विकास घडवून आणावा हे रॉयचे मत होते.

२) **व्यक्ती व अभिव्यक्ती स्वातंत्र्य अधिकार -** रॉयनी व्यक्ती स्वातंत्र्याबद्दल प्रभावी विचार मांडलेले आहेत. व्यक्ती स्वातंत्र्य समाजाचा प्राण असतो. व्यक्ती केवळ शरिराने स्वतंत्र असून उपयोगी नाही तर मनाने स्वतंत्र असली पाहिजे म्हणून ते विचार स्वातंत्र्याबरोबर कृती स्वातंत्र्याचे समर्थन करतात.प्रत्येक व्यक्तीला भाषण, लेखन, धर्म व सामाजिक स्वातंत्र्य दिली जावी अशी मागणी करतात.रॉयची विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची कल्पना वेद व उपनिषदावर आधारित आहे. स्वातंत्र्य हा वेदाच्या तत्वज्ञानाचा गाभा होता. हिंदू तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातून त्यांच्या मनात स्वातंत्र्य संकल्पनेविषयी आत्मियता निर्माण झाली. त्यांच्या स्वातंत्र्य संकल्पनेत पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा उत्कृष्ट संगम दिसून येतो. सामाजिक व राजकीय अन्यायातून समाजाची मुक्ती करण्यासाठी ते व्यक्ती स्वातंत्र्याची मागणी करतात. समाजातील अन्याय, शोषण नष्ट होऊन सर्वांना मुक्त जीवन विकासाची संधी मिळावी त्यासाठी विविध प्रकारच्या स्वातंत्र्याची मागणी ब्रिटिशाकडे करतात. ब्रिटिश भारतीयाच्या रास्त मागण्याकडे दुर्लक्ष करतात म्हणून ते वेळप्रसंगी ब्रिटिशांवर देखील टीका करतात.रॉय उच्चार आणि विचार स्वातंत्र्याचे महत्त्व जाणून त्यांचे समर्थन करतात. ब्रिटिश जनतेला विचार, भाषण स्वातंत्र्य ब्रिटिश देतील असा रॉय यांना विश्वास होता. कारण विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याशिवाय भारताची प्रगती अशक्य आहे असे रॉय यांना वाटते.

३) **जीवन जगण्याचा हक्क -** जीवीताचा हक्क हा समाजातील सर्वात प्रमुख व महत्त्वपूर्ण हक्क मानला जातो. जीविताच्या हक्कांवर इतर सर्व हक्क अवलंबुन असतात. हा हक्क नसेल तर व्यक्तीचे जीवन पशू प्रमाणे होईल. त्यासाठी शासनाने जीवन जगण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. हा अधिकार नसेल तर व्यक्ती जीवनाचे रूपांतर गुलामीत होईल. ब्रिटिश राजवटीचे अस्तित्व मान्य करूनही रॉय त्यांच्याकडून जीवन जगण्याच्या अधिकाराचा सन्मान करतील अशी अपेक्षा व्यक्त करतात.

४) **शैक्षणिक स्वातंत्र्य -** व्यक्ती विकास व समाज परिवर्तनाकरिता रॉय शैक्षणिक स्वातंत्र्याला खूप महत्त्व देतात. कारण निरक्षरतेमुळे भारताचे फार मोठे नुकसान झालेले आहे. शिक्षणामुळे व्यक्तीत जागृतता निर्माण होऊन समाज

व देशापुढील समस्याचे चांगल्या पद्धतीने आकलन होऊ शकेल. तसेच शिक्षणातून उपजीवकेचे साधन प्राप्त होऊ शकते. शिक्षणातुन नव्या प्रेरणा व ज्ञान प्राप्त होऊन भारतीय समाज अंधश्रद्धेतून मुक्त होऊ शकेल. म्हणून रॉय यांनी शैक्षणिक स्वातंत्र्याचे समर्थन करून ब्रिटिश शासनाच्या मदतीने शैक्षणिक प्रसार करण्याचे प्रयत्न करतात. रॉय यांनी भारतीय जनतेसाठी पाश्चिमात्य शिक्षण सुरू केले. रॉय यांनी शिक्षणाच्या इंग्रजी माध्यमाचे समर्थन केले तसेच स्त्रिया यांना देखील पुरुषांच्या बरोबरीने समान संधी उपलब्ध करून द्यावी या मागण्या इंग्रजाकडे केलेल्या दिसतात.

**५) वृत्तपत्र व मुद्रण स्वातंत्र्य-** रॉय हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे मानवी स्वातंत्र्याचे मूलाधार मानीत असत. ब्रिटिश काळात वर्तमानपत्रे सरकारच्या कार्यावर जाहीर टीका करत असत. वर्तमानपत्रामुळे भारतीयामध्ये असतोषाची भावना निर्माण होईल या अनामिक भीतीतून वृत्तपत्र स्वातंत्र्य ही ब्रिटिशांना अडचणीची बाब वाटत होती. त्या काळात भारतात मद्रास इंपेरियल व बॉम्बे गॅझेट ही वर्तमान पत्र प्रकाशित होत होती. पण सरकारने कायदा करून वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंदी लादली. गर्व्हनर लॉर्ड ॲडम्सने वृत्तपत्र स्वातंत्र्याचा संकोच करणार वटहुकुम काढला. मिस्टर बॅकिंग हॅम यांना देश सोडुन जाण्यास सांगितले. रॉय व बॅकिग हॅम यांनी या वटहुकुमाविरूध्द कलकत्ता उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला तो फेटाळला गेला. राजा व कार्यकारी मंडळाकडे अर्ज केला तो ही फेटाळला गेला. त्या निषेधार्थ रॉयनी आपले पर्शियन भाषेतील मिरात-अल-अखबार हे वर्तमान पत्र बंद केले. ब्रिटिशांनी त्या काळात वृत्तपत्र स्वातंत्र्याला विरोध केला. भारतीय वृत्तपत्रे ही खऱ्या अर्थाने जनमतावर आधारलेली नाहीत त्यामुळे वृत्तपत्र स्वातंत्र्याची मागणी अनावश्यक आहे. या स्वातंत्र्यामुळे लोकमत सरकारविरूद्ध होण्याची शक्यता ब्रिटिशांना वाटत होती. सरकारविषयी भीती जनतेत राहणार नाही. वृत्तपत्रातील भडकावू लिखाणामुळे सरकार विरूद्ध भावना वाढत जाऊन सरकार अस्थिर होईल या अनामिक भावनेतून ब्रिटिशांना भारतात वृत्तपत्र स्वातंत्र्य अनावश्यक वाटत होते त्यामुळे त्यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याला विरोध केला.

रॉयच्या मते वृत्तपत्र लोकमत घडविण्याचे प्रभावी साधन आहे. या साधनाच्या माध्यमातून सरकारवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मार्गाने नियंत्रण ठेवता येते. भारतीयाना शासनाचे कार्य कसे चालते हे वृत्तपत्रातून समझते.वृत्तपत्रावर बंधने टाकल्यास ते ज्ञान जनतेला प्राप्त होणार नाही आणि ज्ञानाचे वाटप थांबेल. वर्तमान पत्र दूहेरी भूमिका पार पाडतात. जनतेच्या मागण्या शासनापर्यत पोहचविणे आणि शासनाची धोरण व कार्यक्रम जनतेपर्यंत पोहचविणे. हे वृत्तपत्राचे प्रभावी काम असते. रॉयच्या मते राजा प्रजेला अंधारात ठेवत असेल तर प्रजेच्या मनात राजाबद्दल तिरस्कार निर्माण होईल ही गोष्ट ब्रिटिश सामाज्यासाठी अंत्यक घातक आहे. कारण स्वतंत्र्य वृत्तपत्रानी कोणत्याही देशात हिंसात्मक क्रांती घडवून आणली नाही. जर जनतेला आपल्या मागण्या शासना समोर मांडता येतात तोपर्यंत जनतेच्या मनात बंडाची भावना तयार होत नाही. म्हणून सरकारने जनतेच्या कल्याणाकरिता ते वृत्तपत्र स्वातंत्र्याची मागणी करतात. रॉयच्या विचारामुळे हा वटहुकुम रद्द झाला. रॉयनी स्वतः बंगाली भाषेत संवाद कौमुदी हे वर्तमानपत्र चालविल्यामुळे ते वृत्तपत्र स्वातंत्र्याबद्दल प्रभावी विचार माडु शकले.

**६) कायदा व रूढी बाबत विचार -** रॉयचा कंपनी सरकारवर विश्वास नव्हता.भारतासाठी कायदे कंपनीच्या नोकरानी न करता ब्रिटिश पार्लमेंटने करावे. रॉयचा कंपनी सरकारवर विश्वास नव्हता. कंपनीचे अधिकारी जुलमी वृत्ती व पक्षपातीपणे वागणारे आहेत. त्यांनी तयार केलेले कायदे देखील त्यांच्या वृत्तीशी मिळतेजुळते राहतील म्हणून भारतासाठी कायदे ब्रिटिश पार्लमेंटने करावे असा आग्रह रॉय धरतात. भारतीय लोकांना कायदे निर्मितीच्या कार्याचा अनुभव नसल्याने कायदे निर्मिती अनुभव  असलेल्या ब्रिटिश पार्लमेंटने कायदे करणे भारतासाठी हितकारक ठरेल. शेकडो मैल लांब असलेल्या पार्लमेंट सदस्यांना भारतीय प्रश्नांची जाण नसेल त्यासाठी त्यांनी कायदा करतांना सुशिक्षित भारतीयाचा सल्ला घ्यावा याचा अर्थ कायदा करण्याआधी ब्रिटिशांनी भारतीयाचे मन जाणून घ्यावे. कायदा भारतीयासाठी लाभदायक होण्यासाठी कायद्याची चर्चा एखाद्या तज्ञ समितीच्या बैठकीत करावी. हे तज्ञ सदस्य भारताच्या परिस्थितीशी सुसंगत रूप कायदयाला देऊ शकतील. कायदे निर्मितीसाठी वर्तमानपत्रांना स्वातंत्र्य द्यावे. सुशिक्षित लोक भारतीयाच्या समस्या वर्तमानपत्रात मांडतील, त्यांचा आधार घेऊन पार्लमेंटने कायदा तयार करावा.

रॉयनी कायदयाच्या अधिराज्याबद्दल विचार मांडले. कायद्याच्या अधिराज्याची संकल्पना त्यांनी इंग्रजांकडून स्वीकारली. देशाचा कारभार व्यक्तीच्या लहरीवर न चालता कायदयाच्या आधारावर चालवावा. कायदे सर्वांसाठी समान असावे. कायदयाचे समान संरक्षण सर्वांना दिले जावे. भारतातील विविधधर्मीयांसाठी एक प्रकारचा कायदा असावा. समाजातील अनिष्ट रूढया कायदा करून नष्ट कराव्यात. कायदा करतांना कायदा पास करण्याचा अधिकार सार्वभौम सत्तेला म्हणजे संसदेला असला पाहिजे आणि दुसरे तत्त्व म्हणजे जनतेच्या इच्छा-आकांक्षा लक्षात घेऊन सरकारने कायदा करावा हा आधुनिक स्वरूपाचा विचार रॉय कायद्याबाबत मांडले आहेत.

**७) न्यायविषयक विचार वा सुधारणा-** रॉय यांनी ॲन एक्स्पोझिशन ऑफ रेव्हन्यू अँड ज्युडिशियल सिस्टीम इन इंडिया या ग्रंथात न्याय व्यवस्थेबाबत सखोल व मूलग्राही स्वरूपाचे विचार मांडलेले आहेत. या ग्रंथातील विवेचनाचा मुख्य भर न्यायव्यवस्थेत प्रशासकीय सुधारणा घडवून आणणे हा आहे. न्यायमंडळाचे स्वातंत्र्य कायम ठेवण्यासाठी कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ पासून न्यायमंडळ स्वतंत्र व अलग असावे. न्यायालयाच्या कामकाजात गुप्तता नसावी. कामकाजाला वर्तमान पत्रातून प्रसिध्दी दिली जावी. लोंकाना त्वरीत न्याय दिला जावा. त्यामुळे जनतेच्या मनात न्यायाबद्दल आपुलकी निर्माण होईल. न्यायाधीशाची संख्या वाढवावी त्यामुळे जलद न्यायदान करणे सोपे होईल. न्यायाधीश नेमतांना न्यायक्षेत्रातील अनुभवी लोंकाचीच नेमणूक केली जावी. न्यायादानाकरिता ज्यूरी पद्धतीचा अवलंब करावा.न्यायालयाचे कामकाज देशी भाषेत चालवावे. खटला चालु ठेवण्याआधी न्यायाधीशाचे नांव गुन्हेगाराना समझु नये .तसेच न्यायाधीशाने भ्रष्टाचार करू नये म्हणून त्यांचे वेतन व भत्ते वाढवावे. न्यायाधीशानी जनतेपासून अलिप्त राहावे. त्यांना जनतेत मिसळू देऊ नयेत. ब्रिटिशाविरूद्धचे खटले ऐकण्याचा अधिकार हिंदुस्थानी न्यायाधीशाना असावा. न्यायालयीन कामकाजावर लोकमताची देखरेख आवश्यक असते. अशा महत्त्वपूर्ण सुधारणा रॉय यांनी न्यायव्यवस्थेच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी सूचविलेल्या आहेत.

**टिप- रॉयचे शिक्षण विषयक विचार वा सुधारणा-**

रॉय यांनी शिक्षण क्षेत्राबद्दल प्रभावी चिंतन केलेले आहे. भारतासाठी कोणती शिक्षण पद्धती हितावह राहिल याबाबतही चिंतन केलेले आढळते. भारतात आधुनिक शिक्षणपद्धती निर्माण करण्यासाठी खूपच संघर्ष केलेला दिसतो. रॉयच्या काळात भारतात पारंपरिक शिक्षण पद्धतीची होती. मंदिर, मदरसे व पाठशाळेत शिक्षण दिले जात होते. भारतीय परंपरावादी आणि काही युरोपीयन विद्वानही पारंपरिक भारतीय शिक्षण पद्धती आणि संस्कृत शिक्षणाचे गोडवे गात होते. रॉय यांनी पारंपरिक शिक्षण पद्धतीच्ये समर्थन करण्याचा समाचार घेतलेला आहे. पाश्चात्य विद्यांचा प्रसार करण्यासाठी राखून ठेवलेले एक लक्ष रूपये शासनाने अरबी व संस्कृत ग्रंथाचे भाषांतर करण्यासाठी खर्च केल्यामुळे रॉय यांनी सरकारला धारेवर धरले. इंग्रजांच्या आगमनामुळे भारतात पाश्चिमात्य पद्धतीने शिक्षण द्यावे की पारंपरिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करावा असा वाद निर्माण झाला होता. रॉयनी पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचे समर्थन केले. कारण पारंपरिक शिक्षण पद्धतीने दिले जाणारे शिक्षण धार्मिक व आध्यात्मिक स्वरूपाचे होते. पाठांतरावर अतिशय भर होता. या शिक्षणाचा व्यवहारात काहीही उपयोग नव्हता. म्हणून भारतीयाना अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीतील नैसर्गिक शास्त्रे व विज्ञानाचा वापर करणाऱ्या शिक्षणाचे रॉयनी समर्थन केले. पाश्चिमात्य राष्ट्रांनी विज्ञानाचा वापर करून आपला विकास करून घेतला. त्याच दृष्टिकोणाचा वापर करून भारतीयानी आपली प्रगती घडवुन आणावी. पाश्चिमात्य शिक्षण भारतात क्रांतीकारी परिवर्तन घडवुन आणु शकते. भारतीयांना अज्ञानात ठेवण्याचे ब्रिटिशाचे धोरण असेल तर त्याकरिता संस्कृत शिक्षण पद्धतीचा वापर योग्य ठरेल.मात्र भारतीयांचे कल्याण करावयाचे असेल तर पाश्चिमात्य शिक्षण देणे योग्य ठरेल. रॉयनी संस्कृत पाठशाळा सुरू करण्याच्या इंग्रज शासनाच्या निर्णयाला विरोध केला. जनतेला पाश्चिमात्य शिक्षण उपलब्ध करून देण्याकरिता कलकत्ताला हिंदु कॉलेज काढले. स्वतः अभ्यासक्रमांची पुस्तके लिहीली. त्याप्रमाणे भारतात संस्कृतीचे ज्ञान उपलब्ध करून देण्याकरिता वेंदात कॉलेज काढले. त्यांच्या शिक्षणविषयक विचारामुळे भारतात पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचा पाया घातला गेला.

**टिप- रॉयचे आर्थिक विचार -** भारताचे आर्थिक शोषण सिद्धांत मांडणारे रॉय हे प्रथम विचारवंत होते. इंग्रजी राजवटीतील आकडेवारीचा अवलंब करून त्यांची आर्थिक शोषणाचे वास्तव चित्र सर्वांसमोर मांडले. दादाभाईप्रमाणे मर्यादित प्रमाणात रॉय यांनी भारताकडून ब्रिटनकडे जाणाऱ्या संपत्तीच्या ओघ दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासोबत कंपनी राजवटीत होणाऱ्या जुलूम आणि अरेरावी थांबविली पाहिजे. हाऊस ऑफ कॉमन्स समितीपुढे साक्ष देतांना सारा, बियाणे व इतर खर्च आणि श्रम बोजा शेतकरी उचलत असतांना जमिनदारांना अर्ध्या पिकाचे उत्पन्न देणे हे अन्यायकारक आहे असे सांगुन शेतकऱ्या शोषणाकडे इंग्रजांचे लक्ष वेधले होते. इंग्रजाच्या आगमना पूर्वी भारत संपन्न व निर्यातदार देश होता. कापड, मसाल्याचे पदार्थ व इतर अनेक वस्तूची भारतातून इतर देशात निर्यात होत होती. मात्र इंग्लंडमध्येऔदयोगिक क्रांती झाल्यानंतर हे चित्र बदलले. कापड व इतर वस्तूची निर्मिती यंत्रावर होऊ लागल्यामुळे इंग्लंडमध्ये उत्पादन मोठया प्रमाणावर होऊ लागले. त्या वस्तूच्या विक्रीसाठी त्यांना बाजारपेठेची आवश्यकता होती. म्हणून ब्रिटिशानी भारतीय हस्त व्यवसायाचे खच्चीकरण केले. भारताचे रूपांतर बिटिशाचा पक्का माल घेणारे हक्काचे ग्राहक अशी केली. परिणामतः पक्क्या मालाची आयात करणारा आणि कच्चा पुरविणारा भारत हा परावलंबी देश बनला. लॉर्ड कॉर्नवॉलिसने बंगाल प्रांतात कायमधारा जमीनधारा पद्धती लागू केली. या कायदयाचा आधार घेऊन जमिनदार शेतकऱ्याची मोठया प्रमाणावर पिळवणूक करत होते. म्हणून रॉयनाी या पद्धतीला विरोध केला. शासनाने जमिनदाराकडुन कमी खंड घ्यावा. जेणे करून शेतकऱ्याकडुन मिळणारी जमीन खंडाची रक्कम कमी करता येईल. शासनाचे खंड रूपाने होणारे नुकसान भरून काढण्यासाठी चैनीच्या वस्तूंवर जास्त कर लादावे. भारतातील शेती विकसित करण्यासाठी इंग्लंडमधील जमिनदारांनी भारतात येऊन शेतकऱ्याना मार्गदर्शन व प्रोत्साहन द्यावे. शेतीतील नवी तंत्रे शिकवावीत तसेच ईस्ट इंडिया कंपनीची मक्तेदारी नष्ट केल्यास भारतात नवे उदयोग येऊन औदयोगिकरणाला चालना देण्यासाठी विदेशी गुंतवणुकिला प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांनी तयार केलेल्या वस्तुवर कमी कर लादले पाहिजे. रॉयच्या आर्थिक विचारांमुळे भारताच्या आर्थिक शोषणाकडे लक्ष केंद्रीत झाले.

**टिप- रॉयचे मानवतावाद, विश्वबंधुत्व व आंतरराष्ट्राबद्दलचे विचार -** रॉय हे उच्च कोटीचे मानवतावादी विचारवंत मानले जातात. त्यांच्या विचारावर राष्ट्रवादाबरोबर आंतरराष्ट्रवादाचाही प्रभाव दिसून येतो. वैश्विक सद्‌भावावर त्यांची अटळ श्रंध्दा होती. संपूर्ण मानव जात एक कुंटुंब असून विविध राष्ट्र त्या कुंटुंबाच्या शाखा आहेत. सर्व राष्ट्रांनी मानवाच्या कल्याणासाठी परस्परांना सहकार्य करावे. सहकार्यातून संपूर्ण विश्वाचा विकास घडेल. म्हणून प्रत्येक देशाची कृती मैत्रीची भावना वाढविणारी असावी. संपूर्ण मानवाला जोडण्यासाठी रॉय विश्व धर्माचे स्वप्न पाहतात. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन आणि बौद्ध धर्मातील शाश्वत मूल्याचा अभ्यास करून ही मूल्ये मानवी कल्याणासाठी आवश्यक आहेत हा निष्कर्ष काढला. सर्व धर्मातील तत्त्वज्ञाना समानता आणि मानवतेला स्थान असल्याने धर्माधर्मातील भेदभावाना नाकारतात. सर्वधर्म तत्वज्ञानाचा अभ्यास करून मानवी कल्याणाच्या मूल्यांना पाठिंबा देतात. त्यांच्या विचारात धार्मिक भेदभावाना स्थान नव्हते. रॉयच्या धार्मिक व सामाजिक चळवळीत मानवतावादाच्या कल्याणाकरिता होत्या. ब्राम्हो समाज स्थापनेमागे सर्व धर्म व पंथ भेद विसरून एका ईश्वराची उपासना करावी हा मुख्य उद्देश होता. स्त्रीयाबाबत सती चाल बंद व्हावी. विधवा पुर्नविवाह व्हावेत यामागे स्त्रीपुरूष समानता हक्क मिळावेत हा उद्देश होता. रॉय याना संकुचित राष्ट्रवाद मान्य नव्हता. त्याचे विचार राष्ट्रवादाच्या सीमा ओलांडून मानवतावादाकडे झेप घेत असत. युरोपियन राष्ट्रातील राजकीय व व्यापारी संघर्ष मिटावेत म्हणून एक संघटना स्थापन करावी असे पत्र फ्रेंच परराष्ट्र मंत्र्यास १९३२ मध्ये रॉय यांनी लिहिले. जगात कुठेही झालेला राजकीय अन्याय त्यांना अस्वस्थ करत असत. उदा.स्पेन मध्ये घटनात्मक सरकार स्थापन झाल्याबद्दल कलकत्याच्या लोंकाना मेजवानी दिली. विश्वबंधुत्वाच्या भावनेने जेव्हा फ्रॉन्स सरकारने परकीय नागरिकाच्या प्रवेशाबद्दल बंधने लादली. तेव्हा त्या धोरणाला विरोध करणारे पत्र फ्रेंच सरकारला लिहीले. या उदाहरणावरून मानवताबद्दल त्यांच्या विचारात तळमळ दिसून येते. मानव जातीतील परस्पर सहकार्य आणि सद्‌भावातून मानवजातीचा फायदा होईल. माणसा माणसातील भेदभाव आणि दुरावा नष्ट होऊन आणि मानवी ऐक्य व शांतता प्रस्थापित करण्यासाठी रॉय यांनी आयुष्यभर आंतरराष्ट्रीय शांतता, विकास आणि सहकार्य प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात.

**प्र.३ रा. भारतीय प्रबोधनाचे शिल्पकार व आधुनिक भारताचे जनक या नात्याने रॉयचे कार्य व योगदान सांगा?**

१९ वे शतक भारतात प्रबोधनाचे युग मानले जाते. या प्रबोधनात रॉयचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. कारण भारतातील सामाजिक, राजकीय व आर्थिक विचाराची सुरूवात रॉय पासून होते. रॉयचा आधीचा काळ अंधकार युग म्हणून ओळखले जाते. या काळात राजकीय व सामाजिक व्यवस्थेचे अध:पतन झाले होते. धर्मामध्ये अनिष्ट रूढया निर्माण झाल्या होत्या. लोक रूढयाचे गुलाम झाले होते. या परिस्थितीत समाजाला रॉय यांनी मार्ग दाखविला. युरोपातील उदारमतवादाच्या मदतीने रॉयनी भारताचे प्रबोधन घडवुन आणले. रॉय यांना आधुनिक भारताचे जनक वा शिल्पकार आणि आधुनिक चळवळीचे जनक मानले जाते. पाश्चात्य राजकीय विचार अरिस्टॉटलच्या विचारांना जे स्थान आहे ते स्थान भारतात रॉयच्या विचार व कार्याला दिले जाते. त्यांनी भारतात सामाजिक, धार्मिक, व राजकीय या सर्व क्षेत्रात आधुनिकीकरणाचा आग्रह धरला.

**१) धार्मिक व सामाजिक चळवळीचे जनक -** भारतीय समाजात प्राचीन काळापासून अनेक रूढया अस्तित्वात होत्या. इंग्रजांच्या आगमनामुळे पाश्चात्य संस्कृती, ख्रिस्ती मिशनरी लोकांचा धर्मप्रसार, आधुनिक शिक्षण आणि आधुनिक ज्ञानविज्ञानाची माहिती मिळू लागल्यामुळे भारतीय तरूणांना आपल्या समाजव्यवस्थेतील दोष दिसू लागले. हे दोष दूर करण्यासाठी व समाज सुधारणा करण्याकरिता तरूण पुढे येऊ लागले. त्या तरूणापैकी रॉय हे पहिले समाजसुधारक मानले जातात. समाजात धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवुन आणण्यासाठी रॉयनी आत्मीय सभा व ब्राम्हो समाज इ.संस्था स्थापन केल्या. या संस्थाच्या माध्यमातुन अनिष्ट रूढयावर प्रखर हल्ले केले. रॉयच्या कार्यामुळे ब्रिटिशांनी सतीच्या चालीवर बंदी लादली. आत्मीय सभेमुळे विधवा पुर्नविवाहाला उत्तेजन मिळाले. स्त्रियांना मालमत्तेत वाटा मिळावा. बहुपत्नीत्वाची चाल रद्द व्हावी याकरिता रॉयनी प्रयत्न केले. धार्मिक एकात्मता घडवुन आणण्यासाठी एकेश्वरवादाचे समर्थन, मुर्तीपुजेला विरोध आणि विश्वमंदिराची स्थापना इ.कार्य केले. रॉयच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन पुढील काळात आर्य समाज, प्रार्थना समाज इत्यादी संस्थाची स्थापना झाली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उदयाला आलेल्या समाजसुधारकांनी रॉयच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन भारतात समाज सुधारणेला प्रारंभ केलेला आढळतो.

**२) उदारमतवादी चळवळीचे जनक -** रॉयवर पाश्चात्य उदारमतवादी विचारांचा प्रभाव होता. भारतीय राजकारणात उदारमतवादी परंपरा उदयास आली. त्याची मुख्य प्रेरणा रॉय हे होते. रॉयचा उदारमतवादात मानवी स्वातंत्र्याला मध्यवर्ती स्थान होते. स्वातंत्र्यासाठी भारतीयांना हक्क मिळावेत. राजकीय जुलूमापासुन नागरिक मुक्त असावेत. प्रशासनात भारतीयांना जास्तीत जास्त सहभाग द्यावा. न्यायदान करतांना काळा गोरा हा भेदभाव करू नये. न्यायमंडळाचे काम निपक्षपातीपणे चालण्यासाठी कायदेमंडळ व कार्यकारीमंडळापासुन न्यायमंडळ स्वतंत्र असावे. राज्यकारभारात जनहिताची दृष्टी असावी. पाश्चात्य उदारमतवादी दृष्टीचा भारतीय राज्यकारभारात दिसली पाहिजे. रॉयच्या उदारमतवादात धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवुन आणण्यावर भर यावर मुख्य भर होता. रॉयच्या उदारमतवादी चळवळीचा मुख्य भर धार्मिक व सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यावर भर होता. या सुधारणा इंग्रजांच्या सहकार्याने करता येतील हा त्यांच्या विश्वास होता. त्यांच्या विचारापासून प्रेरणा घेऊन दादाभाई नौराजी, रानडे, आगरकर व केशवचंद्र सेन इ. उदारमतवादी विचारवंताची परंपरा भारतात निर्माण झाली.

**३) राजकीय विचार व हक्कांचे जनक -** रॉयना भारतातील सनदशीर चळवळीचे जनक मानले जातात. भारतीयामध्ये हक्कांची जाणीव निर्माण करून देण्याचे कार्य रॉयनी प्रथम केले. उदा.कलकत्ता उच्च न्यायालयात वृत्तपत्र स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या कायदया विरोधात त्यांनी पहिला अर्ज केला तो फेटाळला गेला. राजा व सल्लागार मंडळाकडे अर्ज केला तो ही फेटाळला गेला. रॉयची ही कृती भारतीयाच्या हक्कासाठी उचलेले पहिले पाऊल होते. भारतीयानी राजकीय व सामाजिक सुधारणा ब्रिटिशाकडुन मागतांना शांततेच्या मार्गाने हक्क मागणी करावी. ब्रिटिशाशी संघर्ष करू नये कारण इंग्लंडच्या मानाने आपली प्रगती कमी असल्याने जनतेने संयम पाळावा. संयमाने होणारी प्रगती दीर्घकाळ टिकते. भारतीयाच्या हक्कासाठी रॉयनी इंग्रजावर टीका केली. ईस्ट इंडिया कंपनीची मक्तेदारी नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला.

भारतीयाकरिता पार्लमेंटने कायदे करावे ही मागणी केली. भारतीयामध्ये राजकीय हक्कांबद्दल जाणीव निर्माण करण्याचे कार्य रॉयनी प्रथम केल्यामुळे त्यांना आधुनिक भारताचे जनक मानले जाते.

**४) वृत्तपत्र व्यवसायाचे जनक-** रॉयच्या आधी युरोपियन लोकांची वर्तमान पत्रे होती. पर्शियन भाषेत रॉयनी मिरात-अल-अखबार व बंगाली भाषेत संवाद कौमुदी हे वर्तमानपत्र सुरू करून वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. तत्कालीन काळातील हिंदी, बंगाली, इंग्रजी भाषेतील नियतकालिकांच्या प्रकाशनासाठी त्यांनी मदत केली. वृत्तपत्राला ते समाज जागृतीचे साधन मानत. शासनाचे कार्य कसे चालते हे जनतेला वृत्तपत्रातून कळते. जनतेच्या मागण्या शासनाला वृत्तपत्रातुन समजतात. वृत्तपत्र स्वातंत्र्य विरोधात काढलेल्या वटहुकूमाला रॉयनी विरोध केला. भारतीयासाठी मुद्रण स्वातंत्र्याची मागणी केली. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन अनेक राजकीय नेते व समाजसुधारकांनी आपली मते जनतेला पटवून देण्याकरिता व समाजप्रबोधनासाठी वर्तमानपत्रे काढली. भारतीय समाजसुधारणा आणि राजकीय जागृतीसाठी वर्तमानपत्रांनी जी महत्त्वपूर्ण कामगिरी नंतरच्या काळात बजावली त्यांचे श्रेय रॉय यांच्या विचाराला दिले जाते.

**५) आंतरराष्ट्रवाद व मानवतावादाचे प्रर्वतक -** रॉय हे भारतातील पहिले मानवतावादी विचारवंत होय. त्यांनी आपल्या विचारात विश्वबंधुत्वावर भर दिलेला दिसतो. विश्व एक कुंटुंब असुन मानवजात त्या कुंटुंबाची सदस्य आहेत .वेगवेगळे राष्ट्र मानवतावादाच्या प्रमुख शाखा आहेत. त्या शाखामध्ये सहकार्य झाल्याशिवाय मानवाचा विकास होणार नाही. मानवतावादाकरिता हिंदु धर्मातील अनिष्ट रूढयांना त्यांनी विरोध केला. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन अनेक समाजसुधारक भारतात निर्माण झालेले दिसतात. रॉय हे प्रखर बुद्धीवादी होते. विविध भाषाचे व्यासंगी होते. पण या सर्वांपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या सर्व कार्यामागची प्रेरणा ही माणुसकीची होती. त्यांच्या बुद्धीवाद आणि विज्ञानवाद यात माणुसकीचा आलोवा ओतप्रोत भरलेला होता. या मानवतेतून त्यांचे विश्वबंधुत्ववादी विचारांचे मूळ दिसून येते.

रॉय यांनी आयुष्यात पार पाडलेल्या विविध भूमिका आणि कार्याचा विचार करता श्रीमती अनी बेझंट म्हणतात " रॉय हे एक असामान्य लोकपुरूष होते, त्याचप्रमाणे आजीवित शक्तीचे प्रतीक होते." बेझंटनी रॉयबद्दल व्यक्त केलेल्या मतावरून असे सांगता येईल की प्रबोधनांच्या क्षितिजावरील एक अग्रदूत म्हणून रॉयच्या कार्याची गणना भारतीय इतिहास घेतली जाते.

**टिप- रॉयचे विचारांचे परिक्षण-** भारतीय प्रबोधनाचे प्रतीक, विश्वधर्माचा प्रर्वतक, वृत्तपत्रव्यवसायाचे जनक, पूर्व-पश्चिमला जोडणारा विचारवंत, मानवता व आंतराष्ट्रीय सहजीवनाचा पुरस्कर्ता अशा कित्येक विशेषणांनी रॉयचा गौरव केला जातो. आधुनिक भारताच्या इतिहासात रॉयचे विचार अजरामर ठरले आहेत. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचारात मानवप्रेम आणि सहिष्णुवृत्तीमुळे संपूर्ण वैचारिक विचारात अखंड सुसंगती व निश्चित स्वरूपाची दृढ बैठक आढळून येते. हे थोडयाच विचारवंताच्या लेखनात दिसून येते. रॉय यांनी वैदिक धर्म, इस्लाम धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांच्यातील जीवनपयोगी असणाऱ्या प्रमुख वैशिष्टयांचे एकत्रीकरण केले आहे. पाश्चात्य आणि पौर्वात्य भौतिक विचारांचा समन्वय साधला आहे. रवींद्रनाथाच्या मते, रॉय यांनी भारतात आधुनिक युगाचा प्रारंभ केला. हा देश स्वत्वाची जाणीव विसरला होता आणि त्यामुळे अतार्किकतेचे ओझे त्यांच्या शिरावर येऊन पडले होते. परिस्थितीने तो गुलाम बनला होता. सामाजिक चालीरीती, राजकारण, धर्म व कला या सर्व क्षेत्रात जुन्या परंपरेचा वरचष्मा झाला होता. अशा वेळी रॉय यांनी आपल्या चैतन्यशील व्यक्तिमत्त्व व तडजोड न करणारा स्वातंत्र्यवाद यांच्या योगाने आपल्या देशाच्या सर्जनशीलतेचे महत्त्व जाणले आणि त्याला स्वत्वाची ओळख करून देण्याचा कष्टपद मार्ग स्वीकारला.

रॉय हे खऱ्या अर्थाने सुधारक आणि विचारवंत होते. स्त्रियांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी सनातनी पारंपरिक समाजव्यवस्थेविरूद्ध बंड पुकारले. वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी निर्धारपूर्वक लढा दिला. अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरिती, अज्ञान विरूद्ध दंड थोपटले. सर्व धर्माच्या एकता व सामज्यंस्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. धर्ममार्तंड व रूढीवादीच्या विरोधात चळवळी केल्या. भारतीयांना पाश्चमात्य शिक्षणाची कवाडे उघडून दिले. राजकीय क्षेत्रात उदारमतवाद, सहिष्णुता, समता व स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांच्या विचारांत भारतातील लोक आणि भारतीय समाजाच्या विकासाबद्दल आस्था ठायीठायी प्रगत होते.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. रॉयचा जन्म आणि मृत्यू कधी झाला ते सांगा.
उत्तर- रॉयचा जन्म २२ मे १७७२ साली राधानगर येथे झाला असून त्यांचा मृत्यू २० सप्टेंबर १९३३ मध्ये ब्रिस्टॉल बंदरात झाला.

२. ब्राम्हो समाजाची दोन तत्वे सांगा.
उत्तर - अ) ब्राम्हो समाज स्थापना करण्यामागे सर्व धर्माच्या अनुयायांना उपासना करण्याचे एक साधन प्राप्त व्हावे हा उद्देश होतो. वंश आणि पंथाची बंधने तोडून मानव जातीत ऐक्य साधण्याचा तो एक प्रयत्न होतो.
ब) जगात ईश्वर एक असुन तो विश्वाचा निर्माता आहे. तो निगुण निराकार आहे.सर्व विश्वाचा निर्माता तोच आहे.ही ब्राम्हो समाजाची मुख्य शिकवण आहे. ईश्वर उपासना करण्याचे ठिकाण म्हणुन ब्राम्हो समाज मंदिरे सर्व धर्मीयाकरिता खुली होती.

३. राजा राममोहन रॉय यांची स्त्री स्वातंत्र्याबद्दलची मते सांगा.
उत्तर- रॉय यांनी स्त्री आणि पुरूष समता, स्त्रियाबाबतच्या सतीप्रथा, केशवपन सारख्या प्रथावर बंदी आणि स्त्रियांना मालमत्तेत वाटा इत्यादी विचार स्त्री स्वातंत्र्यासाठी मांडलेले आहेत.

४. रॉय यांनी लिहिलेल्या ग्रंथाची नावे सांगा.
उत्तर- वेदांचा सारांश, केन उपनिषदे, प्रिसेप्टस् ऑफ जिझस हे ग्रंथ रॉय यांनी लिहिलेले आहेत.

५. रॉय यांनी सुरू केलेल्या वृत्तपत्राची नावे सांगा.
उत्तर- रॉय यांनी पर्शियन भाषेत मिरात-उल-अखवार आणि बंगाली भाषेत संवाद-कौमुदी हे वर्तमान पत्रे काढली होती.

६. राजा राममोहन रॉयनी स्थापन केलेल्या सामाजिक संस्थाची नांवे सांगा.
उत्तर - रॉयनी आत्मीय सभा आणि ब्राम्हो समाज या सामाजिक संस्थाची स्थापना केली.

७. राजा राममोहन रॉयचे शिक्षणसंबंधी विचार सांगा.
उत्तर- रॉयनी पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचे समर्थन केले आणि जनतेला पाश्चिमात्य शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी हिंदू कॉलेज काढले. अभ्यासक्रमाची पुस्तके लिहीली. पौर्वात्य शिक्षण पद्धतीला विरोध केला. भारतीय संस्कृतीचे ज्ञान उपलब्ध करून देण्याकरिता वेंदात कॉलेज काढले. त्यांच्या शिक्षणविषयक विचारामुळे भारतात पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचा पाया घातला गेला.

८. राजा राममोहन रॉयचा मानवतावादाबद्दलचे विचार सांगा.
उत्तर- रॉय हे उच्च कोटीचे मानवतावादी विचारवंत मानले जातात. ते राष्ट्रवादासोबत आंतरराष्ट्रवादाचे समर्थन करतात. संपूर्ण मानव जातीत एक कुटुंब मानतात. सर्व राष्ट्रांनी मानवाच्या कल्याणासाठी परस्परांना सहकार्य करावे. सहकार्यातून संपूर्ण विश्वाचा विकास घडेल. म्हणून प्रत्येक देशाची कृती मैत्रीची भावना वाढविणारी असावी. संपूर्ण मानवाला जोडण्यासाठी रॉय विश्व धर्माचे स्वप्न पाहतात.

९. रॉयचे ब्रिटिश राजवटीबद्दलचे विचार सांगा.
उत्तर- ब्रिटिशांनी भक्कम प्रशासन व्यवस्था व कायद्याचे राज्य निर्माण केले. हिंदू व मुसलमानात भेदभाव न करता समान अधिकार दिले. शाळा, रेल्वे, तार व पोस्ट, उदयोगधंदाची निर्मिती इ.सुधारणा केल्यामुळे ब्रिटिशांचे आगमन रॉयना ईश्वरी कृपा वाटते म्हणून ते ब्रिटिश राजवटीचे समर्थन करतात.

१०. रॉयचे मुद्रण स्वातंत्र्याबद्दल विचार स्पष्ट करा.
उत्तर-रॉयच्या मते वृत्तपत्र लोकमत घडविण्याचे प्रभावी साधन आहे. या साधनाच्या माध्यमातून सरकारवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मार्गाने नियंत्रण ठेवता येते. भारतीयाना शासनाचे कार्य कसे चालते हे वृत्तपत्रातून समझते.वृत्तपत्रावर बंधने टाकल्यास ते ज्ञान जनतेला प्राप्त होणार नाही आणि ज्ञानाचे वाटप थांबेल. वर्तमान पत्र दूहेरी भूमिका पार पाडतात. जनतेच्या मागण्या शासनापर्यत पोहचविणे आणि शासनाची धोरण व कार्यक्रम जनतेपर्यंत पोहचविणे. हे वृत्तपत्राचे प्रमुख काम आहे.

## प्रकरण- ३ रे
## लोकमान्य टिळक

**जीवनपरिचय-** राष्ट्रीय सभेच्या जहाल राजकारणातील प्रमुख नेते लोकमान्य टिळक हे होते. त्यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्हातील चिखली या गावी झाला. प्राथमिक शिक्षण दापोलीला व महाविद्यालयीन शिक्षण डेक्कन महाविद्यालय, पुणे येथे झाले. बी.ए. उत्तीर्ण झाल्यानंतर झाल्यानंतर कायद्याचा अभ्यास सुरू केला. १७७९ साली ते वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले. टिळकांचे शिक्षण संपल्यानंतर देशसेवच्या आणि सामाजिक कार्याला सुरूवात केली. विष्णुशास्त्री चिपळूणकर, ना.म.जोशी आणि आगरकरासोबत डेक्कन एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेमार्फत न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. या संस्थेत काही काळ अध्यापनाचे कार्य केले. पण वैचारिक मतभेदामुळे डेक्कन सोसायटीच्या सभासद पदाचा राजीनामा दिला. लोकजागृतीसाठी केसरी व मराठा हे वर्तमानपत्र काढले. कोल्हापूर संस्थानाच्या दिवाणाविरूद्ध वर्तमानपत्रात केलेल्या लिखाणाबद्दल झालेल्या खटल्यात त्यांनी दोषी मानून १०१ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावली. टिळक आणि आगरकर यांनी डोंगरीच्या कारागृहात ही शिक्षा भोगली. सामाजिक एकतेसाठी शिवजयंती व गणेश उत्सव सुरू केले. काही काळ प्रांतिक कायदेमंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले. दुष्काळी परिस्थितीकडे दुर्लक्ष व प्लेग निवारण करतांना ब्रिटिशांनी केलेली दडपशाहीमुळे चाफेकर बंधुनी रँड नावाच्या इंग्रज अधिकाऱ्यांची हत्या केली. त्या संदर्भात केलेल्या भाषणाबद्दल टिळकावर राजद्रोहाचा आरोप इंग्रजानी ठेवला आणि त्या खटल्यात त्यांना दीड वर्षाची सक्तमजूरीची शिक्षा झाली. कारागृहात त्यांनी आर्याची ध्रुव प्रदेशातील वस्ती हा ग्रंथ लिहिला. १९०५ साली बंगालच्या फाळणीवरून सुरू झालेल्या वंगभंग आंदोलन काळात टिळक भारतभर लोकप्रिय व प्रभावी नेते बनले होते. १९०६ च्या सुरत अधिवेशनात जहाल आणि मवाळ गटातील मतभेद मोठया प्रमाणावर उफाळून आले. राष्ट्रीय सभेवर मवाळाचे वर्चस्व असल्याने टिळक काँग्रेसमधुन बाहेर पडले. १९०८ साली बंगालमध्ये झालेल्या बॉम्ब स्फोटाबद्दल लिखाण केल्यामुळे त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. त्या खटल्यात सहा वर्ष सक्तमजुरी शिक्षा झाली. ही शिक्षा त्यांनी मंडालेच्या कारावासात भोगली. याकाळात त्यांनी गीतारहस्य हा ग्रंथ लिहला. तुरूगांतून सुटल्यानंतर राष्ट्रीय सभेत प्रवेश करून जहाल आणि मवाळामध्ये युती घडवून आणली. १९१६ काँग्रेस आणि मुस्लीम लीग याच्यात लखनौ करार घडवून आणला. त्यानंतर काही काळ होमरूल लीग चळवळीचे कार्य केले. १९२० मध्ये टिळकांनी स्वराज्य पक्ष स्थापन केला. साम्रज्यांतर्गत स्वराज्य ही कल्पना मांडली. १ ऑगस्ट १९२० ला टिळकांचे निधन झाले. त्यांनी गीतारहस्य, आर्याची ध्रुव प्रदेशातील वस्ती (दि ओरायन आर्क्टिक होम इन द वेदाज), दी वेदिक क्रॉनॉलाजी इ.ग्रंथ लिहले.

**टिळकांची जहालवादी विचार-** टिळकांच्या राजकीय प्रवेशापूर्वी ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उदार धोरणाचा भारतीय राजकीय नेत्यांवर प्रभाव होता. इंग्रजी राजवटीद्वारे भारतात जबाबदार राज्यपद्धती निर्माण होईल हा नेमस्त नेत्यांचा विश्वास होता. भारतीय राजकारणात टिळकांच्या उदयापूर्वी मवाळ किंवा नेमस्तवादी नेत्यांचे वर्चस्व होते. इंग्रजाकडे अर्ज विनंत्या पलीकडे नेमस्तांचे राजकारण पुढे सरकले नाही. ब्रिटिश राजवट दैवी वरदान आहे. ते उदारमतवादी आहेत. ब्रिटिशांशी भारताचा आलेला संपर्क भारताला उपकारक ठरेल ही नेमस्ताची विचारसरणी आणि पडखाऊ राजकारणाला नाकारण्यासाठी टिळकांनी जहालवादी राजकारणाचा अवलंब केला. लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल व लाला लजपतरॉय हे जहाल गटातील प्रमुख नेते होते. जहालाच्या उदयापूर्वी भारतीय नेते अर्ज-विनंत्या करून ब्रिटिशाकडून सुधारणा पदरात पाडून घेणे हा सनदशीर मार्ग वापरत होते. या मार्गाचा वापर करणाऱ्या नेत्यांना मवाळवादी वा नेमस्तवादी नेते म्हणून संबोधिले जात होते. भारतीय समाज हा राजकीय दृष्टया जागृत नसल्यामुळे स्वातंत्र्याची मागणी अनावश्यक आहे. भारतीय जनता सुशिक्षित होईल तेव्हा राजकीय सुधारणेची मागणी करावी तोपर्यंत समाजसुधारणेला महत्त्व द्यावे हा मवाळाचा कार्यक्रम आणि त्यांचे मार्ग जहालमतवाद्यांना मान्य नव्हते. जहालाच्या मते ब्रिटिशांची मनधरणी करण्यापेक्षा भारतीय जनतेला जागृत करून स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केल्या पाहिजे. ब्रिटिश राजवटीशी प्रत्यक्ष संघर्षाची वेळ येऊन ठेपली आहे. संघर्षाशिवाय ब्रिटिश राजवट स्वराज्य देणार नाही. संघटित असणारे लोक आंदोलनाच्या जोरावर यश मिळवू पाहतात. भारतीयांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे. ब्रिटिशाविरूद्ध चळवळ केल्यास दडपशाहीच्या मार्गाने अन्याय, अत्याचार करतील. भारतीय जनता राज्यकारभार करण्यास लायक आहेत. सुरूवातीला

भारतीय लोक प्रथम चुका करतील पण जसेजसे अनुभव येतील तसेतसे शहाणे होतील. म्हणून ब्रिटिशांनी भारतीयाना स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा. भारतीयांनी टप्प्याटप्प्याने राजकीय सुधारणा न स्वीकारता एकदम स्वराज्य मिळवून गुलामगिरीच्या जोखडातून कायमची मुक्तता मिळवावी. ब्रिटिश पार्लमेंट, ब्रिटिश जनता व अधिकारी यांच्यात कोणत्याही भेद टिळकांना दिसत नाही. ते सर्व सारखे असून त्यांच्यावर विश्वास ठेवून स्वातंत्र्यप्राप्ती होणार नाही. भारतीय आणि इंग्रज यांच्यात कोणतेही साम्य नाही. भारतीयानी सार्वजनिक प्रतिकार मार्गाचा अवलंब करून स्वयंशासनाचा अधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. टिळकांनी भारतीय स्वातंत्र्य आणि सार्वजनिक प्रतिकार करण्यासाठी जहालवादी मार्गाचा पुरस्कार केलेला असला तरी सशस्त्र क्रांतीने स्वराज्य मिळेल या गोष्टीवर त्यांचा विश्वास नव्हता. आमच्या जवळ शस्त्र नाहीत त्यांची आम्हाला आवश्यकता नाही. भारत सरकार ब्रिटिश सरकारला जबाबदार आहे भारतीयांना नाही यातून टिळकांच्या जहालवादी विचारांची व्यापकता आणि व्यवहार्यता लक्षात येते.

**प्र.१ला लोकमान्य टिळकांचे राजकीय विचार स्पष्ट करा?**

**किंवा**

**लोकमान्य टिळकांचे ब्रिटिश राजवटीबद्दलचे विचार सांगा.**

टिळकांच्या राजकीय विचारात उदारमतवादी, बुद्धिप्रामाण्यवाद आणि परंपरावादाचे सुरेख मिश्रण दिसून येते. त्यांच्या राजकीय विचाराचे पुढील पैलू सांगता येतात.

१) **ब्रिटिश राजवटी विषयी विचार-** टिळक जहालवादी असले तरी सुरूवातीला त्यांनी ब्रिटिश राजवटीमुळे झालेल्या चांगल्या परिणामाची स्तुती केलेली आहे. ब्रिटिश राजवटीच्या स्थापनेतून झालेल्या योग्य परिवर्तनाची मुक्तकंठाने मान्य केली. ब्रिटिश राजवटीमुळे भारतात कायदा व सुव्यवस्था निर्माण होऊन कायदयाचे राज्य आले. त्यांच्या उदार धोरणामुळे ज्ञानाची प्रगत दालने भारतीयासाठी खुली केली. इंग्रजी शिक्षणातून भारतीयामध्ये राष्ट्रवाद निर्माण होण्यास मदत मिळाली. ब्रिटिशामुळे देशात एकात्मता निर्माण होऊन झाली. त्यांनी केलेल्या तांत्रिक सुधारणेमुळे रेल्वे, पोस्ट व तार इत्यादीमुळे देशबांधव एकमेकाशी जोडले गेले. ब्रिटिश राजवटीच्या प्रभावातून भारतीयामध्ये स्वातंत्र्याची ओढ विकसित होण्यास हातभार लागला. उद्योगधंदाबाबत केलेल्या सुधारणेमुळे भारतीयात नवी दृष्टी विकसित झाली. त्यामुळे टिळकांच्या राजकीय कारकिर्दच्या सुरूवातीला ब्रिटिश राजवट नष्ट करण्याच्या विचारांचे नव्हते.

२) **ब्रिटिशांवर टीका-** टिळकांनी ब्रिटिश राजवटीचे समर्थन केलेले असले तरी तिच्या वाईट परिणामाचीही सविस्तर चर्चा केली. ब्रिटिशानी भारतीय लोकांना राजकीय क्षेत्रात अपमानास्पद वागणूक दिली आहे. हा देश ब्रिटिश अधिकाऱ्याच्या लहरी व मर्जीवर चालतो. भारतीयाची अवस्था गुलामापेक्षाही वाईट आहे. ब्रिटिशामुळे भारताचे राजकीय अध:पतन झाले. भारतीयाकडे बुद्धी व कष्ट करण्याची तयारी आहे पण उच्च श्रेणीच्या जागा ब्रिटिशंना दिल्या जातात. कनिष्ठ श्रेणीच्या जागा भारतीयांना दिल्या जातात. त्यामुळे भारतीयांच्या मनोधर्याचे खच्चीकरण होऊन सुशिक्षित तरूणामध्ये न्यनगंडाची भावना निर्माण झाली आहे. हे भारताचे नैतिक शोषण आहे. भारताच्या दारिद्रयाला ब्रिटिश जबाबदार आहे. ब्रिटिशाच्या आर्थिक शोषणामुळे भारतीय समाज दारिद्री अवस्थेत जाऊन पोहचला म्हणून ब्रिटिश राज्य वरदान नसून शाप आहे हा विचार मांडला.

३) **ब्रिटिश सत्तेची हुकूमशाही-** भारतात ब्रिटिश अधिकाऱ्यांची हुकूमशाही निर्माण झाली आहे. ब्रिटिश अधिकारी बेजबाबदार चैनी व विलासी आहेत. भारतीयाच्य सुख दु:खाची त्यांना कल्पना नाही. देशाचा खजिना ते चैनी जीवन जगण्यासाठी खर्च करतात. भारत हा देश ब्रिटिश अधिकाऱ्यांना आपला देश वाटत नसल्याने ते आळशी, बेजबाबदार, बेफिकीर, सुखविलाशी बनलेला आहे. ब्रिटिशाच्या अरेरावीमुळे भारतीयांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे टिळकांनी ब्रिटिश नोकरशाहीवर प्रखर हल्ला चढविला. जहालवादी राजकारणाचा अवलंब करून स्वराज्य प्राप्ती हे धैर्य ठरवले. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच" ही घोषणा केली. ब्रिटिश नोकरशाहीचे भारतीयावरील अन्याय सर्वांसमक्ष मांडण्यासाठी केसरी आणि मराठा वर्तमानपत्रात सातत्याने लेखन केले. ब्रिटिश नोकरीशाहीच्या अत्याचारापासून सुटका करण्यासाठी स्वराज्यप्राप्ती हे ध्येय मानले आणि त्यानुसार जनतेला कार्यक्रम दिला.

४) **साम्राज्यशाहीची मीमांसा-** ब्रिटिश साम्राज्यशाही वास्तव स्वरूप टिळकांच्या निदर्शनात आले होते. ब्रिटिश राजवटीमुळे झालेल्या फायदे नमूद केलेले असले तरी त्यांच्या साम्राज्यशाहीच्या शोषक स्वरूप आणि व्यापारी दृष्टीला नजरेआड केले नव्हते. गुलामगिरीत राष्ट्र सर्व प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागते. ब्रिटिशाची सत्ता अधिक जुलूमी व हुकूमशाही प्रवृत्तीने वागत असल्याने त्यांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवून चालणार नाही. लॉर्ड कर्झनने संपूर्ण भारतात जुलूमाचा कहर केला आहे. धार्मिक वितंडवाद निर्माण करण्यासाठी बंगालची फाळणी केले. ब्रिटिशाच्या जुलूमी धोरणाला विरोध करण्यासाठी टिळकांनी जहालवादी राजकारणाचा श्रीगणेशा करून जनतेला ब्रिटिश सत्तेशी संघर्ष करण्याचा कार्यक्रम दिला. भारताचे पारतंत्र्य केवळ राजकीय स्वरूपाचे नसून आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि औद्योगिक इत्यादी सर्व क्षेत्रात परतंत्र बनलेला आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या काळात शेती, उद्योगधंदाचा ऱ्हास झाला. शेतकरी कर्जबाजारी बनला. देश अधोगतीला जात असतांना इंग्लंडची भरभराट होत आहे. ब्रिटिश राजवटीच्या शोषणातून देश दरिद्री बनत चालला आहे. टिळकांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या परिणामांची मांडणी करतांना ग्रामीण भारताच्या दुर्दशेवर प्रकाश टाकून साम्राज्यशाहीच्या शोषणाची मांडणी केली. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या अन्यायकारक धोरणामुळे टिळक जहालवादी बनले.

**प्र. २ रा. लोकमान्य टिळकांचे क्रांतिकारी आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची संकल्पना स्पष्ट करा?**

टिळकांचा राष्ट्रवाद हा पुनर्रूजीवनवादी आणि पुनर्निर्माणवादी स्वरूपाचा होता. प्राचीन भारतीय परंपराच्या आधारावर त्यांनी राष्ट्रवादाची मांडणी केली. भारतीयामध्ये राष्ट्रभावनेच्या प्रसारासाठी प्राचीन संस्कृतीचे पुर्नजागरण आवश्यक मानतात. त्यांनी राष्ट्रवादाला अध्यात्मिक आणि मनोवैज्ञानिक संकल्पना मानले आहे. समान मनोधर्म, विचार, समान राजकीय आकांक्षा, समान भूप्रदेश, समान इतिहास, समान वंश, समान धर्म आणि समान भाषा इत्यादी घटकांच्या आधारावर राष्ट्र निर्मिती होत असते. परंतु भारतात विभिन्न विचारधारा, जातीभेद आणि मतेमतांतरेमुळे राष्ट्रवादाची भावना वेगाने विकसित झाली नाही. समान धर्म आणि समान संस्कृती असलेल्या देशात राष्ट्रवादाचे बीजारोपण लवकर होते. म्हणून ते भारतात धर्म आणि संस्कृतीच्या आधारावर एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. राष्ट्रीय एकता निर्मितीसाठी अध्यात्मिक आणि मनोवैज्ञानिक मार्गाचा अवलंब करतात.

राष्ट्र निर्माण करण्यासाठी मानवामध्ये एकात्मतेची भावना निर्माण होणे आवश्यक असते. ही एकात्मतेची भावना विविध घटकांमुळे निर्माण होत असते. भारत हे एक राष्ट्र आहे हे नमूद करतांना टिळक म्हणतात की, भारतात विविध भाषा, वंश अस्तित्वात असले तरी सांस्कृतिक एकात्मता आणि आध्यात्मिक एकात्मतेतून राष्ट्र निर्मिती होऊ शकते. म्हणून लोकमान्य टिळक सांस्कृतिक एकात्मतेच्या आधारावर राष्ट्रवादाची संकल्पना मांडतात. राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभक्ती हा टिळकांच्या राजकीय विचार आणि कार्यक्रमाचा केंद्रबिंदू होता. धर्म, परंपरा, इतिहास, तत्त्वज्ञान, कृती आणि एकात्मता ही टिळकांच्या राष्ट्रवादाचे प्रमुख घटक आहेत. राष्ट्रवाद ही भव्य कल्पना असून प्रांत, जात, धर्म इ. ची बंधने ओलाडून त्याग करण्यास शिकविणारी संकल्पना आहे. टिळकानी भारतात सांस्कृतिक राष्ट्रवाद युगाची सुरूवात केली. टिळकासोबत लाललजपत रॉय, अरविंद घोष, बिपीन चंद्र पाल इत्यादी सर्व जहाल नेत्यावर भारतीय संस्कृती आणि परंपरेचा प्रभाव होता. या नेत्यांना भारताची स्वातंत्र्याची चळवळ ही संस्कृतीरक्षणाची चळवळ वाटत होती. इंग्रजाची धर्म व संस्कृती आपल्यापेक्षा भिन्न आहे. ब्रिटिशांचे राज्य फक्त राजकीय पारतंत्र्य नसून भारतीय संस्कृतीवरील आक्रमण आहे. म्हणून भारताला फक्त राजकीय कारणासाठी स्वातंत्र्य नको तर समाजाच्या नैतिक व आध्यात्मिक उन्नतीसाठी स्वातंत्र्य हवे आहे. परकिय सत्ता नष्ट करून स्वातंत्र्य प्राप्त करणे हे आध्यात्मिक राष्ट्रवादाचे प्रमुख ध्येय होते. टिळकांनी स्वराज्य कल्पनेला आध्यात्मिक व नैतिक आशय दिलेला आहे.

टिळक धर्माकडे राष्ट्रनिर्मितीचा प्रमुख घटक किंवा आधार म्हणून पाहतात. त्यांनी धर्माच्या आधारावर राष्ट्रवादाची मांडणी करण्याचा प्रयत्न केला. टिळकांनी धर्माच्या आधारावर मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी इतर-धर्मियांचा द्वेष केला नाही. भारतीयांना एकत्र बांधुन ठेवणारा एकमेव घटक म्हणजे धर्म होय. हिंदू संस्कृती जगातील आदर्श संस्कृती असून हिंदू धर्मात अनेक देव देवता व उपासना पद्धती असल्यामुळे धर्माला मोठया प्रमाणावर व्यापकता लाभली आहे. हिंदू धर्म सर्वात पुरातन धर्म आहे. त्या धर्माला कुणीही धर्म संस्थापक नाही. हिंदू धर्माचा अधिकृत धर्मग्रंथ नाही. म्हणून टिळक हिंदू धर्माला एक प्रयोगशाळा मानतात. या प्रयोगशाळेत प्रत्येकाला आपल्या मर्जीप्रमाणे पुजा व अर्चा आणि

उपासना करता येईल कोणावरही सक्ती नाही. म्हणून हिंदू धर्म स्वातंत्र्याला महत्त्व देणारा धर्म मानला जातो. वेद, गीता, रामायण यातील विचार सर्वांना एकत्र आणत असल्याने या धार्मिक ग्रंथाला ते राष्ट्रीय ठेवा मानतात. हिंदू धर्मग्रंथातील गीता आणि वेदातून अध्यात्मिक शक्ती आणि राष्ट्रीय उत्साह भारतीयांनी ग्रहण करावा. त्यांनी विविध पंथाना वैदिक धर्माच्या शाखा मानतात. विविध पंथानी मतभेद विसरून ऐक्यावर भर दिला तर भारत प्रबल राष्ट्र बनू शकेल. विविध पंथ व उपपंथानी एकत्र येऊन ब्रिटिशाविरूध्द लढा दिला पाहिजे. राष्ट्रवादाच्या विकासासाठी सार्वजनिक उत्सवांना महत्त्वपूर्ण स्थान देतात. राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी उत्सव प्रतीकाचे काम करतात. म्हणून टिळकांनी सर्वांन एकत्र आणण्यासाठी शिवजंयती आणि गणेश उत्सव समारंभ सुरू केले. भारतीयामध्ये राजकीय जागृती, समाज संघटन व ऐक्य निर्मिती हा त्यांचा मुख्य उद्देश होता. सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रनिष्ठा निर्माण करण्याचा तो एक प्रयत्न होता. भारताची स्वातंत्र्य चळवळ मूठभर सुशिक्षितांच्या हाती होती. तिला जनआंदोलनाचे रूप देण्यासाठी टिळकांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाची मांडणी केली.

भारतीयांनी आपला हा सांस्कृतिक वारसा जतन केला पाहिजे. हिंदू धर्मातील विविध पंथांना एकत्र आणून त्यातून प्रभावशाली राष्ट्र बनविण्याचे सामर्थ्य भारतीय सनातनी संस्कृतीत आहे. सांस्कृतिक एकात्मता निर्माण करण्यासाठी गणेशात्सव आणि शिवजयंती हे समारंभ सुरू केले. जनतेत राजकीय जागृती, राष्ट्रभावनेचा विकास आणि सामाजिक ऐक्य निर्मिती इत्यादी उत्सव साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश होता. उत्सवांच्या माध्यमातून लोकजागृती व लोकशिक्षण विकसित होईल या विश्वासातून टिळकांनी सांस्कृतिक राष्ट्रवाद संकल्पना विशद केली. टिळकांचा राष्ट्रवाद भारतीय संस्कृतीवर आधारलेला असला तरी त्यांनी इतर धर्माचा द्वेष केला नाही. व्यक्तिगत जीवनात ते हिंदू धर्माचा गुणगौरव करत असत. पण सार्वजनिक जीवनात इतर धर्मियांचा तिरस्कार त्यांनी केला नाही. स्वराज्य प्राप्तीसाठी पंथा-पंथातील संघर्ष त्यांना नको होता. म्हणून लखनौ काँग्रेस अधिवेशनात मुस्लीम लीग बरोबर लखनौ करार केला. लोकमान्य टिळकाच्या राष्ट्रवादवर भारतीय संस्कृती, वेदातील अद्वैतवाद आणि बर्क या पाश्चिमात्य विचारवंताचा प्रभाव दिसून येतो. टिळकांच्या राष्ट्रवादात वेदांतील अद्वैतवाद आणि मॅल्लिनी बर्क या पाश्चात्य विचारवंताच्या संकल्पनेचा समन्वय झालेला दिसतो. त्यांनी राष्ट्रवादात सांस्कृतिक घटकासोबत आर्थिक घटकांलाही महत्त्व दिलेले दिसते. दादाभाईच्या आर्थिक शोषण सिद्धांताचे समर्थन करतात. ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक शोषणामुळे भारतीयांना दारिद्रयात राहावे लागते हे वास्तव मांडून ब्रिटिश राजवटीचे शोषक स्वरूप स्पष्ट करतात. या शोषणाला पायबंद घालण्यासाठी स्वदेशी आणि बहिष्कार हे आर्थिक कार्यक्रम राष्ट्रवादाला जोडण्याचा प्रयत्न करतात. ब्रिटिश राजवटीचा साम्राज्यवाद भारतीयाच्या अधोगतीचा कारण बनला आहे. ही राजवट नष्ट करण्यासाठी त्यांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाची मांडणी केली. धर्माच्या परिभाषेत राष्ट्रवादाची मांडणी केल्यामुळे प्रचंड समर्थन लाभले. त्यांच्या राष्ट्रवादी विचारांमुळे राजकारणाबाबत अनभिज्ञ असणारे तरूण, कामगार, शेतकरी मोठया प्रमाणावर राजकारणात सक्रिय झाले. टिळकांनी धर्माच्या आधारावर राष्ट्रवाद मांडल्यामुळे सामान्य जनतेचा प्रचंड पाठिंबा त्यांना मिळाला. त्यामळे त्यांना भारतीय अंसतोषाचे जनक वा तेल्या ताबोळयांचे पुढारी मानले जातात.

लोकमान्य टिळकांना राजनीतिक क्षेत्रात आक्रमक राष्ट्रवादाचे प्रणेते मानले जातात. त्यांच्यावर अनेक जण सशस्त्र क्रांतीचे समर्थक होते असाही आरोप करतात. परंतु टिळकांनी सशस्त्र क्रांतिचे समर्थन केले नाही. टिळकांना भारतात क्रांती हवी होती परंतु ती रक्त न सांडता. टिळकाच्या समकालीन काळात मवाळाच्या अर्ज आणि विनंत्याचा मार्ग कुचकामी ठरला होता. ब्रिटिश सरकार भारतीयांच्या अर्ज आणि विनंत्याना किंमत देत नव्हते. म्हणून त्यांनी राजकीय हक्काच्या मागणीसाठी आक्रमक साधनाचा वापर करून ब्रिटिशावर दडपण निर्माण केले. त्यांनी निर्माण केलेल्या दडपणामुळे ब्रिटिशांना भारतीयांच्या मागण्याकडे लक्ष देणे भाग पडले. बंगालच्या फाळणीनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीतून त्यांनी आक्रमक राष्ट्रवादाचा उपयोग करण्याची गरज भासली. काँग्रेस ही संघटना मूठभर सुशिक्षिताची मक्तेदारी होती. काँग्रेसची चळवळ ही मूठभर लोकांची चळवळ होती. म्हणून टिळकांना काँग्रेसच्या स्वरूपात बदल घडवून आणण्यासाठी चळवळीची साधने बदलली. आक्रमक साधनाचा वापर करून काँग्रेसच्या चळवळीला जनचळवळीत परावर्तित केले. जनतेच्या आत्मविश्वास आणि संघटनशक्तीवर भर दिला. जनतेत स्वातंत्र्यासाठी त्याग आणि कष्ट

करण्याची तयारी ठेवावी हे आवाहन केले. उदारमतवादयांच्या संवैधानिक मार्गावर कठोर प्रहार केले. मात्र ते आक्रमक राष्ट्रवादाचे समर्थक असूनही त्यांनी कधीही क्रांतीला प्रोत्साहन दिले नाही. फक्त अनावश्यक सरकारी कायदेभंगासाठी जनतेला प्रोत्साहित केले. लोकांना हिंसा व रक्तपातासाठी प्रोत्साहन दिले नाही. त्यांचा प्रमुख क्रांतिकारकांशी प्रत्यक्ष संपर्क होता. १९०२ मधील बाँम्बहल्ला, रँड आणि आयर्स्ट यांच्या खुनाशी टिळकांचा संबंध जोडला गेलेला असला तरी ते कोणत्याही क्रांतिकारी संघटनेचे नेते नव्हते. याउलट त्यांनी युवक क्रांतिकारकांना संयमाला सल्ला दिलेला दिसतो. ते साधनशुचितेला बांधिल न राहाता विभिन्न आक्रमक साधन आणि दबावाच्या राजनीतीवर विश्वास ठेवतात. सशस्त्र विद्रोह विश्वास ठेवणारे नेते नव्हते. टिळकांनी चळवळीत शस्त्रांच्या वापराला अनुमती दिली नाही. परंतु त्यांनी क्रांतिकारी मार्गावर नैतिकतेच्या आधारावर टीका देखील केली नाही. त्यांचा क्रांतिकारी मार्गावर अविश्वास नव्हता पण तत्कालीन परिस्थितीत क्रांतिकारी साधनाचा वापर करण्यास योग्य समजत नव्हते. टिळक सांगतात की, आमच्या जवळ शस्त्र नाहीत परंतु आमचे शस्त्रावाचून अडणार नाही. आमच्याकडे बहिष्कार व स्वदेशी ही शस्त्रे आहेत याचा अर्थ क्रांतिकारी राष्ट्रवादाचे समर्थक असले तरी क्रांतीतून देश स्वतंत्र होण्याची आकांक्षा करत नव्हते.

प्राचीन भारतीय संस्कृतीतील परंपराचे पुनरूज्जीवनातून राष्ट्रवाद संकल्पनेचे टिळक विश्लेषण करतात. खरा राष्ट्रवादी आपल्या जुन्या संस्कृतीवर आपली इमारत बांधू इच्छितात. हिंदू धर्मात राष्ट्रउभारणीस आवश्यक घटक आहेत. या घटकांच्या आधारावर ते राष्ट्रवादाची मांडणी करतात.

**प्र.२ रा. लोकमान्य टिळकांचे समाजसुधारणे बद्दलचे विचार सांगा.**

**किंवा**

**लोकमान्य टिळकाचे समाजसुधारण आधी की राजकीय सुधारणा आधी यावादाबद्दलची भूमिका स्पष्ट करा?**

लोकमान्य टिळक आणि गो.ग.आगरकरांचा सामाजिक सुधारणेच्या प्रश्नावरील मतभेद प्रामुख्याने सामाजिक व राजकीय या दोहापैकी कोणत्या मुद्याला प्राधान्य द्यावे यावरून झाले. राष्ट्रसभेच्या स्थापनेनंतर काही काळात समाजसुधारणेला जास्त महत्त्व द्यावे की राजकीय सुधारणेला जास्त महत्त्व द्यावे हा वाद निर्माण झाला होतो. या वादामुळे काँग्रेस अंतर्गत दोन गट निर्माण झाले होते. सामाजिक सुधारणेला महत्त्व द्यावे हे मवाळांचे मत होते. तर राजकीय सुधारणांना प्राधान्य द्यावे हे जहालाचे मते होते. टिळकांच्या मते सामाजिक सुधारणापेक्षा राजकीय सुधारणा जास्त महत्त्व देतात.त्यासाठी ते खालील मुद्दे मांडतात.

१) भारतीय जनतेचे समोर दोन प्रश्न आहेत.१) राजकीय प्रश्न २) सामाजिक प्रश्न टिळकांच्या मते राजकीय स्वातंत्र्याला जास्त महत्त्व दिले पाहिजे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर टप्प्याटप्प्याने सामाजिक सुधारणा करता येतील. जगात अनेक महत्त्वपूर्ण परिवर्तने सामाजिक सुधारणेच्या पूर्वी झालेली दिसतात. राष्ट्रभक्तीची प्रेरणा व शक्ती असली म्हणजे कोणतेहे सामाजिक व्यंग प्रगतीची वाट अडवू शकत नाही. या मताच्या विचार करता टिळकांना स्वातंत्र्यप्राप्ती हे महत्त्वाचे ध्येय वाटत होते.

२) समाजसुधारणा मंदगतीने होत असतात त्यासाठी घाई करून चालत नाही. सुधारणासाठी लोकमत अनुकूल करावे लागते. म्हणून ब्रिटिशाकडून घाई गर्दीने सुधारणा करणे योग्य नाही. टिळकांना सरकारमार्फत सामाजिक सुधारणा घडवून आणू नयेत या मताचे होते.

३) भारतात कायदयामार्फत समाजसुधारणा करण्याचे ठरविल्यास काही लोक कायद्यास अनुकूल तर काही प्रतिकूल असतील. परिणामतः समाजाचे दोन गटात विभाजन होऊन देशाच्या एकात्मतेला तडा जाईल. राष्ट्राच्या दृष्टीने घातक गोष्ट आहे. टिळकांचा समाजसुधारणेला विरोध नव्हता तर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी केलेल्या कायद्याद्वारे अंमलात आणण्यास विरोध होता.सामाजिक सुधारणेचा संदर्भ धर्म आणि परंपरेशी येतो. त्यामुळे त्यासंबंधीचा पुढाकार परिपक्व लोकमताकडून घेतला गेला पाहिजे. परकीय सत्तेकडून नव्हे असे त्यांना वाटत होते.

४) समाजसुधारणेचे कार्य ब्रिटिशाकडे देऊ नये. कारण त्यांना आपल्या देशातील रूढया व परंपरा माहित नाहीत. ते समाजसुधारणाच्या माध्यमातून भारतीय समाज जीवनात हस्तक्षेप करण्याची ब्रिटिशांना संधी मिळेल. त्यामुळे समाजसुधारणा आपल्याच देशातील लोकांनी कराव्यात.

५) भारतीय समाज परंपरा मानणारा आहे. म्हणून समाजसुधारकांनी परकीयाचे अनुकरण करू नये. सुधारणेच्या नावाखाली जनतेच्या श्रध्दा नष्ट करू नये. सुधारणा घडवून आणण्यासाठी भारतातील चांगल्या परंपरा व गोष्टीचा स्वीकार करावा. सामाजिक सुधारणेबाबत रूढींना चिटकून राहू नये आणि सामाजिक सुधारणेच्या बाबतीत नोकरशाहीचा हस्तक्षेप अमान्य करावा.

६) ज्या समाजसुधारकांना आपल्या धर्म व संस्कृतीबद्दल आदर आहे. त्यानाच समाजसुधारणा करण्याचा अधिकार द्यावा. जे लोक आपल्या संस्कृतीला कमी लेखतात त्यांना समाजसुधारणेचा अधिकार देऊ नये. तसेच समाजसुधारकांनी सुधारणा स्वत: आचरणात आणाव्या आणि मग जगाला उपदेश करावा.

टिळकांच्या वरील विचारावरून त्यांचा समाजसुधारणेला विरोध नव्हता. मात्र ब्रिटिश राज्यकर्त्याकडून कायद्या मार्फत सुधारणा करू नये असे त्यांना वाटत होते. टिळकांचा जाती व्यवस्थेला विरोध होता. त्यांनी सरू केलेल्या गणेश उत्सव आणि शिवजयंतीत सर्व जाती धर्माचे लोक सहभागी होत असत. त्यानी दारूबंदीचे समर्थन केले. टिळकांनी वैयक्तिक जीवनात ही सुधारणेचा अवलंब केला. मुलीचा विवाह सोळा वर्षानंतर केला. पाश्चात्याचे अनुकरण करून केल्यास सामाजिक सुधारणेचा हेतू विफल होईल. टिळकांचा सामाजिक सुधारणेबाबत कृतिशील आणि उदारमतवादी स्वरूपाचा दिसतो. पण कायदयामार्फत समाजसुधारणा करणे त्यांना पसंत नव्हते. त्यांच्या या दृष्टिकोणामुळे त्यांना सनातनी वा प्रतिगामी म्हटले जाते.

**होमरूल लीग चळवळ-** डॉ.ॲनी बेंझट यांनी भारतात होमरूल चळवळ सुरू केली. या चळवळीचे उदिष्टये साम्राज्यांतर्गत स्वयंम शासन प्राप्त करणे किंवा टप्प्याटप्प्याने ब्रिटिशाकडून राजकीय सुधारणा पदरात पाडून घेणे हा मूळ उद्देश होता. या उद्देश प्राप्तीसाठी देशभर लोकमत संघटित करून होमरूल चळवळ सुरू झाली. या संघटनेच्या देशातील प्रमुख शहरात शाखा काढण्यात आल्या. राष्ट्रीय सभेत जहाल आणि मवाळाच्या एकीकरण झाल्यानंतर टिळकांनी राष्ट्रीय सभेच्या कार्यातून संन्यास घेऊन होमरूल तत्त्वाचा प्रचार करण्यासाठी देशभर दौरे आयोजित केले. या काळात १९१९ चा सुधारणा कायदा जाहीर झाला. या कायद्याने भारतीयांच्या आकांक्षा पूर्ण होणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे टिळकांनी उजाडले पण सूर्य कोठे आहे? हा अग्रलेख लिहून सुधारण किती कुचकामी आहेत हे दाखवून दिले. लष्कर, परराष्ट्रसंबंध आणि संस्थाने इ.विषय सोडून सर्व सत्ता भारतीय प्रतिनिधिच्या हातात द्यावी ही मागणी राष्ट्रीय सभेने सुरू केले. १५ वर्षाच्या आत भारतीयाकडे सत्तांत करावे. याकाळात टिळक होमरूल तत्त्वांच्या प्रसारासाठी देशभर दौरे काढत होते. टिळकांनी या चळवळीचे नेतत्व स्वीकारल्यामुळे चळवळीला देशभर पाठिंबा मिळू लागला. होमरूलच्या विस्तारासाठी काँग्रेस अधिवेशनात पूर्ण प्रांतिक स्वराज्य आणि मध्यवर्ती सत्तेत समान भागीदारी बाबत ठराव मंजूर केला. हा ठराव ॲनी बेंझट यांना मान्य नव्हता. परिणामत: टिळक आणि बेझंट यांच्यात मतभेद झालेत. टिळकांनी होमरून चळवळीचे नेतृत्व सोडले. टिळकासारखा लोकप्रिय नेता चळवळीला सोडून गेल्यामुळे चळवळीला उतरती कळा लागली.

**प्र.२ रा. टिळकांची चतु: सूत्रीची संकल्पना वा विचार स्पष्ट करा?**

ब्रिटिश सरकारची दडपशाही आणि जनतेचे शोषण नष्ट करण्यासाठी प्रखर राष्ट्रीय चळवळ निर्माण करण्याची गरज टिळकांना वाटली. म्हणून त्यांनी चार तत्वाचा पुरस्कार केला. ही तत्वे चतु:सूत्री या नावांनी ओळखली जातात. १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या कलकत्ता येथील अधिवेशनात अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी चतु:सूत्रीला पाठिंबा देऊन ठराव मंजूर केला. स्वराज्य ध्येयाच्या पूर्तीसाठी स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण हे मार्ग आहेत. या कार्यक्रमातून देशासाठी त्याग करणारी आणि नि: स्वार्थी कार्य करणारी पिढी तयार होईल, ती पिढी जहालांच्या चतु:सूत्री कार्यक्रमातून विकसित होईल. स्वदेशी आणि बहिष्कारातून स्वदेशी उद्योगांना चालना मिळले. भारतीय जनता स्वावलंबी बनेल. आर्थिक शोषण कमी होईल. राष्ट्रीय शिक्षणामुळे जनतेत राष्ट्रीय प्रवृत्ती जागृत होऊन पारंतत्र्याबद्दल तिरस्कार निर्माण होईल. त्या प्रयत्नातून स्वातंत्र्याचा मार्ग मोळका होईल. या तत्त्वात पुढील चार घटकांचा समावेश होता.

१) **स्वदेशी -** टिळकांनी स्वदेशीच्या माध्यमातून राष्ट्रीय आंदोलन उभारण्याचा प्रयत्न केला. दादाभाईनी भारताच्या दारिद्रयाला ब्रिटिश जबाबदार आहेत. त्यांनी भारताची लूट करून कच्चा माल पुरविणारा आणि ब्रिटिशाचा पक्का माल घेणारा देश अशी ओळख बनविली. ब्रिटिशाच्या या धोरणामुळे भारतातील उद्योगधंदे बुडाले, लोक बेकार झाले, त्यामुळे दारिद्रय

वाढले. टिळकांचा स्वदेशीचा विचार दादाभाईनी मांडलेल्या आर्थिक शोषण सिद्धांतावर आधारलेला आहे. स्वदेशीचा विचार ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकण्यापुरता मर्यादित नव्हता तर सरकारवर दडपण आणून जनतेच्या मागण्या पूर्ण व्हाव्यात हा हेतू होता. स्वदेशी मालावर वाजवी कर लादल्याऱ्या सरकारी धोरणाच्या विरोधात प्रतिकाराचे शस्त्र म्हणून टिळकांनी स्वदेशीचा वापर केला. देशीमालावर अवाजवी कर लादणाऱ्या परकीय राजवटीला चपराक होती. स्वदेशी बाबत सुशिक्षित वर्गावर फार मोठी जबाबदारी आहे. गरीब लोक ब्रिटिशाचे कपडे वापरत नाही. सुशिक्षितांनी सुद्धा परदेशी कपडे वापरू नये. म्हणून टिळकांनी स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन केले होत. स्वदेशीमुळे देशाचा पैसा देशातच राहील. त्यामुळे भारतात भांडवल निर्मिती होऊन औद्योगिक प्रगती होईल. लोकाना रोजगार प्राप्त होईल. परकीय वस्तूपेक्षा स्वदेशी वस्तू महाग असली तरी तीच वापरावी कारण त्यात त्याग भावना आहे. स्वदेशी वापरल्याने ब्रिटिशांचे नुकसान होईल.उदा. चार कोटीचा विदेशी माल घेतल्यास चार कोटी रूपये विदेशात जातील. याउलट पाच कोटीचा स्वदेशी माल घेतल्यास सर्व पैसे भारतात राहील. टिळकांनी स्वदेशीची चळवळ आर्थिक स्वरुपाची न मानता राजकीय व नैतिक दृष्टया महत्त्वाची मानतात. आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तु वापरण्याची भूमिका तयार करावी ही स्वदेशीची मागील प्रमुख भावना होती. त्यासाठी भारतीयांनी आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तू वापरण्याची प्रतिज्ञा घ्यावी आणि ती अंमलात आणावी. त्यातून स्वेदशी उद्योग आणि व्यापाराला संरक्षण मिळेल ही टिळकांची स्वदेशीमागील नैतिक भूमिका होती.

२) **बहिष्कार-** टिळक बहिष्काराचा विचार आर्थिक किंवा औद्योगिक दृष्टीने करत नसून राजकीय चळवळीचे साधन या अर्थाने करतात. बहिष्कार ही स्वदेशीला पूरक चळवळ आहे. खऱ्या अर्थाने बहिष्कार अमलात येईल तेव्हा ब्रिटिशांना एक दिवस सुद्धा राज्य चालविणे अशक्य होईल. बहिष्काराची मुख्य सूत्रे म्हणजे आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तू वापराव्यात आणि परकीय वस्तूवर बहिष्कार टाकावा. ही चळवळ आर्थिक नसून राजकीय आहे. भारतीयाच्या सर्व गरजा भारतात पूर्ण होणार नाहीत. त्यासाठी आपल्या गरजा कमी कराव्यात. ज्या वस्तू भारतात तयार होत नाही. त्या वस्तू ब्रिटन सोडून इतर देशाकडूप आणाव्यात. भारत कितीही दुर्बल असला तरी एकजुटीने बहिष्काराचा अवलंब केल्यास ब्रिटिशांना नमवता येईल. बहिष्काराची चळवळ यशस्वी करण्यासाठी जनतेकडून योग्य प्रतिसाद आणि त्यागाची आवश्यकता आहे. जनतेच्या सहकार्याशिवाय ही चळवळ परिणामकारक ठरणार नाही. बहिष्कार साधनाची योग्यता पटवून देण्यासाठी टिळक सांगतात की, जनता कितीही लाचार असली तरी खंबीरपेण बहिष्काराचा मार्ग अवलंब करण्यास धाडस दाखवू शकले तर राज्यकर्त्यांस जेरीस आणून आपल्या मागण्या मान्य करू शकते. बहिष्काराची कृती करण्यास विद्यार्थी, निरक्षर, बहुजन समाज पुढे येतो पण शिक्षित मध्यवर्गीय आणि समाजातील सधन घटक पुढे येत नाही. बहिष्काराची चळवळ पूर्णता राजकीय नसली तरी बेजबाबदार आणि जुलूमी ब्रिटिश राज्यकर्त्यांना ठिकाणावर आणण्यासाठी उपयुक्त आहे. बहिष्काराद्वारे त्यांच्या आर्थिक नाडया आवळून त्यांच्या व्यापारी प्रवृत्तीला आळा घातल्याशिवाय चळवळीची व्यवहार्यता स्पष्ट होणार नाही. या पद्धतीने टिळक बहिष्काराच्या मार्गाची यर्थाथता स्पष्ट करतात.

३) **राष्ट्रीय शिक्षण-** टिळकांच्या काळात बहुसंख्य शिक्षणसंस्था सरकारी होत्या. त्या संस्थातून दिले जाणारे शिक्षण राष्ट्रभक्ती शून्य होते. शिक्षणाच्या सर्व क्षेत्रात पाश्चिमात्याचे अनुकरण करणाऱ्या स्वाभिमान शून्य पदवीधराच्या संख्येत भर पडत होती. कारकूनी पद्धतीचे शिक्षण भारतीयांना दिले जात होते. सरकारी शाळातून लाचार सरकारी नोकरांची निर्मिती केली जात होती. त्यांना राष्ट्रीय आंदोलनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला जात होता. विजयी राज्यकर्ते कधीही पराभूतांना राष्ट्रधर्म शिकवत नाही. ब्रिटिशांनी भारतीयामध्ये न्यूनगंड निर्माण होईल अशा प्रकारे शिक्षण दिले. अशा शिक्षणातून भारतीयांचा स्वाभिमान नष्ट होऊ लागलेला होता. म्हणून टिळक या शिक्षणाचा धिक्कार करतात आणि राष्ट्रीय शिक्षणाचा आग्रह धरतात."राष्ट्रीय शिक्षण म्हणजे विज्ञान, उद्योगधंदे आणि व्यापाराचे शिक्षण देऊन देशास विकासाकडे नेणारे आणि नव्या पिढीत स्वाभिमान व मातृभूमीसाठी त्याग करण्याची मनोवृत्ती निर्माण करणे होय" इंग्रज सरकार या प्रकारचे शिक्षण देत नसल्याने त्यांच्यावर विसंबून राहणे योग्य नव्हे. इंग्रजांनी कारकूनी ताफे तयार करण्याचे धोरण आखले आहे. ब्रिटिशांच्या शिक्षणातून पाश्चात्य पद्धतीवर भर देते. सुशिक्षितांना स्वदेशातील प्रत्येक गोष्टीबद्दल तिरस्कार वाटतो. भारतीयाचा गेलेला राष्ट्रीय स्वाभिमान विकसित करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणाची गरज आहे. या शिक्षणात उद्योग व हस्तव्यवसायाचा समावेश केला जाईल. त्यामुळे नोकरीसाठी ब्रिटिशाकडे भीक मागण्याची आवश्यकता राहणार नाही. या

शिक्षणातून विज्ञान, शास्त्र, उद्योगधंदे, व्यापार यात भरभरात होईल. सरकारी अनुदानामुळे शिक्षणसंस्था सरकारच्या मर्जीवर चालतात. या संस्था भारतीयांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी अनावश्यक आहेत. राष्ट्रीय शिक्षणातून नव्या पिढीत स्वाभिमान, कष्टाळूपणा आणि मातृभूमीसाठी कौटुंबिक सुख व सर्वस्वाचा त्याग करण्याची मनोभावना तयार होईल. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा काँग्रेसने निर्माण कराव्यात किंवा शाळांना आर्थिक मदत करावी असा टिळक सल्ला देतात. टिळकांनी सुरू केलेल्या राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ खऱ्या अर्थाने गांधीच्या काळात शक्तिमान बनली. राष्ट्रीय शिक्षणाची संस्था कायदेभंग चळवळीची केंद्रे बनली यातून टिळकांच्या कार्याचे महत्त्व लक्षात येते.

४) **स्वदेशी-** १९०६ च्या काँग्रेस अधिवेशनात स्वराज्य संकल्पनेची मांडणी सर्वप्रथम करण्यात आली. टिळकांचे चतु:सूत्रीचे स्वराज्य अंतिम ध्येय होते. त्याकाळात स्वराज्याचा अर्थ साम्राज्यांतर्गत स्वयंशासन किंवा वसाहतीचे स्वराज्य हा होता. वसाहतीच्या स्वराज्यातून पूर्ण स्वातंत्र्याकडे जाता येईल. म्हणून टिळक स्वराज्याची मागणी करतात. टिळकांच्या मते इंग्रजी राज्याला कधीही स्वराज्य मानता येणार नाही. कारण ब्रिटिश राज्यकर्ते परकीय आहेत आणि त्यांचे हितसंबंध स्वत:च्या देशात गुंतलेले आहेत. ती राजवट नष्ट झाल्याशिवाय स्वराज्य शक्य नाही.

**अ) नैतिक व आध्यात्मिक आशय -** टिळकांच्या मते व्यक्तीला नैतिक बनविण्यासाठी राज्यसंस्था अस्तित्वात आली. स्वत:चा नैतिक विकास व्हावा हे व्यक्तीचे उदिष्टये असते. नैतिक विकासासाठी अनुकूल परिस्थिती फक्त स्वराज्यातच निर्माण होऊ शकते. म्हणून टिळक आध्यात्मिक व नैतिक विकासासाठी स्वराज्याची मागणी करतात.

**ब) राजकीय आशय-** स्वराज्य म्हणजे राजकीय हक्कांची प्राप्ती इतका मर्यादित अर्थ टिळक घेत नाही. स्वातंत्र्याची इच्छा मनात बाळगणे हा मनुष्य स्वभावाचा एक धर्म आहे. आपले व्यवहार परकियांच्या संमतीने चालावे हे कोणाही योग्य वाटणार नाही. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वराज्य आवश्यक आहे. स्वतंत्र असणारा समाजात सर्व प्रकारच्या सुधारणा करणे शक्य असते. भारताचा कारभार ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मर्जीवर चालतो. स्वराज्याच्या माध्यमातून भारतीयांच्या हातात राज्यकारभार करता येईल म्हणून ते स्वराज्याची मागणी करतात. देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी स्वराज्य ही पहिली आवश्यकता मानतात. पारतंत्र्यात समाजाची उन्नती होती. केवळ स्वतंत्र असलेला समाजच आपली आर्थिक, सामाजिक, धार्मिक व नैतिक उन्नती घडवून आणू शकतो. भारताच्या सर्व प्रकारच्या सुधारणा करण्यासाठी स्वराज्य प्राप्त होणे गरजेचे असल्याचे मानतात.

**प्रतियोगिता सहकारिता-** ब्रिटिशांनी १९१९ च्या सुधारणा कायद्याची घोषणा केली. या सुधारणा भारतीयांनी स्वीकाराव्या की नाही यावरून राष्ट्रीय सभेत दोन गट पडले होते. महात्मा गांधी व मदनमोहन मालविय यांनी सुधारणेला बिनशर्त पाठिंबा दिला तर बिपीनचंद्र पाल व चितरंजन दास यांनी सुधारणांचा धिक्कार करावा हे मत मांडले. टिळकांनी दोन्ही गटामध्ये समन्वय घडवून आणण्यासाठी मधला मार्ग काढला. त्यालाच प्रतियोगिता सहकारिता हे नाव पडले. राज्यकर्त्यांनी जे समोर ठेवले आहे त्यांचा स्वीकार करावा आणि अधिक मिळविण्यासाठी प्रयत्न करावा हे या मार्गाचे मुख्य सूत्र होते. सरकार जेवढया प्रमाणात सहकार्य करत असेल तेवढया प्रमाणात सरकारला सहकार्य करावे. जिथे सरकार सहकार्य करणार नाही तेथे सरकारशी असहकाराच्या मार्गान प्रतिउत्तर द्यावे. ब्रिटिशाचा भारतातील कारभार आपल्या सहकार्यावर चालतो. ब्रिटिशांच्या हट्टीपणाला असहकाराने उत्तर दिल्यास त्यांना राज्यकारभार करणे अशक्य होईल. आपण नि:शस्त्र असला तरी शस्त्रावाचून आपले काहीही अडणार नाही. बहिष्कार व असहकार ही शस्त्रे आपल्या हातात आहेत. या शस्त्राच्या जोरावर आपणास हवे तेव्हा स्वातंत्र्य मिळविता येईल. स्वातंत्र्य होण्याची इच्छा आपणांत नसेल तर आपण कायमचे पारतंत्र्यात राहू. शस्त्र प्रतिकार शक्य नसला तरी स्वयंम निर्णयाच्या माध्यमातून ब्रिटिशांना असलेले सहकार्य थांबता येईल. टिळकांच्या प्रतियोगिता सहकार्य तत्वापासून प्रेरणा घेऊन गांधीजीनी असहकाराची चळवळ व्यापक प्रमाणात उभारली. याच काळात भारताच्या राजकीय क्षितिजावर गांधीच्या नेतृत्वाचा उदय होत होता. त्यांनाही ब्रिटिशांशी सहकार्य नको होते. गांधींनी टिळकांशी चर्चा करून असहकार आणि सत्याग्रह मार्ग स्वीकारण्याचे निश्चित केले यात टिळकांच्या कार्याचा मोठेपणा दिसून येतो.

**टिप- टिळकांचे विचाराचे परिक्षण-** लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचार व कार्यक्रमाची तीन उद्दिष्टये हरदास यांनी सांगितली आहेत. राष्ट्राचा तेजोवध करणाऱ्या सुधारणावादी नेतत्वास हतप्रभ करणे, विविध मार्गांनी राजकीय असंतोष

निर्माण करणे आणि त्या असंतोषाला पूर्ण स्वातंत्र्याच्या एकाच ध्येयवादी सूत्रात गोवून एकसंघ जनशक्ती निर्माण करणे ही तीन उद्दिष्टयांची पूर्ती टिळक अशतः पूर्ण करू शकले. कारण टिळकांच्या अखेरपर्यंत सुधारणावादी नेतृत्व पूर्णपणे हतप्रभ होऊ शकले नाही. आयुष्याच्या अखेरीस त्याचे विचार जहालापेक्षा नेमस्ताच्या जवळचे होते. टिळकांनी परकीय सत्तेविरूद्ध लोकमत तयार केले. गुलामगिरी व बौद्धिक आणि मानसिक कुचंबणेवर तसेच आर्थिक पिळवणुकीवर प्रकाशझोत टाकून राज्यकर्त्यांविरूद्ध जनमाणसात त्वेष निर्माण केला त्यामुळे त्यांना भारतीय असंतोषाचे जनक ठरले. त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनाची तत्त्वज्ञानाशी सांगड घालून दिली. त्यांनी स्वराज्याचा अर्थ भारताच्या अभिजात मूल्यव्यवस्थेतून घेतला. भारत धर्माच्या पारंपरिक मूल्यांचे नवीन संस्करण केले. भारतीय सभ्यतेतील जीवन आदर्शाना उचलून धरले. परिस्थितीच्या दडपणातून ते राजकारणात आलेले असले तरी कोणत्याही समकालीन भारतीय नेत्यापेक्षा सर्वात जास्त लोकप्रियता टिळकांना लाभली.

शासनाने दंडशक्तीचा वापर करून टिळकांचे नेतृत्व निष्प्रभ करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे राज्यकर्ते व भारतीय जनता यांच्यातील मध्यस्थाची भूमिका त्यांच्या वाटयाला येऊ शकली नाही. टिळकांनी द्वंद्व, निर्भर्त्सना व उपहास मार्गावर राजकारण उभारण्याचा प्रयत्न केल्यामुळे असंख्य शत्रू निर्माण केले. टिळकांनी सामाजिक क्षेत्रात घेतलेल्या प्रतिगामी भूमिकेमुळे ब्राह्मणवादाचा शिक्का बसला. गणपती आणि शिवाजीची प्रतिके वापरल्यामुळे टिळकाचा राष्ट्रवाद भारतीय होण्याऐवजी महाराष्ट्रीयन राहिला. राजकीय आंदोलनात्मक संस्थात्मक चौकटी उभारण्यात आलेल्या अपयशामुळे टिळकांच्या राजकारणाला अखिल भारतीय उंची लाभू शकली नाही. महाराष्ट्रातील जुन्या नव्या परंपरा आश्रय घेतल्यामुळे दक्षिणेत मोठया प्रमाणावर अनुयायी लाभले असले तरी त्यांचा विस्तार देशभर होऊ शकला नाही. कॉंग्रेसच्या संघटनात्मक व्यासपीठाचा प्रभावी वापर करण्याऐवजी स्वतंत्रपणे चळवळ चालविण्याचा प्रयत्न केल्यामुळे एका मर्यादेपेक्षा जास्त यश मिळू शकले नाही.

हिंदू समाजाच्या पूर्वसंचिताचे गौरवीकरण टिळकांनी केले. सद्यःस्थितीतील वाईट परिस्थितीस परकीय राजवट जबाबदार मानल्यामुळे तसेच परधार्जिण्या नेमस्तांवर कठोर प्रहार केल्यामुळे राष्ट्रीय मूल्यांचा राखणदार अशी प्रतिमा जनमाणसांत साकार झाली. पश्चिमी राजवटीच्या स्थैर्याला सुरूंग लावण्याचे सामर्थ्य आपल्या नेतृत्वात आहे अशी जनमाणसांची खात्री करून दिली. टिळकांच्या वाढत्या लोकप्रियतेच्या भीतीने परकिय राज्यकर्त्यांनी त्यांना दोनदा कारावासात टाकले. त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवले. पण त्यांच्या मुळे त्यांच्या नेतृत्वाचे खच्चीकरण होण्याऐवजी विस्तारले त्याचे बहुतांशी श्रेय मुंबई सरकारकडे जाते. टिळकाचे राजकीय कार्य राजकीय चळवळीला कलाटणी देणारे होते. राष्ट्रीय चळवळीची सूत्रे गांधीच्या हाती येईपर्यंत देशभर लोकप्रिय असलेले टिळक एकमेव नेते होते. ब्रिटिशाविरूद्ध स्वातंत्र्य चळवळीला खऱ्या अर्थाने दिशा व नवे परिणाम टिळकांनी दिले. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य आंदोलनातील पहिल्या पर्वातील टिळक हे एकमेव प्रभावी नेते होते असे मानण्यास वाव आहे.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. लोकमान्य टिळकांनी लिहीलेले दोन ग्रंथ सांगा.
उत्तर - टिळकांनी गीता रहस्य आणि दि आरोयन आर्क्टिक होम इन द वेदाज हे ग्रंथ लिहले.

२. लोकमान्य टिळकांनी भारतात कोणते दोन उत्सव सुरू केले .
उत्तर - टिळकांनी भारतात शिवजंयती व गणेश उत्सव हे दोन उत्सव सुरू केले होते.

३. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या वर्तमान पत्राची नांवे सांगा.
उत्तर - टिळकांनी केसरी व मराठा ही वर्तमान पत्रे सुरू केली.

४. ब्रिटिश नोकरशाही विषयी लोकमान्य टिळकांची मते लिहा.
उत्तर - भारतात ब्रिटिश अधिकाऱ्यांची हुकूमशाही निर्माण झाली आहे. ब्रिटिश अधिकारी बेजबाबदार चैनी व विलासी आहेत. भारतीयाच्य सुख दु:खाची त्यांना कल्पना नाही. देशाचा खजिना ते चैनी जीवन जगण्यासाठी खर्च करतात. ब्रिटिशाच्या अरेरावीमुळे भारतीयांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे टिळकांनी ब्रिटिश नोकरशाहीवर प्रखर हल्ला चढविला.

५. लोकमान्य टिळकांचा जहालमतवाद सांगा.
उत्तर - टिळकांच्या मते ब्रिटिशांची मनधरणी करण्यापेक्षा भारतीय जनतेला जागृत करून स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केल्या पाहिजे. भारतीय जनता राज्यकारभार करण्यास लायक आहेत. सुरूवातीला भारतीय लोक प्रथम चुका करतील पण जसेजसे अनुभव येतील तसेतसे शहाणे होतील. म्हणून ब्रिटिशांनी भारतीयाना स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा.ब्रिटिशाविरूध्द चळवळ केल्यास दडपशाहीच्या मार्गाने अन्याय, अत्याचार करतील. स्वराज्य मिळवून गुलामगिरीच्या जोखडातून कायमची मुक्तता मिळवावी. ब्रिटिश पार्लमेंट, ब्रिटिश जनता व अधिकारी यांच्यात कोणत्याही भेद टिळकांना दिसत नाही. ते सर्व सारखे आहेत असे मानतात.

६. भारतात होमरूल लीग चळवळ कोणी सुरू केली.
उत्तर- भारतात होमरूल लीग चळवळ अनी बेझंट यांनी सुरू केली होती.

७. होमरूल म्हणजे काय?
उत्तर- होमरूल म्हणजे साम्राज्यांतर्गत स्वयंम शासन प्राप्त करणे किंवा टप्प्याटप्प्याने ब्रिटिशाकडून राजकीय सुधारणा पदरात पाडून घेणे होय.

८. प्रतियोगिता सहकारिता चळवळीचे मुख्य सूत्र कोणते?
उत्तर- राज्यकर्त्यांनी जे समोर ठेवले आहे त्यांचा स्वीकार करावा आणि अधिक मिळविण्यासाठी प्रयत्न करावा. सरकार जेवढया प्रमाणात सहकार्य करत असेल तेवढया प्रमाणात सरकारला सहकार्य करावे. जिथे सरकार सहकार्य करणार नाही तेथे सरकारशी असहकाराच्या मार्गान प्रतिउत्तर द्यावे. हे या मार्गाचे मुख्य सूत्र होते.

९. टिळकांच्या चतु:सूत्री समाविष्ट मार्ग कोणते आहेत.
उत्तर- स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य हे टिळकांच्या चतु:सूत्रीतील प्रमुख मार्ग आहेत.

१०. भारतातील प्रमुख जहालमतवादी नेते कोण होते.
उत्तर- लोकमान्य टिळक, लाला लजपतरॉय आणि बिपीनचंद्र पाल हे प्रमुख जहालवादी नेते होते.

## प्रकरण ४ थे
## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**जीवन परिचय-** भारतीय स्वातंत्र्य लढयातील महान क्रांतिकारक, बुद्धिप्रामाण्यवादी समाजसुधारक, प्रसिद्ध वक्ते आणि हिंदूत्वाचे कट्टर पुरस्कर्ते म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर ओळखले जातात. त्यांचा जन्म २८ मे १८८३ ला नासिक मधील भगूर येथे झाला. आईचे नाव राधाबाई व वडीलांचे नाव दामोदर पंत होते ते टिळकांचे कट्टर समर्थक होते. गणेशपंत व नारायण पंत हे त्यांचे भाऊ होते. त्यांचे माध्यमिक शिक्षण नासिक मध्ये होते. सावरकरांनी मित्रमेळावा नावाची संघटना काढली तिचे नाव नंतर अभिनव भारत करण्यात आले. सावरकराचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्यसन महाविद्यालयात झाले नंतर कायदयाचे शिक्षण घेण्यासाठी मुंबई येथे गेले तेथे अभिनव भारत संघटना स्थापन केली. या संघटनेच्या सभासदाला देशाच्या स्वातंत्र्यासाठी तन-मन-धन अर्पण करण्याची प्रतिज्ञा घ्यावी लागत असे. या संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रीय तरूणांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण करून क्रांतीसाठी प्रोत्साहन देत असत. श्यामजी कृष्ण वर्मा शियवृत्ती मिळवून बॅरिस्टरची पदवी होण्यासाठी इंग्लंडला गेले तेथे फ्रि इंडिया सोसायटीची स्थापना करून इंग्लंडमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य लढयाकरिता तयार करण्याचा प्रयत्न केला. नासिकचे कलेक्टर जॅक्सनाचा खून अनंत कान्हेरे यांनी केला. या प्रकरणात सावरकराचा हात होता असे इंग्रजाना वाटत होते. तसेच इंग्रजाविरूद्ध अंसतोष निर्माण करणारे भाषण देण्याच्या आरोपावरून इंग्लंडमध्ये अटक झाली. ब्रिटिशांनी भारतात बोटीने त्यांची रवानगी करत असतांन मार्सेल्स बेटावर बोट उभी असतांना समुद्रात उडी मारून फ्रॉन्समधील मोंसलिस बेटावर पोहचले मात्र ब्रिटिश पोलिसांनी त्यांना पकडून भारतात आणले. राजद्रोहाच्या आरोपावरून ५० वर्ष जन्मठेपेची वा सक्तमजुरीची शिक्षा झाली. अंदमानच्या कारागृहात ही शिक्षा भोगण्यासाठी त्यांची रवानगी झाली. १९२१ मध्ये अंदमानची वसाहत बंद केल्यानंतर येरवडा तरूंगात रवानगी झाली. १९२४ मध्ये तरूंगातून सुटका करुन रत्नागिरी जिल्हात स्थानबध्द करण्यात आले. या काळात त्यांनी अस्पृश्यता निवारण आणि हिंदूचे शुद्धिकरण चळवळ चालविली नंतरच्या काळात हिंदूमहासभेचे अध्यक्ष बनले. रत्नागिरी येथे पतितपावन मंदिर बांधले. ते मंदिर सर्व जातीधर्मातील लोकांसाठी खुले होते. १९३७ मध्ये प्रांतिक सरकारने त्यांची बिनशर्त सुटका केली. दुसऱ्या महायुद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा भारतीयांनी उचलण्यासाठी मोठया प्रमाणावर सैन्यात सहभाग घ्यावा हा सल्ला दिला. त्यामुळे त्यांना रिक्रुट वीर ही पदवी मिळाली. गांधीजींच्या हत्येबद्दल सावकरांना अटक झाली पण ते निदोष सुटले. चीन युद्धावरून केंद्र सरकारवर टीका केली. २६ फेब्रुवारी १९६६ला त्यांचे निधन झाले. मॅझिनीचे चरित्र, हिंदुपदपादशाही, माझी जन्मठेप, हिंदू राष्ट्र दर्शन, जात्युछेदेक निबंध, भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने, संन्यस्त खड्ग व शिखाचा इतिहास इ.ग्रंथ लिहीले. त्यांच्या विचारांवर जोसेफ मॅझिनी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, शिवाजी महाराज, शिवराम पंराजपे, केमाल पाशा, वासुदेव बळवंत फडके, समर्थ रामदास इत्यादीचा प्रभाव दिसतो. १९३८ मध्ये मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय कार्य करत असतांनाही इतिहास, तत्त्वज्ञान, मराठी साहित्य, भाषा शुद्धीकरण चळवळ, लष्करीकरण, हिंदूत्व इत्यादी व्यापक विषयावर चिंतनीय विचार मांडलेल आहेत.

**टिप-सावरकरानी केलेली इतिहासाची मीमांसा वा विश्लेषण आणि पुर्नस्पष्टिकरणाबाबते विचार-**

इतिहासाकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन आहेत सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाच्या दृष्टिकोनातून इतिहासाची मांडणी केली. १८५७ चे स्वातंत्र्य समर, भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने, हिंदूपदपादशाही व शिखाचा इतिहास इ.त्याचे इतिहास विषयक ग्रंथ म्हणजे हिंदू विजयाच्या गौरवगाथा आहेत. भारतीय इतिहासाची पुर्नमांडणी करतांना भारतीय इतिहासात घडलेल्या घटनाबद्दलचे गैरसमज दूर व्हावे हा प्रमुख हेतू ठेवतात. तरूणांसमोर गतकाळातील पराक्रमाचा आदर्श ठेवून त्यांच्यात चैतन्य निर्माण करणे हा उपयुक्ततावादी हेतू सावरकरांचा होता. भारताचा इतिहास युरोपियन लोकांनी लिहीला आहे. त्यांनी इतिहासातील उज्वल भाग टाळून अपयश जास्त मांडले. युरोपियन इतिहासकारांनी उज्ज्वल परंपराची मांडणी न करता पराभव आणि अपयशाची मांडणी केली. भारतीयाचा इतिहास म्हणजे पराभव हे समीकरण बनल्यामुळे लोकांचा आत्मविश्वास नष्ट झाला. गतकाळातील उज्वल इतिहासामुळे तरुणांना स्फुरण चढेल. ते परकीय सत्ता झुगारून देतील. म्हणून सत्ता टिकविण्यासाठी ब्रिटिशांनी भारतीयासमोर खोटा इतिहास ठेवला. त्यामुळे सावरकरांनी भारतीयासमोर

हिंदू विजयाचा इतिहास ठेवला. भारतीय इतिहासाची पुर्नमांडणी करतांना इतिहासाचे तत्त्वज्ञान आणि हिंदू तत्त्वज्ञानाची मीमांसा केली आहे. सावरकरांच्या मते भारतीय स्वातंत्र्यासाठी हिंदूनी प्राचीन काळापासून आत्मबलिदान केले आहे. इ.स.पुर्व ६०० ते इ.स.७०० पर्यंत कोणत्याही परकीय सत्तेला संपूर्ण भारत जिकता आला नाही. हिंदूनी शक, हूण, कुशान आणि ग्रीकांचा पराभव केला. मुसलमानांनी ७११ सिंध प्रांत जिकला असला तरी हिंदूनी मुसलमानांना अन्य प्रांतात शिरू दिले नाही. हजार वर्ष मुसलमानांशी संघर्ष केल्यामुळे त्यांना भारतभर राजवट निर्माण करता आली नाही. राधोबा दादाने हिंदूचा झेंडा अटकेपार नेला. त्यावेळी मुसलमानांचे हिंदूकरण झाले असते तर नंतरचे पराभवाचे प्रसंग टळले असते. हिंदूच्या भोसटपणामुळे नंतरच्या काळात मुसलमानाचे आक्रमण झाले. छत्रपती शिवाजी महाराजानी स्वधर्म व स्वराज्याची कल्पना मांडली. ती हिंदूनी सातत्याने अतःकरणात बाळगावी. हिदवी स्वराज्याचा जन्म महाराष्ट्रात झाला म्हणून हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याची जबाबदारी महाराष्ट्रावरआहे. म्हणून महाराष्ट्राने देशाचे खडगहस्त बनले पाहिजे. केवळ महाराष्ट्रच मातृभूमीला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करू शकेल. भारताच्या स्वातंत्र्यासाठी टिपू व हैदरचा अपवाद वगळता हिंदूनीच संघर्ष केला आहे.

बुद्धकाळापासून तर इंग्रजाशी सुरू असलेल्या स्वातंत्र्य संग्रामापर्यंत इतिहासाचे विश्लेषण सावरकरांनी केलेले आहे. सावरकरांनी हिंदुत्वाच्या माध्यमातून केलेले आहे. सावरकरांनी राजकीय दृष्टिकोनातून मांडून त्यातील वैभवाचे विश्लेषण केले. हिंदू जात परकीय आक्रमाणाचे खचून न जाता प्रतिआक्रमण करून सन्मानाने पुन्हा उभी राहते हे सूत्र सावरकरांनी इतिहासाची मीमांसा करतांना मांडले. गतकाळातील वैभव सांगून भविष्यात हिंदूकडून घडलेल्या चुका होऊ नये हा उद्देश डोळयासमोर ठेवून त्यांनी इतिहासाचा अर्थ स्पष्ट केला. त्यांच्या इतिहास लेखनात संशोधनापेक्षा भावनिक आव्हानाला जास्त महत्त्व आहे. त्यामुळे इतिहासाला प्रचाराचे स्वरूप आले. भारतीय इतिहासाची मांडणी सावरकरांनी काव्यमय पद्धतीने केलेली आहे.

**प्र.१ला. सावरकरांचे हिंदू राष्ट्रवाद किंवा राजकीय विचार स्पष्ट करा?**

**किंवा**

**सावरकरांच्या हिंदू राष्ट्रवाद संकल्पनेचे टीकात्मक परीक्षण करा?**

सावरकरांनी राष्ट्रवादाची हिंदुत्वाच्या दृष्टिकोनातून मांडणी केलेली आहे. त्यांचा राष्ट्रवादाबद्दलचे विचार जाणण्या आधी राष्ट्र म्हणजे काय हे जाणून घेणे आवश्यक आहे.

**१) प्राध्यापक बार्करच्या मते-** विशिष्ट भूप्रदेशात वस्ती करून राहणारा जनसमुदाय म्हणजे राष्ट्र होय.

**२) प्राध्यापक बर्जेसच्या मते-** भौगालिक एकता असलेल्या प्रदेशात वस्ती करणाराआणि वांशिक एकता असणारा जनसमुदाय म्हणजे राष्ट्र होय.

वरिल व्याख्यानुसार राष्ट्रनिर्मितीसाठी धार्मिक, वांशिक आणि भौगोलिक एकात्मता असणे आवश्यक आहे. भौगालिक व वांशिक एकतेबरोबर आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत आणि इतरापेक्षा श्रेष्ठ आहोत ही भावना निर्माण व्हावी लागते तरच समाजात राष्ट्र ही संकल्पना जन्माला येते.

सावरकरांचे राजकीय विचार स्वातंत्र्य संपादनासाठी आवश्यक सशस्त्र क्रांतीचा पूरक आणि प्रखर हिंदू राष्ट्रवादाची भावनेवर आधारित आहेत. ब्रिटिश राजवटीच्या अन्यायकारी जुलूमापासून सुटका करण्यासाठी सशस्त्र क्रांती हा त्यांना अंतिम पर्याय वाटत होता. सावकरांचा हिंदू राष्ट्रवाद हा ब्रिटिशांच्या प्रेरणेने विकसित झालेला मुस्लिम राष्ट्रवादाची प्रतिक्रिया मानली जाते. ब्रिटिशांच्या सहकार्याने १९०६ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना केली. त्यांवर हिंदूनी हिंदू महासभा स्थापन केली. तिचे सावरकर अनेक वर्ष अध्यक्ष होते. हिंदूस्थान हिंदूचा, नाही कुणाचा बापाचा, जो हिंदुस्थानला जन्मभूमी आणि पुण्यभूमी समजतो तो हिंदू ही मांडणी करून हिंदू राष्ट्रवादाची पायाभरणी केली.

**अ) हिंदुत्व-** सावरकरांच्या मते हिंदू समाज हा राष्ट्रस्वरूप आहे. हिंदू हा शब्द प्राचीन काळापासून प्रचलित आहे. प्राचीन काळी आर्य लोक सिंधु नदीच्या काठी राहत होते. त्यांची लोकसंख्या वाढल्यामुळे ते देशाच्या अन्य भागात पसरले. पर्शियन लोक या प्रदेशाला व तेथील लोकांना सप्तसिंधु म्हणत. काळाच्या ओघात 'स' चा 'ह' चा झाला. सप्त हा शब्द बाजुला पडला. आर्यांना हिंदू हा शब्द रूढ झाला. हिंदू समाज पूर्वीपासून भारतभूमीत एकरूप झाला. या शब्दाचा संबंध

भौगोलिक आणि राष्ट्रीयतेशी निगडित आहे. एखाद्या धर्मग्रंथाशी वा धर्ममतांशी संबंध नसून विशिष्ट भूप्रदेश अणि त्यात निर्माण झालेला आणि संस्कृतीशी संबंधित आहे. म्हणून हिंदु समाज राष्ट्र स्वरूप आहे.

हिंदूत्वाची व्याख्या करतांना हिंदू कोणाला म्हणावे याचे स्पष्टीकरण सावरकरांनी केलेले आहे. "ज्या व्यक्तिची पितृभूमी आणि पुण्यभूमी हिंदूस्थान असेल त्या व्यक्तीला हिंदू म्हणावे." याचा अर्थ ज्या व्यक्तीचा जन्म हिंदूस्थान झाला. त्या व्यक्तीचा धर्मसंस्थापक हिंदूस्थानात जन्माला आलेला असेल त्यांना हिंदू म्हणावे. या व्याख्यानुसार बौद्ध, जैन व शीख यांना ही हिंदू मानता येईल. परंतु ख्रिश्चन व मुस्लिमांची पुण्यभूमी हिंदूस्थान नसल्यामुळे त्यांना हिंदू म्हणता येणार नाही. "सिंधु नदीपासून समुद्रापर्यंत पसरलेल्या भारतभूमीस आपली पितृभूमी व पुण्यभूमी समजतो त्यास हिंदू म्हणावे" सावरकरांनी हिंदू धर्म आणि हिंदूत्व यात फरक केलेला आहे. हिंदू धर्मात सण समारंभ, धार्मिक विधी, कर्मकांड इ.गोष्टीचा समावेश होतो तर हिंदूत्वात पितृभूमी बद्दल प्रेम बाळगणे.भारत वर्षाला पुण्यभूमी मानणे यांचा समावेश होतो. हिंदूत्व आणि हिंदू धर्म एकच मानल्यामुळे बौद्ध, जैन, शीख हिंदू पासून अलग राहिले. त्यामुळे हिंदू राष्ट्राच्या निर्मितीत अडथळे निर्माण झाले.

**ब) हिंदुत्वाची वैशिष्टये-** सावरकरांची हिंदूत्व संकल्पनी पुढील वैशिष्टये सांगता येतात.

१. जी व्यक्ती सिंधू नदीपासून ते बम्हपुत्रा नदीपर्यंत आणि हिमालय ते कन्याकुमारीपर्यंतच्या प्रदेशास एक मानून त्यावर निष्ठा ठेवतो.

२. वैदिक काळापासून चालत असलेल्या राष्ट्रभिमानाचा अभिमान बाळगतो.

३. भारत वर्षाला पुण्यभूमी समजतो. पितृभूमीबद्दल निष्ठा टिकवून ठेवण्यासाठी पूर्वजांचे पराक्रम, साहित्य, संस्कृती यांचा अभिमान बाळगतो.

४. पुण्यभूमीसोबत धर्मातील सर्वात पवित्र स्थान ही आपल्या देशात असावे.

सावरकरांनी देश, वंश, संस्कृती तीन घटकांचा समावेश हिंदुत्वात करतात. हिंदूनी आंतरजातीय विवाह केला तरी हिंदूत्व नष्ट होत नाही असे मानतात. सावकरांचे राजकीय विचार हिंदू राष्ट्राभोवती केंद्रीत झालेले आहेत. एका बळकट हिंदू राष्ट्राच्या उभारणीचे स्वप्न होते. एका देशात वास्तव्य, समान भूप्रदेश यावर राष्ट्रीयत्वाची मांडणी न करता धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक समानता यावर करतात. एक राष्ट्रीयत्वात समान परंपरा, समाजहित आणि समान ध्येयवाद आवश्यक असतो. तो ध्येयवाद भारतात हिंदू, जैन, शीख इत्यादीमध्ये आहे मात्र मुस्लिम अणि ख्रिश्चनामध्ये हे ध्येयवाद म्हणून त्यांना वगळून भारतास प्रबळ हिंदू राष्ट्राची उभारणी करू इच्छीतात. सावकरांनी हिंदू राष्ट्रवादाचा पुरस्कार केलेला असला तरी हिंदी राष्ट्रवादाला त्यांनी विरोध केला नाही. भारतातील मुस्लिमधर्मिय हे स्वतंत्र राष्ट्राच्या मागणीचा त्याग करून एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेने एक राहू इच्छित असतील ते त्यास मान्यता देतात.

**क) हिंदू- मुस्लिम संबंध-** एकाच देशात राहणे एवढयाच राष्ट्रीत्वाची उभारणी होऊच शकत नाही. त्यासाठी धार्मिक व सांस्कृतिक समानता असावी लागते. ख्रिश्चन व मुस्लीम भारताला पुण्यभूमी मानू शकत नाही. इस्लाम धर्मिय भावनिकदृष्टया परके असल्यामुळे ते निराळे राष्ट्र आहेत. त्यामुळे कॉंग्रेसचे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रयत्न यशस्वी होऊ शकणार नाहीत. कारण ब्रिटिशांनी मुसलमानांना विभक्त मतदारसंघ देऊन हिंदूपासून अलग केले आहे. हिंदू बहुसंख्याक असल्यामुळे मुस्लिमांना भिती वाटते. हिंदू शैक्षणिक दृष्टया प्रगत असून मुस्लिम शैक्षणिकदृष्टया मागासलेले असल्यामुळे त्यांच्यावर धार्मिक परंपरेचा जास्त प्रभाव दिसतो. मुसलमांनाची पुण्यभूमी भारत नसल्यामुळे त्यांना भारताबद्दल आपलेपणा वाटत नाही. हिंदूची पूण्यभूमी भारत असल्यामुळे ते संघटित होऊन स्वातंत्र्य मिळवू शकतील. स्वातंत्र्यानंतर अहिंदूना योग्य संधी व हक्क मिळतील पण त्यांचे वर्चस्व राहणार नाही. मुस्लिमांच्या अवाजवी मागण्या मान्य केल्या जाणार नाहीत."तुम्ही याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्या वाचुन आणि विरोध कराल तर विरोध करूनही राष्ट्राचा स्वातंत्र्य लढा हिंदू एकटे शेवटपर्यत चालू ठेवतील" अशा पद्धतीने सावरकर हिंदूत्व आणि राष्ट्रीत्व यात फरक करत नाही. राष्ट्रीयत्वात हिंदूत्वाचा समावेश करतात.

**परिक्षण /दोष व मूल्यमापन-** सावरकरांनी हिंदम राष्ट्रवादाची संकल्पना मांडताना राष्ट्र होण्यासाठी आवश्यक घटक हिंदू समाजात आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या संकल्पनेत पुढील दोष आहेत.

१) **भाषिकदृष्टीने हिंदू समाज एकात्म नाही-** सर्व भाषाची जननी संस्कृत असली तरी ती सर्व सामान्यांची भाषा बनू शकली नाही. तसेच हिंदी भाषा देशातील सर्व भागात विकसित झाली नाही. दक्षिण भारतीय हिंदीला विरोध करतात. बऱ्याच राज्यात प्रादेशिक भाषा बोलली जाते. त्यामुळे भारतात भाषेच्या आधारावर राष्ट्राची कल्पना करता येत नाही.

२) **वांशिक व सांस्कृतिक एकात्मता नाही-** हिंदू लोकांमध्ये सांस्कृतिक व वांशिक एकात्मता आहे असे सावरकर म्हणत असले तरी दक्षिण भारतीयावर द्रविड आणि उत्तर भारतीयावर आर्य संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. तसेच हिंदू धर्मात नाग, द्रविड इ.वांशिक विविधता दिसून येते. म्हणून हिंदु राष्ट्र बनविण्यासाठी समान वंश व संस्कृती हा घटक फारसा उपयोगी नाही.

३) **धार्मिक एकात्मता नाही-** सावरकरांनी धर्माच्या आधारावर राष्ट्रवादाची मांडणी केली. मात्र हिंदू धर्मात अनेक पंथ, उपपंथ आहेत. जातीव्यवस्थेमुळे हिंदू धर्माचे विभाजन झालेले आहे. शीख, जैन व बौद्ध स्वतःला हिंदू धर्माचे भाग मानत नाही. म्हणून हिंदु धर्मात एकात्मता नाही.

४) **संकुचित राष्ट्रवाद संकल्पना-** सावरकरांची राष्ट्रवादाची संकल्पना अत्यंत संकुचित आहे. कारण त्यांनी धर्म व वंशाच्या आधारावर राष्ट्रवाद मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या राष्ट्रवादामुळे ख्रिश्चन व मुस्लिमांना राष्ट्रीय प्रभावाबाहेर राहावे लागेल.

**प्र.२ रा सावरकरांचे सैनिकीकरण वा लष्करीकरणा बाबतचे विचार स्पष्ट करा?**

सावरकरांनी देशाच्या संरक्षणासाठी सैनिकीकरणाबद्दलचे विचार मांडले. सावकरांनी सैनिकीकरणाबाबत विस्ताराने चिंतन केलेले आहे. जागतिक पातळीवर दुसऱ्या महायुद्धाचे वातावरण निर्माण होत होते. त्यांच्या फायदा घेऊन हिंदूनी ब्रिटिश सैन्यात भरती होऊन लष्करी शिक्षण घेतले पाहिजे. ब्रिटिश सैन्यात भरती झाल्यास अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, लढाईचा अनुभव हिंदू तरूणांना येईल. त्या तरूणांना इंग्रजाविरूद्ध उभे करता येईल ही सावकरांची सैनिकीकरणामागची प्रमुख भूमिका होती. तसेच देशाची सुरक्षितता लष्करी सामर्थ्यावर अवलंबून असते. प्रत्येक देशाला युद्ध आणि परकीय आक्रमणाची सतत भिती असते. अशा वेळेस शांततेचा मार्ग उपयुक्त ठरत नाही. बळी तो कान पिळी हा निसर्गाचा नियम असून या नियमांवर आंतरराष्ट्रीय राजकारण चालत असते. म्हणून भारताने आदर्शाचा विचार न करता वास्ततावादी विचार करून सैनिकीकरणावर भर दिला पाहिजे. एक पट शस्त्रबळाचा नायनाट सव्वापट शस्त्रबळाने करता येते हे मत व्यक्त करून सैनिकीकरणाची गरज विशद करतात.

**सैनिकीकरणाची आवश्यकता वा गरज-** सावरकर खालील कारणाकरिता सैनिकीकरणाची आवश्यकता सांगतात.

**१) स्वातंत्र्याकरिता-** भारताला परकिय शत्रूपासून स्वातंत्र्य मिळवायचे आहे. ब्रिटिशांनी कपटनितीने भारताचे स्वातंत्र्य नष्ट केलेले आहे. म्हणून त्यांच्या याचना करून भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही. कारण कोणतेही राष्ट्र सहजासहजी स्वातंत्र्य देणार नाही. त्यासाठी भारतीयानी संघटीत होऊन सशस्त्र बनले पाहिजे. त्यासाठी भारतीयांनी सैन्यात प्रवेश मिळवावा. लष्करी प्रशिक्षण घ्यावे युद्धभूमीवर जाऊन युद्धाचा अनुभव घ्यावा. त्यासाठी सावरकरांनी दुसरे महायुद्ध काळात भारतीय लोकांना लाभलेली महान संधी मानत. कारण या युद्धातील अनुभवाचा फायदा स्वातंत्र्यासाठी करता येईल. म्हणून सावरकरांनी महायुद्ध काळात सतत सैनिकीकरणाचा प्रसार करत होते. त्यामुळे त्यांना रिक्रुट वीर असे ही म्हटले जात होते. ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवणे त्यांना भोळसटपणाचे वाटे. रणाविना कोणा स्वातंत्र्य मिळाले का? या विश्वासातून त्यांनी सतत सैनिकीकरणाचा आग्रह धरलेला दिसतो.

२) **आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा व परकिय आक्रमणापासून संरक्षण-** सैनिकी सामर्थ्य वाढविल्याशिवाय भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा मिळणार नाही. परकियांच्या मनात भारतीय लष्करी ताकदीबद्दल भिती वाटली पाहिजे तर ते आपल्यावर आक्रमण करण्याचा विचार करणार नाहीत. जर कुणी आक्रमण केले तर त्या आक्रमणाला प्रतिउत्तर देण्यासाठी हिंदूचे लष्करीकरण झाले पाहिजे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त करून देण्यासाठी लष्करीकरण त्यांना आवश्यक वाटत होते. कारण लष्करीदृष्टया सामर्थ्यशाली राष्ट्रांना जागतिक पातळीवर मान सन्मान मिळत असतो. त्या देशावर कोणीही आक्रमण करत नाही वा वाकडया नजरेने पाहू शकत नाही.

**३) राष्ट्राचे स्थैर्य व सुव्यवस्था-** देशाची सुरक्षा ही समाजाच्या एकात्मतेवर अवलंबून असते. स्वसंरक्षण ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. जी गोष्ट व्यक्तीला लागू होते ती गोष्ट राष्ट्रालाही लागू असते. म्हणून स्वतः आणि स्वकीयांचे रक्षण करण्यासाठी सामर्थ्य संपन्न असणे गरजेचे आहे. कोणत्याही देशाला अंतर्गत यादवी आणि परकीय आक्रमणाचा धोका असतो. अशा वेळेस शांतता आणि सहिष्णु धोरण उपयोगी नसतो. राजकीयदृष्टया स्थैर्य प्राप्ती आणि अंतर्गत शत्रूचा बंदोबस्त करण्यासाठी लष्करी शक्ती वाढविणे गरजचे आहे. भारतीयानी सशस्त्र संघर्ष केल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही. सशस्त्र संघर्ष हा स्वातंत्र्यासाठी प्रभावी मार्ग आहे. स्वातंत्र्यानंतर भारताला यादवी युद्धाचा धोका आहे. कारण भारतातील मुस्लिम लोकांना मुस्लिम राजवट नष्ट झाल्याचे दुःख आहे. ती राजवट निर्माण करण्याची मुसलमांनाची महत्त्वाकांक्षाआहे. या परिस्थितीत हिंदूचे सैनिकीकरण झाले पाहिजे. अन्यथा भारतावर मुस्लिम राजवट येण्याची शक्यता आहे यासाठी सावरकर सैनिकीकरणाचा आग्रह धरतात.

**४) सैनिकीकरणाचे मार्ग-** सावरकरांनी सैनिकीकरणासाठी सैनिकी शिक्षण देणाऱ्या शाळा आणि महाविद्यालयांची संख्या वाढविली पाहिजे. सैनिकीकरणाची आवड निर्माण होण्यासाठी सैनिकीकरणाचा प्रचार युवकांमध्ये केला पाहिजे. प्रत्येक सदृढ विद्यार्थ्याला लष्करी शिक्षण दिले पाहिजे. कला महाविद्यालयाइतकीच सैनिकी महाविद्यालये असली पाहिजेत. त्यासाठी सावरकर लेखण्या मोडा आणि तलवारी हाती घ्या हा संदेश देत असत. हिंदूची विमाने आकाशात उंच गेल्या पाहिजेत. हजारो युद्ध नौकांनी सागरावर पहारा ठेवला पाहिजे. साहित्य संमेलनात रक्ताने लिहा, शाईने लिहू नका इ.विचार त्यांनी मांडले.

**४) परीक्षण वा दोष-** सावरकरांच्या सैनिकीकरणाबद्दलच्या विचारावर अनेक आक्षेप घेतले जातात. सावरकर सैनिकीकरणाच्या माध्यमातून भारताला आक्रमक राष्ट्र बनविण्याचा प्रयत्न करत होते पण युद्ध मानवासाठी घातक आहे याकडे त्यांनी लक्ष दिले नाही. ब्रिटिशांशी सशस्त्र संघर्षाशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही हा विचार योग्य वाटत नाही. तसेच मुस्लिमाकडून यादवी युद्धाचा धोका व मुस्लिम राजवटीची भिती वाटत असल्यामुळे सावरकर सैनिकीकरणाचा आग्रह धरतात. मात्र त्यामुळे हिंदु मुस्लिमांत संघर्ष होईल याकडे दुर्लक्ष करतात.

सावकरांच्या सैनिकीकरणाच्या विचारांत अनेक उणिवा असल्या तरी भारताने दुर्बल राष्ट्र राहू नये समर्थ राष्ट्र बनावे ही तळमळ होती. भारत लष्करीदृष्टया सबल राष्ट्र बनल्यास कोणताही शेजारी देश आक्रमण करणार नाही ही प्रमुख भूमिका होती. परंतु त्यांच्या भूमिकेचा विर्पयास करण्यात आला. लष्करी दुर्बलतेमुळे चीन आणि पाकिस्थानने भारतावर केलेल्या आक्रमणातून सावकरांच्या भूमिकेची आठवण येते.

**प्र.३ रा सावरकरांचे समाजसुधारणा आणि जातिव्यवस्थेबाबतचे विचार स्पष्ट करा?**

सावरकर हे क्रियाशील राजकारणी असले तरी देशाचे राजकारण हे समाजकारणावर आधारित असते. म्हणून त्यांनी बुद्धिप्रामाण्याच्या कसोटीवर समाजकारणाचा विचार करून भारतीय समाजातील अनिष्ट प्रथा कठोर प्रहार केलेले आहेत. रत्नागिरी येथे स्थानबद्ध काळात त्यांनी सखोल चिंतन करून सामाजिक सुधारणेची मांडणी केली. राजकीय क्षेत्राप्रमाणे सामाजिक क्षेत्रातही क्रांतिकारी आणि निर्भिड मते व्यक्त केलेली आहेत. हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेवर कठोर प्रहार केले. जातीव्यवस्थेतील भेदभावामुळे हिंदू समाज विस्कळीत झाला. जातीव्यवस्था ही जन्मावर आधारित असल्याने समाज जीवन बंदिस्त झाले आहे. जातिव्यवस्थेतून अस्पृश्यतेसारखी अमानुष रूढी निर्माण झाली आहे. जातिव्यवस्था हे हिंदूचे व्यवच्छेदक लक्षण बनले. वरिष्ठ जातींनी कनिष्ठ जातींवर अन्याय केल्यामुळे कनिष्ठ जातीतील लोकांनी धर्मातर केले. त्यामुळे हिंदुचे सामर्थ्य कमी कमी होत गेले. जातिव्यवस्थेतून काळाच्या ओघात अनेक पोट जाती उदयाला आल्या. जाती व पोट जातीतील बंधने ताठर बनल्यामुळे एकात्म हिंदू समाजाचे अनेक तुकडे पडले. हीच व्यवस्था कायम राहिली तर हिंदू समाजाची अवनती कोणीही रोखू शकणार नाही. त्यासोबत देशाला मिळालेले स्वातंत्र्य टिकवू शकणार नाही. हिंदू समाजाला राष्ट्रस्वरूप द्यायचे असेल तर जातीव्यवस्था नष्ट करणे आवश्यक आहे. जात्युच्छेदक निबंधात म्हणतात, "जे हिंदू राष्ट्राचे स्वातंत्र्य आपणास मिळवायचे ते जातिभेद जर्जर झालेल्या या आपल्या राष्ट्र पुरूषास जरी मिळविता आले, तरी रोगाचे निर्मूलन झाले नाही तोपर्यंत ते गमावण्याचा पाया भरत जाणार आहे. जर आम्ही हिंदू या जन्माजात जातिभेदाचा समूळ उच्छेद करू, तरच तरू व राष्ट्र म्हणून धर्म म्हणून यापुढे जगू शकू." सावरकरांनी जातीव्यवस्थेचे

निर्मूलन करण्यासाठी वर्तमानपत्रातून लेख व निबंध लिहीले. जातीव्यवस्था धर्माधिष्ठीत आहे हे खोडून टाकण्याकरिता वेदकाळातील उदाहरणे दिली. विजयादशमी, मकरसंक्रातीसारखे सण कनिष्ठ जातीच्या लोकात जाऊन साजरे केले. सार्वजनिक गणेश उत्सव, सहभोजन, स्त्रियांचे हळदीकुंकवाचे कार्यक्रम आयोजित केले. परधर्मात गेलेल्या हिंदुना परत आणण्यासाठी शुद्धिकरण चळवळ चालविली. रत्नागिरीला पतितपावन मंदिर बांधले. त्यात अस्पृश्यांना मुक्त प्रवेश दिला इ. उपक्रमातून जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

**सप्तशृंखला बाबतचे विचार-**

हिंदू समाज सात बंधनात बांधला गेला आहे. त्या बंधनातून सुटका होत नाही. तोपर्यंत समाजात परिवर्तन शक्य नाही. आपण या बेडया पायात ठोकून घेतल्या आहेत या अध:पतनास आपण जबाबदार आहेत. त्या स्वत:हून तोडून टाकत नाही, तोपर्यंत आपल्याला स्वातंत्र्य मिळणार नाही आणि मिळाली तरी ते टिकणार नाही. ही बंधने पुढीलप्रमाणे

१) **वेदबंदी** - वेदांचा अभ्यास करण्याचा अधिकार फक्त वरिष्ठ जातींना होतो. म्हणून सावरकरांच्या मते वेद हिंदू धर्माची संपत्ती असून कोणत्याही एका जातीची खाजगी मालमत्ता नाही. त्यामुळे वेद अभ्यासाला बंदी हा सामाजिक अन्याय आहे. समाजाला ज्ञानापासून वंचित करणे हा घोर अपराधी असहे. हा अन्याय दूर करण्यासाठी वेद अभ्यासाची संधी व परवानगी सर्व जातींना देऊन ज्ञानाचे दरवाजे सर्व हिंदूसाठी मोकळे केली पाहिजे. ही सामाजिक बेडी तोडली तरच जातीव्यवस्था नष्ट होईल.

२) **व्यवसाय बंदी-** जाती व पोटजातीमुळे समाजाचे गटात विभाजन झाले. जन्मावर आधारित व्यवसायमुळे व्यक्तीच्या अंगी असलेल्या गुणाच्या विकासाला वाव मिळाला नाही. परस्परांच्या व्यवसाय करण्यास बंदी लादल्यामुळे स्पर्धा नष्ट झाली. आवड व कौशल्य लक्षात न व्यवसाय लादल्यामुळे गुण व कौशल्य विकासात वाव राहिला नाही. ही बंदी तोडण्यासाठी सावरकरांनी व्यक्तीला आवडीनुसार व्यवसाय करण्याची संधी दिल्यास तिची कार्यक्षमता वाढून सामाजिक एकता निर्माण होईल. वस्तूचे उत्पादन वाढेल जातीव्यवस्था नष्ट झाली की व्यवसाय बंदी आपोआप नष्ट होईल.

३) **स्पर्श बंदी-** अस्पृश्यता ही हिंदू समाजातील एक बेडी आहे. अस्पृश्यता हिंदू समाजाला लागलेला कलंक आहे. सावरकरांच्या मते अस्पृश्यतेला वेदाचा आधार नाही. अस्पृश्यता हा आध्यात्मिक आधार नसलेला मानसिक विकार आहे. ज्या धर्मग्रंथानी अस्पृश्यतेचा पुरस्कार केला त्यांना ते नाकारतात. स्पर्श बंदी तोडून अस्पृश्यता नष्ट केल्याशिवाय हिंदू समाजाचा विकास होणार नाही.

४) **सिंधु बंदी-** हिंदूमध्ये समुद्र पर्यटन निषिद्ध मानले जात होते. समुद्र पर्यटन केले तर ती व्यक्ती हिंदू राहत नाही. या विचारामुळे हिंदूचे व्यापारी दृष्टिकोणातून अपरिमित नुकसान झाले. जगाच्या इतर भागात गेलेल्या हिंदूचे हिंदूत्व नष्ट केल्यामुळे हिंदूचे संख्याबळ व सामर्थ्य घटले. पाश्चात्य देशांनी समुद्र पर्यटन करून अनेक खंडाचा शोध लावून तेथे आपल्या वसाहती निर्माण केल्या. मात्र आपण समुद्र पर्यटनास निषिद्ध मानून जगाच्या स्पर्धत मागे पडला. समुद्र पर्यटनामुळे हिंदूत्व नष्ट केले जाणार नाही यासाठी सावरकर ही बंदी नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले.

५) **शुद्धी बंदी-** गतकाळात हिंदूनी धर्मांतर केल्यामुळे हिंदूची संख्या कमी झाली. धर्मांतर करून ख्रिश्चन व मुस्लिम बनलेल्या व्यक्तीना शुद्ध करून परत हिंदू धर्मात आणण्याचे मार्ग कायमस्वरूपी बंद केले. आणि ही गोष्ट हिंदू राष्ट्रासाठी अत्यंत घातक ठरली. म्हणून सावरकरांनी शुद्धी बंदी नाकारून धर्मांतरीत हिंदूना पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश दिला पाहिजे याचे समर्थन करून शुद्धीकरणाची चळवळ चालविली. हिंदू धर्मात पुर्नप्रवेशाची मोहिम होती घेतल्याशिवाय हिंदूना भवितव्य नाही असे सांगून शुद्धी बंदी विरोध केला.

६) **रोटी बंदी-** हिंदू धर्मातील कठोर जातीयतेमुळे आंतरजातीय भोजन पाप मानले गेले. इतर जातीतल्या लोकांबरोबर भोजन करू नये. अहिंदूबरोबर भोजनाला धर्मांतर मानले जात होते. सावरकरांनी रोटी बंदीला तीव्र विरोध करून पोट हे धर्माचे केंद्र नसून मानवाच्या मनात धर्माचा उदय होता. म्हणून ही बंदी अयोग्य असून त्यांनी या बंदीला तीव्र विरोध केला होता.

**७) बेटी बंदी-** हिदू धर्मात आंतरजातीय विवाहाला बंदी होती. एका जातीतील मुलगी व मुलांला इतर जातीच्या मुलगा व मुलगीसोबत विवाहास बंदी आहे. सावरकरांच्या मते वधु वरांच्या संमतीने आंतरजातीय विवाह व्हावे. म्हणून त्यांनी आंतरजातीय विवाहाला पाठिंबा दिला. मात्र हिंदू मुलीने अहिंदूशी विवाह करू नये. हिंदू मुलाने अहिंदू मुलीशी केलेल्या विवाहास सावरकरांचा विरोध नव्हता. सावरकर ज्या विवाहामुळे हिंदू संख्या कमी होणार आहे त्या विवाहास विरोध करतात. ते नेहमीचा संख्याबळाचा विचार करतात.

हिंदू समाज जोपर्यंत वरिल सात बंधनातून मुक्त होत नाही तोपर्यंत हिंदूमध्ये परिवर्तन होणार नाही असे सावरकरांना वाटते. समाजाचे कोणत्याही परिस्थितीत विघटन मान्य नव्हते. ते विघटन जातिव्यवस्था व अनिष्ठ रूढया परंपरामुळे निर्माण होते. म्हणून जातिव्यवस्था आणि अनिष्ठ रूढया नष्ट करण्यासाठी सप्त बंदी नष्ट करण्याचे प्रयत्न करतात.

**प्र.४था सावरकरांचे हिंदुच्या आधुनिकीकरणाबद्दलचे विचार सांगा?**

**किंवा.**

**सावरकरांचे विज्ञान, यंत्रे आणि यंत्रयुग आणि बुद्धिवादाबद्दलचे विचार स्पष्ट करा?**

**टिप- अ) सावरकरांचे यंत्र, यंत्रयुग आणि विज्ञानवाद-** सावरकर हे प्रतिगामी सनातनी असल्याची टीका केली जाते. मात्र त्यांचे यंत्रयुगाबाबतचे विचार पाहिल्यानंतर त्यांचा आधुनिक दृष्टिकोनाचा आपल्याला परिचय होतो. प्राचीन काळापासून सुरू असलेल्या प्रथा, परंपरा व चालीरिती कालविसंगत ठरल्या आहेत. त्या नष्ट करणे आवश्यक मानतात. हिंदू लोक श्रुति-स्मृति आणि पुराण काळात वावरत राहतील तर ते कायमचे मागासलेले राहतील. युरोपियनांनी विज्ञाननिष्ठा आणि बुद्धिवादी दृष्टिकोन स्वीकारून आपली प्रगती करून घेतली. म्हणून हिंदू पोथीनिष्ठता व धर्मभोळेपणा त्याग करून विज्ञान निष्ठाची कास धरावी म्हणून ते यंत्रयुगाचे स्वागत करतात. यंत्राला ते वरदान मानतात. त्यासाठी यंत्राने का बेकारी वाढते या लेखात युरोपच्या तुलनेने आपण २०० वर्ष मागे आहोत. युरोपियनांनी दैववादी संस्कृतीचा त्याग करुन विज्ञानवादाचा वापर केल्यामुळे त्यांचा विकास झाला. यंत्राचा वापर जसजसा वाढत जाईल तसतसा देवभोळेपणा कमी कमी होत जाईल. यंत्रामुळे माणूस निसर्गात सर्वश्रेष्ठ ठरला. जे यंत्राविरूद्ध ओरड करतात. त्यांना हे कळत नाही की, यंत्र मानवाला प्रगत करणारे विज्ञानाचे वरदान आहे. बेकारी यंत्राने वाटत नसून विषमवाटणीमुळे बेकारी वाटते. यंत्राने बेकारी वाढली असती तर पाश्चिमात्य देश दुबळे ठरले असते. उलट यंत्रशक्तीच्या जोरावर पाश्चिमात्य देश संपन्न बनले. यंत्र, हत्यार व कळ हे माणसापेक्षा शतपटीने कार्यक्षम असलेले मनुष्याचे इंद्रीय असून यंत्राने मनुष्य दुबळा केलेला नसून मनुष्य जो दुबळा होता त्याला यंत्राने पृथ्वीवरिल नव्हे तर अंतराळातील सर्व प्राण्यामध्ये प्रबळ केलेला आहे. म्हणून सावरकरांच्या मते भारतीयांनी सुद्धा विज्ञान व यंत्रयुगाचा वापर करुन आपली प्रगती घडवून आणावी. यंत्राला विरोध करू नये. सावकरांचे यंत्र, यंत्रयुग आणि विज्ञानाचे स्वागत करणारे विचार त्यांना पुरोगामी, विज्ञाननिष्ठ आणि आधुनिक विचारंवत म्हणून स्थान प्रदान करतात.

**टिप- ब) हिंदु आधुनिकीकरण वा सावरकरांचा बुद्धिवाद**

सावकरांचे सामाजिक आणि राजकीय विचार यांच्यात परस्परविरोध आहे. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत अत्यंत पुरोगामी विचारांची मांडणी करतात. अंधश्रद्धा, अंधविश्वास, अयोग्य चालीरिती, रूढी व परंपरावर कडाडून हल्ला चढवितात. हिंदू धर्मातील कर्मकांडे त्यांना मान्य नव्हती. हिंदू राष्ट्र निमितीसाठी सामाजिक परिवर्तनाचा आग्रह धरतात. सावरकरांनी संस्कृती रक्षणाचा पुरस्कार केलेला असला तरी जुन्या रूढया व परंपरा जशाच तशा न स्वीकारता ज्या उपयुक्त आहेत त्यांचा विचार करून ज्या कालबाहय झालेल्या आहेत त्या टाकून द्याव्यात ही भूमिका स्पष्टपणे मांडतात. त्यांच्या बुद्धिवादी लेखनामुळे सनातनी नाराज झाले. सारे जग आधुनिकतेकडे वेगाने वाटचाल करीत असतांना हिंदुनी स्मृती व पुराणाच्या गर्तेत अडकला आहे. केमाल पाशाच्या नेतृत्वाखाली तुर्कस्थानातील मुसलमानांनी आधुनिकतेचा स्वीकार करून स्वतःचा विकास घडवुन आणला. त्याचप्रमाणे हिंदु जोपर्यंत आधुनिकतेची कास धरत नाही तो पर्यंत आपला विकास होणार नाही. हिंदू धर्मात अग्नीपुजा, गोपुजा, वृक्षपुजा व यज्ञ या गोष्टींना अतोनात महत्त्व दिलेले होते. सावरकरांनी या गोष्टींना विरोध केला. आधुनिक काळात या रूढया अयोग्य वाटतात. निसर्गाची पूजा करण्याऐवजी

निसर्गाला गुलात बनवून भौतिक प्रगती करण्याऐवजी झाडाची पूजा व निसर्गपूजा करणे त्यांना वेडेपणाचे वाटे. यज्ञामुळे अन्नाची नासाडी होते. यज्ञात अन्नाचा नाश करण्याऐवजी त्या अन्नाचा उपयोग गरिबांच्या पोषणाकरिता करता येईल. सावरकर गोपूजेवरही कठोर प्रहार करतात. गाय ही माता बैलांची आहे आपली नव्हे. गाय उपयुक्त पशू आहे पण तिची पूजा करणे मानवी बुद्धीचा अपमान आहे. गायीबद्दलच्या धार्मिक श्रद्धेमुळे गतकाळात हिंदूचे प्रचंड नुकसान झाले. सावरकर ईश्वराच्या पूजापद्धतीवर देखील टीका करतात. ईश्वरपुजेने यश मिळते या भोळया कल्पनेने हिंदू पराभूत झाले. ईश्वरावर अवलंबून राहिल्यामुळे हिंदूचा आत्मविश्वास वा धाडस कमी झाला. ईश्वरावरिल श्रध्देपेक्षा हिंदूनी आपले मन खंबीर व मनगट पराक्रमी केले पाहिजे.

सावकरांच्या आधुनिकीकरणाच्या विचारांत शुद्ध विज्ञानवादाची झलक दिसते. त्यांना समर्थ हिंदू राष्ट्राची स्थापना करावयाची होती. या राष्ट्राच्या स्थापनेत येणारे सर्व अडथळे त्यांना नष्ट करणे आवश्यक वाटत असल्याने त्यांनी हिंदू धर्माची चिकित्सा केली. हिंदू धर्मातील अयोग्य गोष्टी कठोर प्रहार करून परिवर्तनाचा प्रयत्न केला. त्यांचा प्रयत्न हा बुद्धिवादाच्या जवळ जाणारा आहे.

**टिप- सावरकरांच्या विचारांचे परीक्षण-** सावरकरांच्या राजकीय विचाराचा विचार करतांना प्रत्यक्ष कार्यापेक्षा वैचारिक प्रक्षोभ निर्माण करण्याचे त्यांचे कार्य अधिक महत्त्वाचे आहे. त्यांच्या क्रांतिकार्याला अनेक मर्यादा पडलेल्या दिसतात. त्यांनी अभिनव भारत संघटनेची निर्मिती क्रांतीसाठी केलेले असली तरी या संस्थेच्या कार्यावर वास्तव दृष्टीपेक्षा कल्पनारम्यतेचा पगडा अधिक जाणवतो. टिकाऊ स्वयंसेवकाची व भक्कम संघटना त्यांना बांधता आली नाही. मात्र वैचारिक विश्वात त्यांनी खरोखर क्रांती घडवून आणली. सावरकर मूलतः वैचारिक प्रक्षोभ निर्माण करून समाजाला तात्विक दृष्टी देणारे श्रेष्ठ प्रतीचे विचारवंत होते. त्यांचे राजकारण अपयशी झाले असले तरी तत्त्वचिंतन चिरंतन ठरले आहे. सावरकर म्हणजे स्वप्नदर्शी, कार्यकर्ता, वस्तुनिष्ठ आणि क्रांतिकारक या सर्व भूमिकांचा आगळावेगळा समन्वय होता. त्यांच्या राजकीय विचारांची एक गंभीर मर्यादा म्हणजे इतिहासप्रेमातून अतीताचा व पूर्वजांचा अतिगौरवीकरण करतात. इतिहास लेखनात विश्लेषणाचा भाग अत्यंत थोडा सापडतो. भूतकालाचे उदात्तीकरण आणि रोमँटिक इतिहास लेखन ही प्रवृत्ती आढळते. सावकरांनी आपल्या विचारसरणीला विशिष्ट तत्त्वप्रणालीच्या दावणीला बांधल्यामुळे एकांगी, विपर्यस्त गोष्टींचे विनाकारण समर्थन करण्याची वेळ त्यांच्यावर आली. त्यांच्या हिंदुत्वावादी राजकारणाला टीकेचे धनी व्हावे लागले. हिंदुत्ववादी विचारांना मुस्लिमविरोध आणि काँग्रेसविरोधाची जोड दिल्यामुळे मोठया प्रमाणावर एकांगीपणाला वाव मिळाला. त्यातून सांप्रदायिकतेला मोठया प्रमाणावर वाव मिळाला.

सावरकर राष्ट्रभोळे असल्याने रोटीबंदी, बेटीबंदीविरूद्ध हल्ला, व्यवसाय बंदीस विरोध, शुद्धीकरण मोहिमाचा पुरस्कार, ग्रंथप्रामाण्यावर टीका इत्यादीमुळे त्यांचे विचार बुद्धिप्रामाण्यवादी व विज्ञाननिष्ठ ठरले. यंत्रयुगाचे स्वागत केल्यामुळे आधुनिक ठरले. पण त्यांच्या विचाराचा खोलवर विचार केल्यास धर्म रक्षण व प्रचारास अडथळा येईल अशा सर्व गोष्टींवर जोरदार प्रहार केले. त्यांनी सुधारणाची तरफदारी केली असली तरी हिंदुराष्ट्रवादाला विरोधी ठरणाऱ्या सुधारणांचा पुरस्कार केला नाही. सावरकरांना आयुष्यभर शस्त्रवेडयाने झपाटले होते. ते सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समस्यांवर शस्त्रबळ हा एक पर्याय सांगतात. शस्त्रबळासाठी वेळप्रसंगी लोकशाही ऐवजी हुकूमशाहीचे समर्थन करतात. हा सावरकरांचा राष्ट्रवाद इतिहास जमा होत आहे. हिंदूना आक्रमकपणाने धडे देणे आणि अखंड भारताची घोषणा करणे हे दुहेरी स्वप्नरंजन आहे हे लक्षात घेतले नाही. सावरकरांच्या विचारात विकासक्रम आढळत नाही असे अनेक अभ्यासक सांगतात. बहुतांशी विषयावरचे बालपणी असलेले विचार संपूर्ण आयुष्यभर राहिल्यामुळे वैचारिक वाढ झाल्याचे दिसत नाही. त्यांनी समकालीनाशी वादविवाद चालविले परंतु नव्या तत्त्वज्ञान व विचारसरणीबद्दल औदासिन्य दाखविले.

सावरकरांच्या विचारांत अनेक मर्यादा असल्या तरी त्यांची देशभक्ती अन्ययसाधारण होती. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्याचे आयुष्यातील महत्त्वपूर्ण काळ कारावासात गेल्यामुळे काही गोष्टीसाठी वेळ मिळाला नाही. त्यांनी भोगलेल्या वेदनातून भारताच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर राहील. त्यांच्या हिंदुराष्ट्रवादाचा सिद्धांत हा तत्कालीन द्विराष्ट्रवादाची प्रतिक्रिया होती. काँग्रेसच्या मुस्लिम अनुयायाच्या धोरणवर त्यांनी घेतलेल्या आक्रमण भूमिकेमुळे हिंदूमध्ये जागृती मोठया प्रमाणावर घडली यात त्यांच्या कार्याचे महत्त्व लक्षात येते.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. सावरकरांनी लिहलेल्या दोन ग्रंथाची नावे सांगा.
उत्तर- सावरकरानी १८५७ चे स्वातंत्र्य समर, मॅझिनीचे चरित्र, हिंदुपदपादशाही, माझी जन्मठेप, हिंदू राष्ट्र दर्शन, संन्यस्त खड्ग व शिखाचा इतिहास इ.ग्रंथ लिहीले.

२. सावरकरांनी सांगतिलेले हिंदू धर्माचे दोन दोष सांगा.
उत्तर- सावकराच्या मते हिदू धर्मात रोटी बंदी, स्पर्श बंदी, वेद बंदी आणि व्यवसाय बंदी हे दोष आहेत.

३. सावरकरांची हिंदूत्वाची संकल्पना सांगा.
उत्तर - ."ज्या व्यक्तीची पितृभूमी आणि पुण्यभूमी हिंदूस्थान असेल त्या व्यक्तिला हिंदूत्व होय. सिंधु नदीपासून समुद्रापर्यंत पसरलेल्या भारतभूमीस आपली पितृभूमी व पुण्यभूमी समजतो त्याला हिंदु म्हणावे."

४. सावकरांनी स्थापन केलेल्या दोन संघटना कोणत्या?
उत्तर- सावरकरांनी मित्र मेळावा आणि अभिनव भारत या संघटना स्थापन केल्या.

५. सावरकरांनी सैनिककरणाची आवश्यकता का सांगितली होती?
उत्तर- सावरकरांनी राष्ट्र स्वातंत्र्य, आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा व परकिय आक्रमणापासून संरक्षण, राजकीय स्थैर्य आणि मुस्लिम राजवटीची पुर्नस्थापनेपासून सुटका इत्यादी कारणासाठी सैनिककरणाची आवश्यकता सांगितली होती.

६. सावरकरांनी यंत्रयुगाची आवश्यकता का सांगतिली होती.
उत्तर - सावरकर यंत्रयुगाचे स्वागत करतात.यंत्राला ते वरदान मानतात.यंत्र, हत्यार व कळ हे माणसापेक्षा शतपटीने कार्यक्षम असलेले मनुष्याचे इंद्रीय असून यंत्राने मनुष्य दुबळा केलेला नसून मनुष्य जो दुबळा होता त्याला यंत्राने पृथ्वीवरिल नव्हे तर अंतराळातील सर्व प्राण्यामध्ये प्रबळ केलेला आहे.

७. सावरकरांचे जन्म आणि मृत्यू केव्हा झाला ते सांगा.
उत्तर- २८ मे १८८३ ला सावरकरांचा जन्म झाला असून त्यांचा मृत्यू २६ फ्रेब्रुवारी १९६६ साली झाला.

८. सावरकरांच्या हिंदू राष्ट्रवादातील दोन दोष कोणते?
उत्तर- संकुचित राष्ट्रवाद संकल्पना, हिंदू समाज राष्ट्रस्वरूप नाही. हिंदूमध्ये भाषिक, सांस्कृतिक आणि वांशिक समानतेचा अभाव हे सावकरांच्या हिंदू राष्ट्रवाद संकल्पनेत दोष आहेत.